

# कर्नाटक

रमेश मंत्री



म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
स. क्र. [illegible]

REFBK-0027147




# कर्नाटक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
भू-प्रवास
ग्र. क्र. ८४६
२०९४८
२५।१०।८२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ
भू-प्रवास
८४६
२०९४८
२५।१०।८२

मराठी ग्रं संग्रहालय

आपला भारत महान

# विठ्ठलाचा कर्नाटक

रमेश मंत्री

REFBK-0027147

समांतर शिक्षण प्रकाशन

आपला भारत महान
पुस्तक क्र. १

मूल्य :-
४५ रुपये.

अक्षर जुळणी :-
अमेय अक्षर जुळणी,
शुक्रतारा, संत जनाबाई मार्ग,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७.
दूरध्वनी: ६११२४५७.

मुद्रक आणि प्रकाशक :-
राजीव मंत्री
समांतर शिक्षण प्रकाशन
शुक्रतारा, संत जनाबाई मार्ग,
विलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७.
दूरध्वनी: ६११२४५७.

मुखपृष्ठ :-
अनिल दाभाडे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | श्री विठ्ठलाचा कर्नाटक | ५ |
| २. | इतिहासकालीन कर्नाटक | १० |
| ३. | प्रेक्षणीय बंगलोर आणि श्रीरंगपट्टण | १६ |
| ४. | महोत्सवी शहर म्हैसूर | २७ |
| ५. | श्रवणबेळगोळ, हळेबीड आणि बेलूर | ३५ |
| ६. | धर्मस्थळे, मंगलोर, उडुपी आणि गोकर्ण | ४७ |
| ७ | गुलबर्गा, गाणगापूर आणि बिदर | ५७ |
| ८. | हंपी : पूर्वेकडील बॅबिलॉन | ६८ |
| ९ | बिजापूरचा जगप्रसिद्ध गोलघुमट | ८० |
| १० | ऐहोळ, पट्टदकल आणि बदामीची शिल्पकला | ९१ |
| ११ | कानडी साहित्याची परंपरा | १०० |

श्री प्रबोध
६५६
२६९४५
२५।१०।०२

# १. श्री विठ्ठलाचा कर्नाटक

साहित्य, सगीत, चित्रकला, शिल्पकला अशा अनेक क्षेत्रात भारताची श्रेष्ठ परपरा हजारो वर्षांची आहे या परंपरेची ओळख करून देण्यासाठी 'आपला महान् भारत' या ग्रथमालेची योजना करण्यात आली आहे भारताच्या प्रत्येक विभागाने या देशाच्या संस्कृतीला जे योगदान दिले आहे त्याची माहिती या मालिकेत देण्यात येत आहे या मालेचा प्रारभ आपले शेजारी राज्य कर्नाटकपासून होत आहे कर्नाटक आणि महाराष्ट्र या दोन राज्यांचे अनेक शतकाचे जिव्हाळ्याचे सबंध आहेत महाराष्ट्र हा शब्द वापरतो. कर्नाटक किंवा कन्नड देश याचाही तसाच अर्थ आहे कारण 'करू' म्हणजे मोठा किंवा उच आणि 'नाडू' म्हणजे प्रदेश-जसे तामिळनाडू, करनाडू-कन्नाडू-कन्नड अशी कन्नड या शब्दाची व्युत्पत्ती आहे कर्नाटक राज्याचे क्षेत्रफळ सुमारे दोन लक्ष चौरस किलो मीटर्स आहे महाराष्ट्राचे क्षेत्रफळ तीन लक्ष चौरस कि. मी आहे कर्नाटकची लोकसंख्या सुमारे चार कोटी आणि महाराष्ट्राची सुमारे सात कोटी आहे कर्नाटकाचा विठ्ठल हा देव महाराष्ट्राने स्वीकारला आहे कानडा विठ्ठलू कर्नाटकू हे ज्ञानेश्वराचे वचन प्रसिद्ध आहे सुवासिनींनी गळ्यात मंगळसूत्र घालण्याची चाल महाराष्ट्र, कर्नाटक आणि आध्र या तीनच राज्यांत आहे.

कर्नाटकाला प्राचीन इतिहास आहे भारतीय ज्योतिषशास्त्राचा पाया घालणारा व 'बृहत्‌जातक' ग्रंथाचा प्राचीन काळचा लेखक वराहमिहिर याने आपल्या ग्रथात कर्नाटकचा उल्लेख केला आहे कर्नाटक, कत्यक, कर्नाट, कन्नउर, कुतला, किष्किंध, विदिशा व वैजयती अशा विविध नावानी कर्नाटकाचा उल्लेख पुराण ग्रंथांत आढळतो हिमालय आणि विंध्य पर्वत यामधील भूखडाला ऋग्वेदकाळी आर्यावर्त म्हणत असत काही सामाजिक अपराधाबद्दल ज्याची आर्यावर्तातून हकालपट्टी होत असे, ते लोक विंध्य पर्वताच्या दक्षिणेस जात असत विश्वामित्राने आपल्या पन्नास पुत्राना शाप देऊन आर्यावर्तातून हद्दपार केले तेव्हा ते दक्षिणेस गेले, म्हणून ते दस्यू या नावाने ओळखले जाऊ लागले राम, परशुराम, पाड्‌व, अगस्ती ऋषी अशा

पुराण काळातील अनेक महामानवाचा कर्नाटकाशी सबध आला आहे महाभारतात ज्या विदुर नगराचा उल्लेख आहे, तेच आजच्या कर्नाटकातील बिदर.

भीमा नदीच्या काठच्या धलखेड येथे शकराचे श्वशर दक्षप्रजापती यानी यज्ञ केला होता बागलकोट येथे रावणाने काही काळ मुक्काम केला होता, अशी आख्यायिका आहे आपला पिता जमदग्नी याचा क्षत्रियानी खून केला, त्याचा सूड घेतल्यानतर परशुरामाने क्षत्रियांच्या नि:पाताने रक्ताळलेला आपला परशू मलप्रभा नदीत धुतला सध्याच्या रायचूर येथे रामायणातील किष्किंधा नगरी होती. पाडव या भागात राज्य करीत असता कैवार गावाजवळ भीमाने बकासुराचा वध केला होता भीमाने सध्याच्या चित्रदुर्गजवळ हिंडिबासुराचाही वध केला होता रावणाने कर्नाटकातील गोकर्ण येथे शिवासाठी तप केले होते दाडेलीजवळच्या कचला गुहेत रामाने वनवासात असताना वास्तव्य केले होते जैन मुनींचेही कर्नाटकात वास्तव्य होते जैन सत बसवेश्वर याचा जन्म इल्लुरा येथे झाला भृग ऋषींच्या वंशातील परशुरामाने कन्याकुमारीपासून गोकर्णपर्यंतचा प्रांत जिंकून घेतला होता

बभ्रुवाहन हा उडपीजवळील मणिपूर येथे होता उडपीजवळील शालिग्राम येथे श्रीकृष्णाचे वास्तव्य होते. मुडबिद्री हे गाव जैनाची काशी म्हणून ओळखले जाते शिमोगा येथे पाडवानी राजसूय यज्ञ केला होता. आता चिकमगळूर नावाने प्रसिद्ध असलेल्या गावाजवळ अर्जुनाचा नातू जनमेजय याने सर्पयज्ञ केला होता. चिंतामणी तालुक्यातील कवार हे भरताच्या काळात एकचक्रपूर होते टुमकूर ही सुधन्वा राजाची राजधानी होती श्रवणबेळगोळ येथील गोमतेश्वरची मूर्ती म्हणजे गोमत राजाने आपल्या भावापासून राज्य जिकून घेतले व त्यालाच परत दिले ते ठिकाण. आताच्या हरिलकाट गावी अर्जुनाने चित्रागदा या राजकन्येबरोबर विवाह केला होता. कालिदासाने ज्या शकुतलेवर शाकुतल लिहिले, ती शकुतला मालूरजवळ कण्वा नदीच्या काठी कण्व ऋषींच्या आश्रमात होती मलकाट येथे भक्त प्रल्हादचा मुलगा विरोचन हा वास्तव्य करीत होता वेदातील काही ऋचामध्ये कर्नाटकमधील कावेरी नदीचा उल्लेख आहे. आपल्या विवाहाच्या वेळी म्हटल्या जाणाऱ्या मगलाष्टकातही कावेरी नदीस आवाहन

करण्यात येते कावेरी ही ब्रम्हदेवाची कन्या मानली जाते

इ स. पूर्व तीन हजार वर्षांपासून कर्नाटकात मानववस्ती होती असे उत्खननात सापडलेल्या अवजारावरून व भाड्यावरून दिसून येते सम्राट अशोकाचा प्रपितामह चद्रगुप्त मौर्य हा इ स पूर्व तिसऱ्या शतकातला तो श्रवणबेळगोळजवळ आल्याचा पुरावा सापडला आहे उत्तर कर्नाटकात अनेक ठिकाणी सम्राट अशोकाचे शिलालेख सापडले आहेत.

चद्रगुप्त मौर्याच्या कारकीर्दीपासून कर्नाटकचा राजकीय इतिहास ज्ञात आहे भद्रबाहूचा शिष्य चद्रगुप्त याने श्रवणबेळगोळ येथे धार्मिक कार्यात जीवन व्यतीत केले. त्यानतर सम्राट अशोकाची कारकीर्द सुरू झाली चद्रगुप्ताचा काळ इ स पूर्व तिसरे शतक हा आहे या दोन हजारहून अधिक वर्षांत कर्नाटकावर अनेक राजे आपले प्रभुत्व गाजवून गेले. त्याचा थोडक्यात आलेख द्यायचा तर इ. स पहिले ते तिसरे शतक सातवाहन, तिसरे ते सहावे कदब व गग, सहावे ते आठवे शतक बदामीचे चालुक्य, आठवे ते दहावे शतक रायडूकूर; दहावे ते बारावे शतक कल्याणचे चालुक्य व काही काळ कलचुरी; बारावे ते चौदावे शतक या काळात तुगभद्रेच्या उत्तरेस यादव आणि दक्षिणेस होयसाळ, चौदावे ते सोळावे शतक या काळात विजयनगरचे सम्राट (या राजवटीच्या सुरुवातीस तुगभद्रेच्या उत्तरेस बहामनी सुलतान व नतर विजापूरच्या सुलतानाचे राज्य होते ) सतरावे ते अठरावे शतक या काळात तुगभद्रेच्या दक्षिणेस म्हैसूरचे वोदियार आणि केळदीचे नायक याचा अमल होता १७६१ ते १७९९ या काळात हैदर अली व टिपू सुलतान यानी राज्य केले. मराठ्यानीही तुगभद्रेच्या उत्तरेस म्हैसूरच्या काही भागावर राज्य केले होते इ. स. १८०० पासून १९४७ पर्यंत कर्नाटकावर ब्रिटिशानी राज्य केले

ख्रिस्ती शकाच्या प्रारभी कर्नाटकावर सातवाहनाचे राज्य होते या काळात प्राकृत आणि कानडी ह्या भाषाचा एकमेकावर प्रभाव होता सातवाहन राजा हाल हा 'गाथासप्तशती' या ग्रथाचा लेखक होता चद्रवल्ली येथील उत्खननात सापडलेली सातवाहनाची नाणी, शिसे आणि पोटीन याची बनवलेली आहेत चादी आणि ताबे मिळून पोटीन हा मिश्र धातू करीत असत. तलगुंडा, गुलबर्गा या भागांतही सातवाहनकालीन शिलालेख सापडले आहेत सातवाहनांचे साम्राज्य नर्मदा-गोदावरीपासून

कृष्णा-तुगभद्रेपर्यंत विस्तारले होते त्याची सत्ता म्हैसूरपर्यंतही होती असेही काही पुरावे आहेत अडौनीच्या आसपासचा 'सातहना आहार' हा या वशाच्या राजाचा मूळ प्रदेश होता त्यावरून त्याना सातवाहन हे नाव पडले. सातवाहन साम्राज्याचा दक्षिणेकडील भाग त्याचे माडलिक चुटू नावाच्या घराण्याकडे होता चुटू याचा अर्थ छोटा असा होतो. वन्य जमातीच्या भागावर हे चुटू घराणे सातवाहनाच्या वतीने राज्य करीत असे. सातवाहनाचा ऱ्हास झाल्यावर हे चुटू राजे स्वतत्र झाले कदंब ही चुटू वशाचीच एक शाखा होती या कदबानी सातवाहनानंतर कर्नाटकावर राज्य केले

इ स ३०० ते ५०० या काळात कर्नाटकावर कदबाचे राज्य होते वनवासी येथील एका गृहस्थास वनात कदबांच्या झाडाखाली टाकलेले बेवारशी पोर सापडले त्याने त्या मुलाचे नाव कदब हेच ठेवले. हाच मुलगा पुढे कदब वशाचा पहिला राजा झाला अशी एक आख्यायिका आहे तो मयूर शर्मा म्हणून ओळखला जातो तो ब्राम्हण होता आणि वेदशास्त्राचे अध्ययन करण्यासाठी काची येथे राहत होता. काची ही त्यावेळी पल्लव राजाची राजधानी होती त्याने धर्नुर्विद्या आत्मसात केली आणि आपल्या पराक्रमाने राज्य मिळवले त्याच्या वशजानी कर्नाटकावर दोनशे वर्षे राज्य केले पाटलीपुत्र येथील गुप्त घराणे आणि तळवड येथील गग घराणे या राजवशाशी कदबानी विवाहसबध जोडले होते. वेदाचे अध्ययन, यज्ञयाग आणि तलाव बाधणे ही कदबाची विशेष कार्ये होती ललितकलांच्या क्षेत्रातही त्यानी अभिरुची निर्माण केली, सम्राट असूनही उपभोगात न रमता कदबानी ज्ञानोपासना आणि कलेची सेवा याचे आदर्श घालून दिले. पाचव्या शतकात कदब घराण्याच्या तीन शाखा झाल्या. एका शाखेचा प्रमुख कटकाचार्य याने गोव्यात राजधानी स्थापन केली त्याने गोव्यातील चद्रपूर ही राजधानी केली कटकाचार्य हा गोव्याचा कदब राजा कदंब घराण्यातील जयकेशी याने अकराव्या शतकात गोपकपट्टण येथे राजधानी हलवली कदबानी गोव्याहून कोकणातही नतर आपले साम्राज्य पसरले

कदबाचे एक माडलिक म्हणून चालुक्य हे त्यांच्या वतीने बदामी भागात राज्यकारभार चालवीत होते या वशातील पुलकेशी हा बलाढ्य झाला आणि त्याने इ स पाचशेमध्ये बदामीचे स्वतत्र राज्य केले व कदबाचा

आश्रय झुगारून दिला चालुक्य वशाने कर्नाटकावर अडीचशे वर्षे राज्य केले चालुक्यानी कानडी भाषेला कर्नाटकात राजभाषेचे स्थान दिले, ते अजूनही चालू आहे दुसरा पुलकेशी राजा अत्यत पराक्रमी होता त्याने आपल्या राज्याची सीमा उत्तरेकडील लाट देशापर्यंत भिडवली सातव्या शतकापासून पाचशे वर्षे लाट आणि आध्र हा भाग कर्नाटकच्या राजाच्या अमलाखाली होता इतकेच नव्हे तर कनोजचा सम्राट हर्षवर्धन याचा पराभव करून दुसऱ्या पुलकेशीने आपल्या पराक्रमाचे अत्युच्च शिखर गाठले.

चालुक्य वंशातील दुसऱ्या विक्रमादित्याने गुजरातवरील अरबाचे आक्रमण परतून लावले होते नंतर मात्र ही राजवट ऱ्हास पावू लागली व राष्ट्रकूट राजे उदय पावले. त्यानी जोपासलेली सस्कृती मात्र टिकून राहिली चालुक्यापैकी सहाव्या विक्रमादित्याने स्वत च्या नावाने विक्रम शक चालू केला त्याचा प्रारंभ इ स १०७६ हा होता. चालुक्याच्या कारकीर्दीत चित्रकला, वास्तुशास्त्र आणि शिल्पकला याचा फार मोठा विकास झाला याच काळात कानडी भाषेचा विकास झाला आणि ती महाकाव्ये निर्माण करण्याइतकी समर्थ झाली

कलचुरींनी कर्नाटकावर ११५६ ते ११८३ या अल्पकाळात राज्य केले बसवराज याचा धार्मिक क्षेत्रातील उदय याच राजवटीत झाला. हिंदू धर्मात सुधारणा झाली पाहिजे असे आवाहन करणारा वीरशैव पथ याच काळात कर्नाटकात सुरू झाला शिवभक्तापैकी जे वीरशैव ते सतत गळ्यात शिवलिंग बाधतात, त्यामुळे ते लिंगायत या नावानेही ओळखले जाऊ लागले ते फक्त शिवालाच मानतात व शरण जातात म्हणून शिवशरण हेही त्यांना नाव पडले रेणुकाचार्य, मरुळसिद्ध, एकोराम, पडिताराध्य आणि किश्वाराध्य हे वीरशैव पंथाचे मूळ संस्थापक. बसवेश्वराने या पथाचा स्वीकार केला आणि त्याला तत्त्वज्ञानाची बैठक देऊन त्याचा प्रसार केला कलचुर्यांची कर्नाटकवरची राजवट तुलनेने कमी कालावधीची असली तरी तिचा कर्नाटकाच्या धार्मिक विचारसरणीवर दूरगामी परिणाम झाला

❑

# २. इतिहासकालीन कर्नाटक

चालुक्यानंतर आठव्या शतकात कर्नाटकावर राष्ट्रकुटाचा अमल आला. या घराण्याची स्थापना दंतिदुर्ग याने केली. विशाल कर्नाटकावर राज्य करणारे राष्ट्रकूट राजे इतके सामर्थ्यवान होते की त्याचा प्रभाव रामेश्वरपासून हिमालयापर्यंत जाणवत होता. याच घराण्यातील पहिला कृष्ण राजाने औरंगाबादजवळच्या वेरूळ येथील जगप्रसिद्ध कैलास मंदिर उभारले आणि भारतीय शिल्पकलेचा आदर्श घालून दिला. राष्ट्रकुटांच्या तिसऱ्या गोविंद राजाने प्रतिहार आणि पाल या राजाचा पराभव केला आणि पल्लव राजानाही नमविले. त्यानतर नृपतुग या पराक्रमी राजाने इ स ८१४ पासून पासष्ट वर्षे राज्य केले. तो साहित्य व कला ह्याचा प्रेमी होता त्याचा राजकवी श्रीविजय याने 'कविराजमार्ग' हा सर्वात प्राचीन ग्रथ लिहिला या महाकाव्यावरून त्या काळच्या कन्नड सस्कृतीची कल्पना येते नृपतुग हा जैन असल्याने अहिंसावादी होता आणि युद्धाच्याविरोधी होता त्यामुळे त्याच्या प्रदीर्घ कारकीर्दीत साहित्य व कला यांची भरपूर वाढ झाली. आजही बगलोरमध्ये या नृपश्रेष्ठाच्या नावाचा एक मोठा रस्ता आहे

आदिपपा हे कानडीतील सर्वश्रेष्ठ महाकवी. ते दहाव्या शतकातील किंबहुना दहावे शतक हा कानडी साहित्यातील सुवर्णयुगाचाच काळ मानतात. एलिफटा (घारापुरी) येथील लेणी या काळातील आहेत. तसेच कैलास येथील लेणीही याच काळातील

१००५ ते १३४५ हा काळ होयसाळ राजाच्या राजवटीचा आहे. होयसाळ या नावामागे एक उद्बोधक दतकथा आहे. होयसाळ या नावाचा इतिहास असा आहे की, मुडगिरी तालुक्यातील एका गावी वासंतिका मदिरात एक साधू तप करीत असता एक जैन तरुण तिथे पूजाअर्चा करण्यासाठी गेला त्या तरुणाचे नाव सळ असे होते. तो मंदिरात गेला असता मागून एक वाघ आला साधूला अतर्ज्ञानाने वाघ आल्याचे समजले.

त्याने सरळ यास उद्देशून 'होय साळ' (म्हणजे मार) असा आदेश दिला. त्याबरोबर त्या इसमाने कोयत्याने वाघास मारले. साधूने संतोष पावून त्या इसमास राजलक्ष्मी मिळेल असा आशीर्वाद दिला तेव्हापासून हा वंश होयसाळ नावने ओळखला जाऊ लागला

होयसाळ घराण्याने जी अनेक मंदिरे बांधली, त्या सर्वांवर त्याचे हे चिन्ह आहे हळेबीड आणि बेलूर येथील जगप्रसिद्ध मंदिरे ही होयसाळांच्या कारकीर्दीतील शिल्पकलेची अत्युच्च उदाहरणे आहेत होयसाळ वंशीय महत्त्वाकांक्षी राजानी तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील भागाचे सार्वभौमत्व घेतले होयसाळ हे दोर समुद्रचे (हळेबीडचे). त्यानी आणि देवगिरीच्या यादवानी चालुक्याचे विशाल साम्राज्य वाटून घेतले

होयसाळ वंशातील महत्त्वाच्या राज़ात विष्णुवर्धनाचा समावेश होतो त्याच्याच कारकीर्दीत रामानुज याचा श्रीवैष्णवपंथ निघाला विष्णुवर्धनाने हा पंथ स्वीकारल्याने त्याला राज्यमान्यता मिळाली होयसाळापैकी दुसरा बल्लाळ हा महान योद्धा आणि प्रशासक होता त्याच्याच कारकीर्दीत यादव आणि होयसाळ यांच्यातील लढ्याला अंतिम स्वरूप आले दुसऱ्या बल्लाळाच्या कारकीर्दीत मुसलमानानी दक्षिणेवर स्वाऱ्या करून १३१० ते १३२७ या काळात बराच विध्वंस केला मात्र कला आणि साहित्य याचा विकास चालूच राहिला

विजयनगरचे साम्राज्य हे कर्नाटकच्या इतिहासातील उज्ज्वल प्रकरण आहे मुसलमानानी दक्षिणेकडील हिंदू राज्यांना अपूर्व असा हादरा दिला त्या निराशेच्या अंधकारमय परिस्थितीत विजयनगरच्या साम्राज्याचा सूर्य उगवला

विजयनगरचे सम्राट हे संगम, साळुवा, तिळुवा आणि अरविडू या चार वंशातील होते. त्यापैकी संगम घराण्यातील दुसरा देवराय हा १४२२ ते १४४६ ह्या काळात होऊन गेला तिळुवा घराण्यातील कृष्णदेवराय याचा काळ १५०९ ते १५२१ पर्यंत होता या दोन्ही राजानी आपली कारकीर्द कीर्तिमान आणि वैभवशाली केली. विजयनगरच्या राजानी संपूर्ण दक्षिण भारतावर आपली सत्ता स्थापन केली तेव्हा शृंगेरीचे शंकराचार्य हे जगद्‌गुरू म्हणून ओळखले जाऊ लागले विजयनगरचे राजे हे धार्मिक वृत्तीचे होते त्याना 'वैदिकमार्ग प्रवर्तक' असा किताब होता. राजाने धर्माचे रक्षण

करावे ही भारतात प्राचीन काळापासून रुढी आहे पाश्चात्त्य देशातही इग्लडच्या राणीला अथवा राजाला 'डिफेंडंट ऑफ फेथ' असा किताब आहे. विजयनगरचे राजे कानडी अक्षरात कोरलेली विरुपाक्षची मुद्रा वापरीत असत या वंशातील हरिहर राजाने मथुरेच्या सुलतानाचा पराभव करून आपले राज्य लकेपर्यंत वाढविले होते त्याच्या पदरी जबरदस्त नौदल होते 'तीन समुद्राचा राजा' असा त्याला किताब होता सायण आणि मध्व हे प्रकाड पडित याच्याच कारकीर्दीत झाले.

दुसऱ्या देवरायाच्या कारकीर्दीत कर्नाटकाने अधिक प्रगती केली केरळमधील सस्थानिक व क्विलोनचा राजा त्या काळी देवराय राजाला खडणी देत असत अलीम रामराय हा कृष्णदेवरायचा जावई त्याने आपल्या हाती सत्ता घेतल्यानतर सैन्यातील काही महत्त्वाच्या जागा मुसलमानाना दिल्या, त्यामुळे मुस्लिम विरुद्ध मुस्लिम असे लढायाचे स्वरूप आले; पण लवकरच रामरायाचा हा कावा मुसलमानानी ओळखला. मुसलमानानी एकजूट केली राक्षसतागडीची लढाई निर्णायक ठरली. या लढाईत राजारामरायचे दोन प्रमुख सेनानी विरुद्ध पक्षाला मिळाले या लढाईत रामराय मारला गेला त्याबरोबर विजयनगरच्या सैन्यात पळापळ झाली मुसलमानानी त्या पळणाऱ्या सैनिकाचा पाठलाग करून त्याना कापून काढले जानेवारी १५६५ मध्ये झालेल्या या राक्षसतागडीच्या लढाईतील विजयानंतर मुसलमानानी सतत सहा महिने हपी या विजयनगरच्या राजधानीची लुटालूट केली आणि प्रचड विध्वस केला.

विजयनगरचे साम्राज्य लयास गेल्यानतरच्या काळात कर्नाटकाची छकले झाली अनेक लहान लहान राज्ये स्वतत्र झाली त्यात येळहाक प्रभू विशेष उल्लेखनीय आहेत कारण त्यानी बंगलोरची स्थापना केली. पहिल्या शतकातील काही रोमन नाणी व वस्तू बगलोरच्या उत्खननात सापडल्या आहेत त्यामुळे त्या काळात रोमशी व्यापार करणारे बगलोर हे इतर कोणत्या तरी नावाने मशहूर असावे, पण नतरच्या काळात त्याचा ऱ्हास झाला. येळहाक प्रभू हे विजयनगरचे माडलिक होते, पण विजयनगरच्या लयानतर ते स्वतत्र झाले त्यांच्यातील पहिल्या केम्पनगौडाने बगलोरची स्थापना केली त्याने केम्पाबुधी नावाचा तलाव बाधला आणि बसवेश्वर मदिरासमोर अकरा फूट उचीचा भव्य दगडी नदी बसवला त्याने

शहराभोवती चार मनोरे बांधले निरीक्षणासाठी आणि संभाव्य आक्रमणाची पूर्वसूचना मिळविण्यासाठी त्याचा उपयोग होऊ लागला. जगातील दोन महान योद्ध्यांचे वास्तव्य बंगलोरमध्ये झाले आहे छ शिवाजी महाराज बालपणी या गावात राहत होते आणि नंतर इंग्लंडचे पंतप्रधान झालेले विन्स्टन चर्चिल याच शहरात सैनिकी शिक्षण घेत होते १६८७ साली बंगलोर हे म्हैसूरमध्ये समाविष्ट झाले

म्हैसूरचे वडियार हे कर्नाटकाच्या इतिहासातील अतिशय महत्त्वाचे राजघराणे आहे यदुराज हे या घराण्याचे संस्थापक चौदाव्या शतकाच्या अखेरीस हे घराणे उदयास आले दोनशे वर्षे एक लहान संस्थान म्हणून दिवस काढल्यानंतर विजयनगर साम्राज्याच्या पाडावानंतर वोडियार बलिष्ठ झाले त्यांनी 'कर्नाटक चक्रवर्ती' हे अभिमानास्पद बिरूद धारण केले रणधीर कंठीरव नरसराज वोडियार याने प्रथम म्हैसूरचे स्वातंत्र्य जाहीर केले त्याने कंठीरव वराह ही नाणीही पाडली अनेक शत्रूंना नेस्तनाबूत करून त्याने म्हैसूरची प्रतिष्ठा मजबूत केली त्यानंतर देवराज वोडियार (१६५९ ते १६७३) आला त्याने चामुंडी टेकडीवर एक हजार पायऱ्या बांधल्या आणि अर्ध्या चढणीवर मोठा नंदी बसविला नंतर आलेला चिक्कदेवराज हाही पराक्रमी होता त्याने विजापूरच्या सुलतानाला पायबंद घातला आणि इतरही अनेकांच्या स्वाऱ्या परतवून लावल्या त्याने आपल्या राज्याचा विस्तार करून बंगलोरवर ताबा मिळविला राज्यभर टपाल व्यवस्था प्रथम त्यानेच स्थापन केली अठरा परगण्यात राज्याची शासनव्यवस्था विभागून त्याने ती मजबूत केली त्याने नऊ कोटी पगोडे (त्या वेळचे नाणे) खजिन्यात शिल्लक ठेवले म्हणून तो नवकोट नारायण या नावाने ओळखला जातो त्याने कापडधंद्याला उत्तेजन देण्यासाठी बंगलोरमध्ये बारा हजार विणकर आणले इतर उद्योगधंदे व शेतीला बरकत आणली धरणे, कालवे व मंदिरे बांधून राज्याची भरभराट केली म्हैसूर हे दक्षिणेतील एक संपन्न राज्य आहे

मात्र चिक्कदेवरायनंतरचे वोडियार राजे तितके कर्तबगार निघाले नाहीत म्हैसूरमध्ये दलवई आणि सेनापती यांच्या हाती सूत्रे राहिली ती जवळजवळ एक शतकपर्यंत या काळात टिपू सुलतानचा उदय झाला आणि ब्रिटिशांनीही आपली सावध पावले टाकून कावेबाज राजकारण सुरू

केले. टिपू सुलतानाविरुद्ध ब्रिटिशांनी निजामचे व मराठ्याचे साहाय्य मिळवले. त्यानी टिपू सुलतानाचा पराभव करून निजामाला रायचूर, गुलबर्गा व बिदर हा भाग दिला आणि उत्तर कर्नाटक मराठ्याच्या नियंत्रणाखाली दिले. म्हैसूरचे स्वातत्र्य ब्रिटिशानी मान्य केले पण ते माडलिक म्हणून. सागरकिनारी पट्टा ब्रिटिशानी आपल्याकडे ठेवला.

चौथे कृष्णराज वोडियार हा म्हैसूरचा महत्त्वाचा राजा एम विश्वेशरय्या अय्यर आणि मिर्झा इस्माईल या महान मत्र्याचे नेतृत्व त्याला लाभल्याने त्याच्या कारकीर्दीत म्हैसूरची अपूर्व प्रगती झाली. त्याने सस्थानच्या कारभारात लोकप्रतिनिधींना समाविष्ट करून घेतले १८९१ मध्ये निवडणूक पद्धती सुरू करून विधिमडळही स्थापन केले. १९१६ साली म्हैसूरमध्ये विश्वविद्यालय सुरू झाले. जलविद्युत प्रकल्प भारतात प्रथम सुरू झाले ते म्हैसूरमध्ये लोखंड, सिमेंट, साखर वगैरेचे कारखाने सुरू होऊन या भागात औद्योगिक क्राती झाली १९४७ साली भारत स्वतत्र झाल्यानतर इतर अनेक सस्थानांप्रमाणे म्हैसूरही भारतात विलीन झाले. कर्नाटकाच्या विकासात म्हैसूरच्या वोडियाराचा सिंहाचा वाटा आहे, तसेच केळदीच्या नायकानीही या विकासाला मोठा हातभार लावला विजयनगरच्या पाडावानतर १५५७ ते १७६३ पर्यंत नायकाचे राज्य गोव्यापासून कॅननोरपर्यंत पसरले होते केळदीच्या अठरा राजापैकी शिवाप्पा नायकाची राजवट सर्वात वैभवशाली होती त्याने स्वतःचे 'इक्केरी वराह' हे सोन्याचे नाणेही सुरू केले होते. याच वशातील सुप्रसिद्ध राणी चेन्नम्मा ही महापराक्रमी निघाली छ राजाराम हिच्या आश्रयाला आले असता हिने त्याचे औरगजेबापासून रक्षण केले औरगजेबाने आपले बलाढ्य सैन्य पाठवले, पण राणी चेन्नम्माच्या शौर्यापुढे त्या सैन्याला पराभव पत्करावा लागला मात्र पुढे हैदरअलीने नायकाचा पराभव केला आणि राजधानी बिदनूरचे नाव बदलून हैदरनगर असे ठेवले

१९५१ साली आंध्रचे नेते पोट्टी श्रीरामलू यांनी स्वतंत्र आंध्रच्या स्थापनेसाठी उपोषण केले व त्यात त्याचा अंत झाला त्यानंतर भारत सरकारने आध्र राज्याच्या स्थापनेस मान्यता दिली या घटनेनंतर संयुक्त महाराष्ट्र, संयुक्त कर्नाटक इत्यादींच्याही आदोलनास जोर आला. पं नेहरू हे पंतप्रधान असताना आजच्या कर्नाटक या राज्याची १९५६ मध्ये स्थापना

झाली म्हैसूर सस्थान, निजामाच्या हैद्राबाद सस्थानचा पश्चिम भाग, मद्रास राज्यातील कॅनरा आणि बेल्लारी हे जिल्हे आणि मुबई प्रातातील निपाणी, बेळगाव, कारवार हा भाग मिळून हे स्वतंत्र राज्य झाले

भौगोलिकदृष्ट्या कर्नाटकचे तीन भाग पडतात : १) खालाटी, २) घाट व ३) उत्तर कर्नाटक. अरबी समुद्राची दोनशे मैल लांब किनारपट्टी कर्नाटकला लाभली आहे दहा ते चाळीस मैल रुंद अशी ही पट्टी निसर्गसौंदर्याने नटलेली असून कारवार, मगलोर, गोकर्ण अशी नयनरम्य स्थळे या किनारपट्टीवर आहेत शरावती, तदडीकाळी, तपडी, गंगावणी या नद्या या भागात आहेत या नद्याच्या मुखाशी कारवार, कुमण, होनावर, अंकोला, भटकळ ही बदरे आहेत.

घाट विभागाला मलेनाड असे नाव आहे हा भाग नद्या, जगले, सुपीक प्रदेश यानी समृद्ध आहे घटप्रभा, कावेरी, तुगभद्रा या नद्या या घाटातून उगम पावतात. घाट प्रदेशाची उची कोठे सहा हजार फूट तर कोठे एक हजार फूटपर्यंत आहे. नारळ, भात, तबाखू, कापूस ही पिके घाटात होतात. निलगिरी भागात चहाचे मळे आहेत आणि कूर्ग हा भाग कॉफीच्या पिकासाठी प्रसिद्ध आहे उत्तर कर्नाटक हा कर्नाटकचा तिसरा भाग या भागात मच्छिमारी, मीठ व शेती होते कोलार येथे सोन्याच्या खाणी असून भारतातील एकदर सोन्यापैकी ऐंशी टक्के सोने कोलार येथील खाणीतून येते विजापूर, बेल्लारी, चित्रदुर्ग या विभागात दरसाल साठ सेंटिमीटर्स पाऊस पडतो. बगलोर, बेळगाव, धारवाड विभागात दरसाल ७० ते १८० सेंटिमीटर्स आणि उत्तर व दक्षिण कॅनरा, कूर्ग, शिमोगा भागात दोनशे सें. मी पर्यंत पाऊस पडतो.

❑

# ३. प्रेक्षणीय बंगलोर आणि श्रीरंगपट्टण

बंगलोर या शहराला हे नाव कसे पडले, याची कथा अशी आहे की राजा कें‌‌. ‌, गौडा एकदा शिकारीला गेला असता रस्ता चुकला त्याला अतिशय भूक लागली. त्याला एक झोपडी दिसली त्या झोपडीतील वृद्ध स्त्रीने त्याला 'बेंधा कलुरू' म्हणजे उकडलेले घेवडे खायला दिले त्याची कृतज्ञ आठवण म्हणून त्याने जेव्हा १५३७ मध्ये हे शहर वसविले तेव्हा त्याचे नाव 'बेंधा कलुरू' असे ठेवले व त्याचा अपभ्रंश होऊन बगलोर हे नाव रूढ झाले पहिला केंपन गौडा या राजाने बळकट असा मातीचा किल्ला बाधला आणि गावाभोवती चार टेहळणी-बुरूज बाधले हे बुरूज आजही बगलोर शहरात पाहावयास मिळतात उत्कृष्ट तलाव, बेल्लारी रस्ता, लालबाग आणि गवी गधरे धर या चार ठिकाणी हे बुरूज आहेत अर्थात गेल्या चारशे वर्षांत शहराचा विस्तार फार मोठ्या प्रमाणावर झाला आहे आता बंगलोर शहराची लोकसख्या ४० लक्ष आहे बगलोरचे हवामान अत्यत आल्हाददायक आहे बगलोरचे तपमान २५ सें च्या आसपास असते मे महिन्यात ते ३४ पर्यंतच चढते आणि डिसेबरमध्ये १५ सेंटिग्रेडपर्यंत खाली येते बगलोरची हवा कोरडी असल्याने आरोग्यास पोषक असते बगलोरचे सरासरी पर्जन्यमान ८७ सेंटिमीटर्स आहे

व्यकटरमणचे येथील देवालयही प्रसिद्ध आहे या व्यकटरमण मदिराजवळच टिपू सुलतानचा राजवाडा आहे. टिपू सुलतान हा म्हैसूरचा राजा हैदर अली याचा मुलगा जन्म १७५३ मध्ये आणि मृत्यू १७९९ मध्ये झाला गादीवर येण्यापूर्वीपासून त्याला लढाईचा सराव होता. तो निष्णात योद्धा व युद्धशास्त्रतज्ज्ञ होता मराठ्यानी घेतलेला मुलुख परत मिळविण्यासाठी १७७३ साली हैदर अलीने टिपूची योजना केली होती व त्याने काही परतही मिळविला टिपू हा शूर पराक्रमी होता इग्रजासारख्या आधुनिक शस्त्रानी युक्त असलेल्या शत्रूलाही त्याने १७८० साली हरविले सेनापती बेली आणि नतर कर्नल ब्रेथवट या दोघानाही त्याने लागोपाठच्या लढायांत हरवून सैन्यासह कैद केले हैदरच्या मृत्यूनतर १७८२ साली टिपू

# ३. प्रेक्षणीय बंगलोर आणि श्रीरंगपट्टण

बगलोर या शहराला हे नाव कसे पडले, याची कथा अशी आहे की राजा कें ् गौडा एकदा शिकारीला गेला असता रस्ता चुकला त्याला अतिशय भूक लागली त्याला एक झोपडी दिसली त्या झोपडीतील वृद्ध स्त्रीने त्याला 'बेंधा कलुरू' म्हणजे उकडलेले घेवडे खायला दिले त्याची कृतज्ञ आठवण म्हणून त्याने जेव्हा १५३७ मध्ये हे शहर वसविले तेव्हा त्याचे नाव 'बेधा कलुरू' असे ठेवले व त्याचा अपभ्रश होऊन बगलोर हे नाव रूढ झाले पहिला केंपन गौडा या राजाने बळकट असा मातीचा किल्ला बाधला आणि गावाभोवती चार टेहळणी-बुरूज बांधले हे बुरूज आजही बगलोर शहरात पाहावयास मिळतात. उत्कृष्ट तलाव, बेल्लारी रस्ता, लालबाग आणि गवी गधरे धर या चार ठिकाणी हे बुरूज आहेत अर्थात गेल्या चारशे वर्षांत शहराचा विस्तार फार मोठ्या प्रमाणावर झाला आहे आता बंगलोर शहराची लोकसख्या ४० लक्ष आहे बगलोरचे हवामान अत्यंत आल्हाददायक आहे बगलोरचे तपमान २५ सें च्या आसपास असते. मे महिन्यात ते ३४ पर्यंतच चढते आणि डिसेबरमध्ये १५ सेंटिग्रेडपर्यंत खाली येते. बगलोरची हवा कोरडी असल्याने आरोग्यास पोषक असते बगलोरचे सरासरी पर्जन्यमान ८७ सेंटिमीटर्स आहे

व्यकटरमणचे येथील देवालयही प्रसिद्ध आहे या व्यंकटरमण मदिराजवळच टिपू सुलतानचा राजवाडा आहे टिपू सुलतान हा म्हैसूरचा राजा हैदर अली याचा मुलगा जन्म १७५३ मध्ये आणि मृत्यू १७९९ मध्ये झाला गादीवर येण्यापूर्वीपासून त्याला लढाईचा सराव होता तो निष्णात योद्धा व युद्धशास्त्रतज्ज्ञ होता मराठ्यानी घेतलेला मुलुख परत मिळविण्यासाठी १७७३ साली हैदर अलीने टिपूची योजना केली होती व त्याने काही परतही मिळविला टिपू हा शूर पराक्रमी होता इग्रजासारख्या आधुनिक शस्त्रानी युक्त असलेल्या शत्रूलाही त्याने १७८० साली हरविले सेनापती बेली आणि नतर कर्नल ब्रेथवट या दोघानाही त्याने लागोपाठच्या लढायात हरवून सैन्यासह कैद केले हैदरच्या मृत्यूनतर १७८२ साली टिपू

गादीवर आला त्याने फ्रेंच सैन्याचीही मदत मिळविली होती टिपू हा आक्रमक योद्धा म्हणून प्रसिद्ध होता इग्रजानी त्याचा बिदनूर प्रात घेतला तेव्हा टिपूने मगलोर शहरास नऊ महिने वेढा देऊन इग्रजाना नामोहरम केले पराभव होत आहे असे दिसले की तह करावा, पण परिस्थिती अनुकूल होताच बेधडक तह मोडून शत्रूवर आक्रमण करायचे असे त्याचे बेभरवशाचे धोरण होते


कॉर्नवॉलिस, निजाम व मराठे हे एकत्र झाले आणि त्यानी टिपूचा मलबार प्रात घेतला. पण लगेच टिपूने तह केला व लढाई सपवली या वेळी मराठ्याच्यातर्फे परशुराम भाऊ व फडके यानी नेतृत्व केले टिपूने आतरराष्ट्रीय सबधही जोडले होते सम्राट नेपोलियनने भारतावर स्वारी करण्याचा मनसुबा रचला आहे हे टिपूला समजले तेव्हा त्याने १७९८ साली नेपोलियनला पत्रे लिहून आपण मदत करण्यास तयार आहोत असे कळविले होते इराण, तुर्कस्थान इत्यादी देशातही टिपूने आपले वकील पाठविले होते इग्रज हा आपला प्रथम व सर्वात धोकादायक शत्रू आहे हे टिपूने ओळखले होते त्याने फ्रेचाशी मैत्री करून इग्रजाना नामोहरम करण्याचा बेत आखला यावेळी निजाम व मराठे यांनी टिपूस साथ दिली असती तर भारतात इग्रज पाय रोवू शकले नसते आणि भारताचा इतिहास बदलला असता टिपूला अधिक बलिष्ठ होऊ द्यायचे नाही म्हणून वेलस्ली याने टिपूवर फेब्रुवारी १७९९ मध्ये स्वारी केली या लढाईत टिपू श्रीरगपट्टण येथे ठाण माडून बसला होता इग्रजानी श्रीरगपट्टणला वेढा दिला त्यावेळी टिपू अपूर्व शौर्याने लढला, पण पट्टणच्या वेशीत इग्रजाना अडविण्याचा प्रयत्न करीत असताना त्याच्या डोक्यात गोळी घुसली आणि तो मरण पावला (४ मे १७९९) टिपूच्या मृत्यूच्या वेळी त्याच्या राज्याचे उत्पन्न साडेतीन लाख होन म्हणजे एक कोटी सहा लक्ष रुपयाचे होते ते इग्रज, मराठे व निजाम यानी आपसात वाटून घेतले

टिपू सुलतानाने १७८६ साली 'बादशहा' हे बिरूद स्वत स लावून घेतले 'खुदाद सरकार' असे म्हैसूर राज्याचे नाव ठेवून स्वत चे पचाग सुरू केले वाघ हा टिपूचा आवडता प्राणी होता टिपूचे सिंहासन अष्टकोनी होते व आठही बाजूना वाघाची तोडे होती हे सिंहासन सपूर्ण सोन्याचे होते. वाघ हे त्याचे राजचिन्ह होते टिपूचे सुवर्णसिंहासन, त्याची रत्नजडित

तलवार आणि इतर मौल्यवान वस्तू सध्या लडन येथील वस्तुसग्रहालयात आणि विंडसर कॅसलमध्ये आहेत टिपू हा कलेचा व वाङ्मयाचा भोक्ता होता त्याने हजारो संस्कृत, उर्दू, फारशी ग्रथ याचा मोठा संग्रह केला होता. त्याचा राज्यकारभार शिस्तीचा होता. तो आपले हुकूम स्वत· लिहीत असे त्याने हजारो हिंदूंना जुलुमाने मुसलमान केले त्याच्या मृत्यूनतर १८०० साली वेलोर येथे शिपायांनी इंग्रजाविरुद्ध बड केले त्या बडास टिपूच्या मुलाची चिथावणी आहे असा आरोप ठेवून इग्रजांनी त्याची जहागीर जप्त केली आणि त्यांना कलकत्ता येथे कारावासात ठेवले टिपूने स्वत: दोन ग्रथ लिहिले असून ते कलकत्ता येथील वस्तुसंग्रहालयात आहेत टिपूचे खरे नाव फत्ते अल्लीखान असे होते व त्याला बारा मुले होती शूर, पराक्रमी, महत्त्वाकांक्षी, कर्तबगार; पण क्रूर व विश्वासघातकी अशी कीर्ती व अपकीर्ती टिपू सुलतानने मिळविली.

टिपूच्या बगलोर येथील वाड्याला टिपूचा राजवाडा असे जरी नाव असले तरी त्याच्या बाधकामाची सुरुवात हैदर अलीने १७८१ मध्ये केली. नतर दहा वर्षांनी टिपू सुलतानने हा वाडा पूर्ण केला हा वाडा दुमजली आहे त्याचा विशेष असा की, त्याचे ऐंशी टक्के बाधकाम लाकडाचे आहे श्रीरगपट्टण येथील दर्या दौलत या टिपूच्या वाड्याच्या धर्तीवर हा वाडा बाधण्यात आला आहे वाड्यात दोन मोठे दिवाणखाने आहेत व त्याना जोडणारा पॅसेज आहे नक्षीदार लाकडी खांब आणि टिपूच्या जीवनातील विविध प्रसगाची भिंतीचित्रे यामुळे हा वाडा विशेष प्रेक्षणीय झाला आहे टिपूच्या चार मुलांना इंग्रजानी ओलीस ठेवले होते, त्या मुलांची चित्रे हृदयद्रावक आहेत. टिपूच्या जीवनातील काही महत्त्वाच्या लढायाचीही प्रभावी चित्रे इथे पाहावयास सापडतात. वाड्याच्या छतावरही सुदर चित्रे आहेत

बगलोर हे उद्यानाचे शहर म्हणून प्रसिद्ध आहे लालबाग हे बगलोरचे प्रशस्त उद्यान लक्षात राहण्यासारखे आहे २४० एकरावर पसरलेले हे उद्यान म्हणजे बगलोरची शान आहे. घनदाट वृक्ष, नयनमनोहर विस्तीर्ण हिरवळी, चमचमत उडणारे कारंजे, फुलांचे ताटवे इत्यादींनी हे उद्यान सुशोभित केले आहे याच उद्यानात म्हैसूर हॉर्टिकल्चरल सोसायटी आणि मत्स्यालय आहे. म्हैसूरचे महाराज चामराज ओडियर यांचा सुबक



बगलोरची लालबाग


अश्वारूढ पुतळाही येथे आहे ग्लास हाऊस हे लालबागेचे खास आकर्षण आहे त्याचा आकार अधिक चिन्हासारखा आहे अठरा हजार चौरस फूट क्षेत्रफळ असलेल्या या काचेच्या घरात १९६९ सालचे काँग्रेस अधिवेशन भरले होते. इदिरा गाधीना पक्षातून काढून टाकण्याचा ठराव पक्षाने याच अधिवेशनात केला आणि इदिरा गांधींनी वेगळी काँग्रेस काढली इग्लडचे प्रिन्स ऑफ वेल्स यानी १८८९ साली बगलोरला भेट दिली होती तेव्हा त्यानी या काचमहालाची पायाभरणी केली होती लडन येथे असाच क्रिस्टल हॉल आहे त्याच धर्तीवर या काचगृहाची योजना केली आहे लालबागला फार जुना इतिहास आहे. हैदर अलीने १७६० पासून या उद्यानाचा शाही बाग म्हणून वापर करण्यास सुरुवात केली होती पुढे ब्रिटिश आमदानीत येथे बोटॅनिकल गार्डन झाली आजच्या उद्यानाचे आधुनिक व रेखीव स्वरूप ही दिवाण मिर्झा इस्माईल याची देणगी आहे

कबन पार्क हे केवळ उद्यान नसून त्यात दोन नामवंत वस्तुसंग्रहालयेही

आहेत सर मार्क कबन हे या भागात ब्रिटिश कमिशनर होते त्याच्या नावाने तीनशे एकर विशाल क्षेत्रात हे उद्यान तयार करण्यात आले आहे या उद्यानात कर्नाटकचे सरकारी वस्तुसग्रहालय आहे. १८६६ साली स्थापन झालेले हे वस्तुसग्रहालय भारतातील एक अत्यत जुने आहे त्यात प्रवेश केल्यावर तळमजल्यावर श्रीरगपट्टणच्या किल्ल्याची प्रतिकृती दिसते जुन्या राजघराण्यातील अनेक कलात्मक वस्तू येथे आहेत. हस्तिदताचे काम केलेले टेबल, तबके, रोझवूडचे फर्निचर वगैरे प्रेक्षणीय वस्तू आहेत वाद्याचेही अनेक दुर्मिळ नमुने आहेत. मात्र या प्रकारात पुण्याचे केळकर म्युझियम हे उजवे वाटते. चदनाच्याही अनेक कलात्मक वस्तू या विभागात आहेत. डमरू वाजविणारा गणपती, शिवपार्वती वगैरेंच्या देखण्या मूर्ती चदनात कोरल्या आहेत. म्हैसूर भागात चदन मोठ्या प्रमाणावर होते, त्याचाच हा परिपाक आहे होयसाळकालीन मूर्तीचे दालन विशेष लक्षात राहते कर्नाटकात अनेक मदिराची पडझड झाली जी मदिरे जीर्णोद्धार करण्याच्या पलीकडे पडली, त्यातील मूर्ती अशा प्रदर्शनात जतन करून ठेवण्यात आल्या आहेत इ स एक हजार ते तेराशे या कालातील या दगडी मूर्ती होयसाळाच्या उत्कृष्ट कलेचे नमुने आहेत

या सरकारी सग्रहालयाच्या वरच्या मजल्यावर पेंढा भरलेल्या पशु-पक्ष्याचे दालन आहे लाकूडकामाचे नमुने कलेच्यादृष्टीने विशेष लक्षात राहणारे असे आहेत समुद्रात आढळणारे शख, शिंपले, प्रवाळ इत्यादींचे दालन पाहून मला जरा आश्चर्य वाटले कारण बगलोर शहर हे समुद्रापासून दूर आहे या सग्रहालयाच्या मागे वेंकटप्पा आर्ट गॅलरी आहे के वेकटप्पा या श्रेष्ठ कर्नाटकी चित्रकाराचा जन्म म्हैसूरला व मृत्यू बंगलोरला झाला. त्याच्या काही वस्तूही या प्रदर्शनात ठेवण्यात आल्या आहेत त्याची अनेक व्यक्तिचित्रे व निसर्गचित्रे या ठिकाणी ठेवण्यात आली आहेत वरच्या मजल्यावर मेजर सी पी राजाराम दालन आहे. लाकडातून चित्रे कोरण्याची त्याची हातोटी होती 'दि किस' व 'वुमन ॲण्ड चाइल्ड' ही त्याची काष्ठचित्रे विशेष उल्लेखनीय आहेत इतरही काही निवडक चित्रकाराची चित्रे या दालनात पाहावयास मिळतात

कबन पार्कमधील सरकारी वस्तुसंग्रहालयाशेजारी असलेले सर विश्वेश्वरय्या औद्योगिक आणि तंत्रशास्त्र वसतुसंग्रहालय हे बंगलोरचे खास



**सरकारी संग्रहालय**

वैशिष्ट्य आहे सर विश्वेश्वरय्या हे भारतातील एक अग्रगण्य इंजिनियर त्यानी या क्षेत्रात कर्नाटकचे नाव जागतिक पातळीवर नेले १९६५ साली त्याचे स्मारक म्हणून वस्तुसग्रहालय सुरू झाले विद्यार्थ्यांत आणि इतर सर्वसामान्य जनतेत विज्ञानाविषयी आस्था निर्माण करण्याचे थोर कार्य हे सग्रहालय करीत आहे पहिल्या मजल्यावर मोटिव्ह पॉवर गॅलरी आहे वीज निर्माण करण्यासाठी वारा, पाणी, वाफ याचा उपयोग कसा करण्यात येतो हे येथे हलत्या मॉडेल्सच्या साहाय्याने दाखविले आहे. पॉप्युलर सायन्स या विभागात कालगणना, वजन व मापे, गणित, मायक्रोस्कोप, टेलिस्कोप, दळणवळण इत्यादी क्षेत्रात मानवाने कशी प्रगती केली हे प्रात्यक्षिकाच्या साहाय्याने दाखविले आहे हाताच्या बोटाने मोजण्यापासून मगल कार्यापर्यंत मानवाने केलेल्या प्रगतीचे उत्तम दर्शन येथे घडते हॉलडमध्ये इ स १००० मध्ये टेलिस्कोपचा शोध कसा लागला, कोपर्निकसने कोणती क्राती केली. गॅलिलिओने मानवाला दिलेले वरदान, अणुयुगाचा उदय इत्यादी विषय येथे अतिशय सोप्या पद्धतीने मांडण्यात आले आहेत हा

विभाग अतिशय उद्‌बोधक आहे

चिल्ड्रेन्स सायन्स गॅलरी या विभागात सूर्य, पृथ्वी, ग्रह, तारे इत्यादींची मॉडेल्ससह माहिती दिली आहे अनेक उपकरणे बटन दाबल्यावर चालू होतात *त्यामुळे विद्यार्थ्यांना ती* विशेष आकर्षक वाटतात या ठिकाणी जगातील महत्त्वाच्या सशोधकाची छायाचित्रे लावली असून कोणी कोणता शोध लावला हे मुलानी शोधून काढायचे आहे सूर्यग्रहण व चद्रग्रहण कसे लागते, आपले हृदय कसे काम करते, पृथ्वीचे गुरुत्वाकर्षण म्हणजे काय, लीपइयर कसे मोजण्यात येते, पृथ्वीपासून सूर्याचे अतर १५ कोटी किलो मीटर्स आहे हा प्रवास कसा करता येईल, प्रकाशवर्ष म्हणजे काय, इत्यादी अनेक विज्ञानविषयक प्रश्नाची उत्तरे या वस्तसग्रहालयात सापडतील

बंगलोरच्या कबन पार्क समोरच विधानसौध ही कर्नाटकच्या विधिमंडळाची भव्य, ग्रानाईटची, पाढरी इमारत आहे सातशे फूट लाब व साडेतीनशे फूट रुद अशा या इमारतीत प्रवेश करण्यासाठी पचेचाळीस पायऱ्या चढाव्या लागतात ही लाबलचक इमारत चार दिशाच्या चार सुदर कळसामुळे लक्ष आकर्षून घेते विधानसौधाची इमारत द्राविडीयन शैलीत बाधण्यात आली आहे या चार मजली इमारतीचे उद्‌घाटन १९५४ साली झाले व हिच्या बाधकामास पचवीस कोटी रु खर्च आला हिच्या मुख्य घुमटावर अशोक चिन्ह आहे विधानसौधला सुदर कलात्मक चदनी दरवाजा आहे विधिमडळ सभागृहात ३५० आसने आहेत त्याशिवाय इतर राज्याप्रमाणेच येथेही पत्रकार कक्ष, प्रेक्षक कक्ष वगैरेची सोय आहे

म गाधी रस्त्यावर कर्नाटक राज्य कला व हस्तकला सग्रहालय आहे तिथे बाबू, लाख, लाकूड, माती याच्यापासून तयार केलेल्या कलात्मक वस्तू आहेत याच रस्त्यावर कुटीरोद्योगाचेही सग्रहालय आहे त्यात घरगुती फर्निचर, भेटीदाखल देण्यासारख्या वस्तू इत्यादींचे प्रदर्शन आहे इडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, गाधी भवन, जनपद विश्वस्त निधी सग्रहालय या आणखी काही प्रेक्षणीय संस्था आहेत बसवनगुडी या बगलोरच्या उपनगरातील नदी हा भारतातील एक अत्यत भव्य व प्रेक्षणीय नदी आहे त्याच्या पायाखालून माणूस पलीकडे जाऊ शकतो या टेकडीच्या पायथ्याशी एक गणेश मंदिर आहे व जवळच शिवमदिरही आहे. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या उर्सुल या तलावात नौकाविहाराची

सोय आहे उद्योगधद्याच्या दृष्टीने हिंदुस्थान एअरक्रॅफ्ट फॅक्टरी (विमान कारखाना), टेलिफोनचा कारखाना, भारत हेवी इलेक्ट्रिकल्स, म्हैसूर सँडल सोप कारखाना, एच एम टी घड्याळाचा कारखाना, मोटार कारखाना, म्हैसूर लॅंप वर्क्स, बगलोर डेअरी इत्यादी महत्त्वाचे कारखाने बगलोरमध्ये आहेत बगलोरपासून काही अतरावर नॅशनल पार्क (२१ किलो मीटर्स), चामराजसागर (३५ किलो मीटर्स), चन्नपट्टण (४० किलो मीटर्स), देवराय दुर्ग (७९ किलो मीटर्स), कोलार सोन्याच्या खाणी (९६ किलो मीटर्स) अशी इतरही अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत.

श्रीरंगपट्टण हे कावेरी नदीचे दोन फाटे होऊन पुन्हा मिळाल्याने तयार झालेल्या बेटावर आहे येथे श्रीरगनाथाचे मदिर आहे म्हणून श्रीरंगपट्टण झाले प्राचीन काळी या ठिकाणी गौतम ऋषींनी तपश्चर्या केली होती असे सागतात होयसाळ घराण्यातील राजा विष्णुवर्धन याचा भाऊ उदयादित्य याने स्थापन केलेल्या या शहरावर नतर विजयनगर, म्हैसूर आणि १७९९ पासून इग्रजानी राज्य केले आमची बस लालबाग विभागात थांबली टिपू सुलतानचा पिता हैदर अली आणि माता फातिमा यांच्या कबरी येथे आहेत हैदरचा मृत्यू १७८२ साली झाला कावेरी नदीचे दोन फाटे जिथे मिळतात त्या सगमाजवळ या कबरी बाधण्यात आल्या आहेत. या कबरीचे आवार स्वच्छ व सुदर ठेवण्यात आले आहे कबरीची इमारत चौकोनी आहे. बाहेरच्या बाजूस टिपूची मुलगी, पुतणी, बहीण व जावई याच्या कबरी आहेत. आतील कबरीला जाळीदार नक्षीचे उत्कृष्ट कलात्मक असे तीन दरवाजे आहेत कबरीच्या भोवती काळ्या सगमरवराचे छत्तीस खाब आहेत हा पर्शियाहून आणलेला खास संगमरवर आहे आतील भिंतीवर वाघाच्या कातडीसारखे पिवळ्या रंगावरील काळे पट्टे आहेत कबरीवरील आच्छादने लाल रगाची वस्त्रे आहेत.

श्रीरगपट्टणला रामायण आणि महाभारत यातही स्थान आहे, इतका या स्थळाचा इतिहास प्राचीन आहे श्रीराम लकेकडे जाताना या जागेवरून गेले होते गौतम ऋषींनी येथे कावेरी नदीच्या सगमावर आश्रम बांधून आदिरगाची आराधना केली होती त्यावेळी ते गौतमक्षेत्र म्हणून ओळखले जात होते सातवाहन राजाचा म्हैसूरवर अमल होता तेव्हा श्रीरगपट्टण त्याच्याच ताब्यात होते असे शिलालेख सापडले आहेत पाचव्या शतकात

म्हैसूर व श्रीरगपट्टणवर पल्लव, कदब आणि गग राजाचा अमल होता गग राजाचा अधिकारी तिरुमलय्या याने येथे रगनाथ स्वामी मदिर बाधले इ स १११७ साली होयसाळ राजानी रामानुजाचार्य याना श्रीरगपट्टणसह आठ गावे दिली त्यावेळी या भागात जगल होते पण इ स ११२० मध्ये उदयादित्य याने ते जगल तोडून येथे श्रीरगपट्टण हे गाव वसविले विजयनगर साम्राज्याचा सर्वात पराक्रमी राजा कृष्णदेवराय (१५०९ ते १५२९) याने श्रीरगपट्टणवर ताबा मिळविला त्यानतर तिरुमलाने विजयनगर साम्राज्याची विभागणी करून श्रीरगपट्टणचा भाग आपला दुसरा मुलगा रामराय याला दिला विजयनगरच्या समाप्तीनतर हा भाग म्हैसूरच्या राज्याच्या अमलाखाली आला हे राजे वडियर म्हणून प्रसिद्ध आहेत १६१० नतर हैदरकडे हा भाग येईपर्यंत वडियारनी राज्य केले हैदरनतर टिपू सुलतान हा बादशहा झाला १७९८ साली इग्रजानी हिंदूचा वध करून श्रीरगपट्टण आपल्या राज्यास जोडले



टिपू सुलतानाचा राजवाडा

टिपूच्या राजवाड्याचे नाव दर्यादौलत टिपूने १८७४ साली इग्रजावर जो विजय मिळविला त्याचे स्मारक म्हणून त्याने हा महाल बाधला हा महाल लाकडी आहे या कोरीव काम केलेल्या लाकडी बाधकामास विविध प्रकारचे मनोरम रग देण्यात आले आहेत महालाच्या पहिल्या मजल्यावर वस्तुसग्रहालय आहे तिथे टिपूचा दरबार भरत असे ब्रिटिश अधिकारी आर्थर वेलस्लीने काही काळ या महालात वास्तव्य केले होते महालाच्या भिंतीवर जी चित्रे आहेत त्यात इग्रजाविरुद्ध लढाईसाठी निघालेला हैदर व टिपू आणि त्याचे सरदार व सैन्य याचे चित्र आपले लक्ष वेधून घेते टिपू हा शुभ्र घोड्यावर स्वार झाला आहे त्यावेळी त्याने फ्रेचाचे साहाय्य घेतले होते त्या फ्रेचाचे एक पथकही या चित्रात दिसते या सैन्याचे नेतृत्व ज्या हैदर अलीने केले होते तो हत्तीवर बसलेला आहे टिपू व इग्रज याच्यात झालेल्या युद्धाचे चित्र दुसऱ्या भितीवर आहे या युद्धात टिपूने इग्रजाचा पराभव केला आणि कर्नल बेली याला अटक केली

श्रीरगपट्टणच्या इतिहासप्रसिद्ध किल्ल्यात प्रथमच जुम्मा मशीद लागते टिपू सुलतानने बाधलेल्या या मशिदीत तो नमाज पढण्यासाठी येई व नमाजानतर भाषण करीत असे टिपूला ही मशीद किती प्यारी होती, ते या मशिदीत त्याने लिहून ठेवलेल्या एका वाक्यावरून लक्षात येते उर्दू वाक्य अशा आशयाचे आहे 'आकाशाला जितके चद्राचे महत्त्व, तितकेच श्रीरगपट्टणला या मशिदीचे महत्त्व आहे' श्रीरगपट्टणच्या किल्ल्यात कर्नल बेली व त्याचे ब्रिटिश सैनिक चार वर्षे एका कोठडीत बदिवान होते ती कोठडीही पाहावयास मिळते श्रीरगस्वामींचे मदिर ही किल्ल्यातील महत्त्वाची व पूर्वपरपरा असलेली वास्तू. या ठिकाणी प्राचीन काळी गौतम ऋषी तप करीत होते श्रीरगस्वामींचे मूळ मदिर नवव्या शतकात बाधले गेले, तरी तीनशे वर्षांनी राजानुजम यानी त्याचा जीर्णोद्धार केला व ते वैष्णवपथीयाचे मदिर केले मदिरात शेषशायी विष्णूची मूर्ती आहे. कावेरी व गौतम ऋषी याच्याही मूर्ती मदिरात आहेत

टिपू इग्रजाशी लढताना जिथे मरण पावला, त्या जागेजवळ एक दगड रोवला असून त्यावर चाद आहे त्याखाली लिहिले आहे The body of Tippu Sultan was found here

एका लहानशा चबुतऱ्यावर हा साधा दगड आहे त्यावर कोणतीही छत्री किंवा इतर बांधकाम नाही ४ मे १७९९ रोजी टिपू या ठिकाणी धारातीर्थी पतन पावला त्यानंतर इंग्रजांनी हे बेट म्हैसूरच्या राजाला सालिना पन्नास हजार रु च्या खंडणीने दिले राजधानी श्रीरंगपट्टणहून म्हैसूरला गेली तेव्हा श्रीरंगपट्टण ऱ्हास पावू लागले म्हैसूरच्या वैभवात भर पडत गेली आणि त्या तुलनेत श्रीरंगपट्टण मागे पडले

❑

# ४. महोत्सवी शहर म्हैसूर

म्हैसूर शहरापासून बारा किलोमीटरवरील चामुंडी या टेकडीस विशेष महत्त्व आहे कारण त्या टेकडीवर म्हैसूरच्या राजाची कुलस्वामिनी श्री चामुंडी हिचे मंदिर आहे टेकडीवर दोन्ही बाजूंना रम्य झाडी आणि आपण वरवर जात आहोत, तसे दूरवर पसरलेले म्हैसूर शहर व आसमंत याचे



**चांमूडी टेकडीवरील महिषासूराची मूर्ती**

सुदर दृश्य यामुळे मन प्रसन्न होते टेकडी पायी चढणाऱ्या हौशी लोकासाठी एक हजार पायऱ्याही केलेल्या आहेत म्हैसूर हे नाव ज्या महिषासुरावरून पडल आहे त्याचा पुतळा टेकडीवर प्रथम लागतो चामुडी देवीने या महिषासुराचा वध केला त्याचा पुतळा सिमेंटचा असून तो भडक रगानी रगवलेला आहे. साधारणपणे पुतळे हे दगडाचे किंवा ब्राँझचे असतात त्यामुळे त्याला रग देण्याची पद्धत नाही हा रगीत पुतळा त्याच्या वेगळेपणामुळे लक्षात भरतो म्हैसूरच्या महाराजांचा एक राजवाडा टेकडीवर आहे देवीच्या दर्शनासाठी आल्यावर राजे व राजघराण्यातील इतर लोक तिथे विश्रांती घेत असत

चामुडी देवीच्या मदिराला दाक्षिणात्य पद्धतीचे भव्य गोपुर आहे दसऱ्याच्या आधल्या दिवशी चामुडी टेकडीवर मोठी जत्रा भरते वाद्ये आणि नामाचा गजर यामुळे चागली वातावरणनिर्मिती साधली जाते खेळणी, माळा, प्रसाद, उपाहारगृहे याच्या बाहेर रागा लागलेल्या असतात

देवीच्या दर्शनासाठी मोठमोठ्या रागा लागतात मदिरात भजने चालतात मदिरापासून खाली उतरताना मध्येच काळ्या शिलेचा एक मोठा नदी आहे ही शिळा एकच म्हणजे अखड आहे त्याच्या दुमडलेल्या पायाखालून माणूस जाऊ शकतो एवढा तो नदी मोठा आहे चामुडी टेकडीवरून गावात जाताना सेट फिलोमिना हे भव्य चर्च लागते हे चर्च दक्षिणेतील दुसऱ्या क्रमाकाचे भव्य चर्च आहे. पहिल्या क्रमाकाचे भव्य चर्च मगोलरमध्ये आहे म्हैसूर-बगलोर रस्त्यावरील या सेंट फिलोमिना चर्चची लाबी १६८ फूट आहे चर्चला १६५ फूट उचीचे दोन नक्षीदार मनोरे आहेत. गोथिक पद्धतीचे हे भव्य चर्च १९३१ साली बाधण्यात आले त्याची पायाभरणी म्हैसूरच्या महाराजानी केली होती या चर्चचे व्यासपीठ मोठे व छाप पाडणारे आहे भितीवर बायबलमधील अनेक प्रसगाची चित्रे आहेत या चर्चमध्ये सुमारे आठ-नऊशे लोक सहज मावतील एवढे प्रार्थनागृह मोठे आहे तळघरात मेरी व येशू ख्रिस्त याचे पुतळे आहेत


म्हैसूरचे प्राणिसग्रहालय चागले आहे आफ्रिकेतील रगीत, देखणे पक्षी, पाढरे कावळे, पाणकुत्रे, उराग उटाग, चिंपाझी वगैरे अनेक प्रकारची माकडे येथे आहेत तेथील चिपाझी मुलासाठी खेळ करून दाखवितो त्याशिवाय वाघ, चित्ते, अस्वल, सिंह, हत्ती वगैरे इतर प्राणिसग्रहालयातील प्राणी व

विविध पक्षीही दिसतात जगमोहन पॅलेस या वाड्यात आर्ट गॅलरी आहे हा राजवाडा १८६१ साली बाधला व १९१५ पर्यंत तेथे म्हैसूरचे राजे रहात असत. पण नतर ते नव्या राजवाड्यात गेले त्याला आता महाराजा पॅलेस असे नाव आहे जगमोहन पॅलेसमध्ये असलेली श्री जयचामराजेंद्र आर्ट गॅलरी उत्कृष्ट पुतळे, चित्रे व इतर कलात्मक वस्तूनी समृद्ध आहे प्रथमदर्शनीच्या दोन दालनात म्हैसूरच्या राजघराण्यातील प्रमुख व्यक्तींची तैलचित्रे आहेत ती नामवत चित्रकारांनी काढलेली आहेत राजा रविवर्मा यानी काढलेली अनेक उत्तमोत्तम चित्रे या व इतर दालनात आहेत एका दालनात म्हैसूरच्या दरबारचे भव्य चित्र आहे तसेच टिपू सुलतान, म्हैसूरच्या महाराजाच्या विवाहाची मिरवणूक, दसऱ्याची मिरवणूक, श्रीरगपट्टणची लढाई इत्यादी चित्रे आपले लक्ष वेधून घेतात पुढील दालनात तादळावर काढलेली सूक्ष्म चित्रे मॅग्निफाईंग ग्लासच्या साहाय्याने पाहावयास मिळतात तांदळावर म गाधी, म्हैसूरचे महाराज इत्यादींची सुबक चित्रे पाहून आपण चकित होतो एका दालनात ताजमहाल व इतर विख्यात इमारतींच्या कलात्मक प्रतिकृती आहेत

जयचामराजेद्र आर्ट गॅलरीच्या पहिल्या मजल्यावर अनेक नामवत चित्रकाराच्या कलाकृती आहेत राजा रविवर्मा यानी पौराणिक प्रसगावर काढलेली अप्रतिम चित्रे म्हणजे कलारसिकाना उत्कृष्ट मेजवानीच आहे सीतेला पळवून नेणारा रावण जटायूचे पख तोडतो ते रविवर्मा याचे चित्र येथे पाहायला मिळते तसेच विजनवासातील द्रौपदी, भीष्मप्रतिज्ञा, हंस-दमयती, सागर हटविण्यासाठी बाण मारणारा राम, हरिश्चद्र-तारामती इत्यादी रविवर्मा याची गाजलेले मूळ चित्रे पाहावयास मिळतात हळदणकर याचे 'ग्लो ऑफ होप' हे चित्र विशेष लक्षात राहते ते चित्र एका लहानशा खास खोलीत ठेवलेले आहे जवळजवळ अधार असलेल्या या खोलीत चित्राच्या तळाजवळील दिवा लागतो तेव्हा हातात समई धरलेल्या व समई विझू नये म्हणून तीवर हाताचा आडोसा करणाऱ्या तरुणीचे अत्यत प्रभावी चित्र मनावर छाप पाडते त्या तरुणीच्या चेहऱ्यावर समईचा प्रकाश हुबेहूब पडलेला दिसतो शकुतला पत्रलेखन हे रविवर्मा याचे गाजलेले चित्रही येथे आहे

दुसऱ्या मजल्यावरील एका दालनात वाद्याचे विविध नमुने आहेत मात्र या दालनात मिरज येथील अब्दुल करीम खाँ यांचे तैलचित्र पाहून साश्चर्य आनद वाटतो कारण म्हैसूर हे कर्नाटक सगीताचे आगर आणि अब्दुल करीम खाँ हे उत्तर भारतीय (किराणा) सगीताचे ज्येष्ठ पाईक, जयचामराज वाडियर वस्तुसग्रहालयात शाही खजिन्यातील कौतुकाच्या वस्तू आहेत उदाहरणार्थ, म्युझियम क्लॉक या घड्याळात तासाच्या ठोक्याना लहान आकाराच्या सैनिकाची परेड निघते आणि बँड ऐकू येतो हे घड्याळ राणी व्हिक्टोरिया यानी म्हैसूरच्या महाराजाना भेट म्हणून दिले होते हैदराबादच्या सालरजग वस्तुसग्रहालयातही असेच एक मोठे घड्याळ आहे व जर्मनीतील म्युनिक येथे नगरपालिका चौकातील मनोऱ्यावरही असेच घड्याळ आहे याची मला तेव्हा आठवण झाली एका दालनात टिपूचे दोन हौदे ठेवण्यात आले आहेत त्यापैकी एक चादीचा व दुसरा ब्राँझचा आहे हे हौदे हत्तीवरून मिरवणूक काढताना वापरण्यात येत असत

महाराजांचा राजवाडा या नावाने मशहूर असलेल्या भव्य व सुदर इमारतीसमोरच्या प्रमुख चौकात म्हैसूरचे चामराज वाडियर महाराजाचा पूर्णाकृती सगमरवरी पुतळा आहे हा पुतळा मुबईचे शिल्पकार रावसाहेब म्हात्रे यानी केला आहे या पुतळ्यासमोरच महाराजाच्या वाड्याचे भव्य प्रवेशद्वार आहे या वाड्यात सर्वांचे लक्ष वेधून घेणारे व अत्यत मौल्यवान असे जर काही असेल तर ते म्हैसूरच्या महाराजांचे सोन्याचे सिंहासन ते दरबार हॉलमध्ये कडक सरक्षणाखाली ठेवले आहे बदूकधारी शिपाई जवळ खडा पहारा करीत असतात दरबार हॉलचे स्तभ नक्षीदार व कलात्मक रगाने रगविलेले आहेत राजवाड्याची नि इतर दालने प्रेक्षकाना खुली आहेत त्यापैकी एकात विविध प्रकारची शास्त्रास्त्रे ठेवण्यात आली आहेत हैदर अली व त्याचा मुलगा टिपू सुलतान याच्या तलवारीही येथे आहेत समरांगणात तळपणाऱ्या आणि शत्रूची मुडकी उडविणाऱ्या त्या पराक्रमी तलवारी आता बापुडवाण्या होऊन तिथे विश्राती घेत पडलेल्या आहेत तलवारी, भाले, वाघनखे, चिलखते, कट्यारी, जांबिये, बिचवे अशी अनेक प्रकारची शस्त्रे या दालनात ठेवण्यात आली आहेत. मात्र खुद्द म्हैसूरच्या महाराजाच्या कित्येक पिढ्यात लढाईसाठी ही शस्त्रे वापरण्याचा प्रसग आलेला नाही !



म्हैसूरचा राजवाडा

म्हैसूरच्या महाराजाना मिळालेल्या मानपत्राचे चादीचे व हस्तिदताचे करडक एक दालनात ठेवण्यात आले आहेत त्यात हत्तीच्या पायापासून केलेले एक करडक आहे महाराजानी शिकारीत मारलेले वाघ, सिंह, अस्वले वगैरे पेंढा भरलेली शरीरे एका दालनात आहेत तर दुसऱ्या दालनात महाराजाची चादीची व सोन्याची आसने व हत्तीवर घालायचे हौदे आहेत एका महाराजाचा आकार इतका मोठा होता की परपरागत आसनात ते मावत नव्हते म्हणून त्याच्यासाठी वेगळी आसनं तयार करून घ्यावी लागली, तीही येथे आहेत सकाळच्या न्याहारीसाठी हे महाराज तीस मसाला दोसे खात असत, असे त्याच्या एका प्रजाजनाने सागितले ! या राजवाड्याच्या भिंतीवर जी अनेक चित्रे आहेत त्यात पूर्वीच्या काळी म्हैसूरच्या दसरा मिरवणुकीचे लाबलचक व भव्य तैलचित्र आहे त्यात या मिरवणुकीचे खरे वैभव व डामडौल उठून दिसतात

म्हैसूर हे शात निवात शहर असले तरी नवरात्र आणि दसरा या दहा दिवसात हे शहर चैतन्याने भरून गेलेले असते या दहा दिवसात भारताच्या सर्व भागातून आणि जगातील अनेक देशातून आलेल्या प्रवाशानी म्हैसूर शहर फुललेले असते राजवाड्यातून आलेले सगीताचे स्वर आकाश भरून टाकतात. बसेस, खाजगी मोटारी, रिक्षा, सायकली इत्यादी वाहनाची रस्त्यावर गर्दी होते दसऱ्याच्या सोहळ्याची खूण म्हणून सर्व वाहनावर चुन्याची बोटे उठवलेली असतात दसऱ्याच्या दिवशी तर प्रत्येक वाहनाला फुलाच्या माळाच्या माळा घातलेल्या असतात बसेसवर केळीचे खाब लावून तोरण केलेले असते त्या तोरणावर भरगच्च भल्या मोठ्या फुलाच्या माळा, नारळ आणि केळीचे घडही बाधण्यात येतात लहानसा सायकवालाही सायकलीला माळ घालून फिरतो, त्यामुळे सर्वत्र उत्साहाचे आणि आनदाचे वातावरण पसरते प्रदर्शनाचे, खेळाचे, सगीताचे, कवी समेलनाचे कार्यक्रम झडतात या दिवसात इथे हॉटेलमध्ये जागा मिळणे मुष्किल त्यासाठी कित्येक दिवस आधी आरक्षण करावे लागते रात्री राजवाडे आणि प्रमुख इमारतीवर झळझळीत रोषणाई करण्यात येते म्हैसूरचा दसरा हा भारतातील एक अत्यत मोठा आनदोत्सव असतो

भारताच्या अनेक भागात नवरात्र आणि दसरा विविध प्रकारानी साजरे केले जातात गुजरातमध्ये रास गरबा व टिपऱ्यात रात्रीच्या रात्री धुद नादात व्यतीत होतात, उत्तरेत 'रामलीला' पाहण्यात लक्षावधी लोक तहान-भूक-झोप विसरतात तर बगालमध्ये पूजेचा महोत्सव होतो दुर्गा व काली ही ललिता

देवीचीच नावे आहेत म्हैसूरची दसरा परपरा ३७७ वर्षांची जुनी आहे विजयनगर साम्राज्यात इ स. १६१० मध्ये पहिला दसरा मोठ्या प्रमाणावर साजरा झाल्याची नोंद आहे विजयनगरचे साम्राज्य हे भारताच्या इतिहासातील एक सोनेरी पान आहे. या थोर विजयनगर साम्राज्याचा वारसा घेऊन गेली ३७७ वर्षे म्हैसूरच्या दसऱ्याचा दिमाखदार झेडा फडकत आहे

दसऱ्याच्या दिवशी दुपारी दोन वाजता राजवाड्यातून ही भव्य मिरवणूक निघते सुरुवातीला बँड, ढोल, सनई ही वाद्ये असतात ह्या वाद्याच्या मागोमाग आठदहा जणाने धरलेली निशाणाची एक उच काठी असते म्हैसूरच्या महाराजाचे हे निशाण असते. निशाणापाठोपाठ शृगारलेले हत्ती दिमाखात चालत असतात त्यानतर कर्नाटकचा इतिहास आणि सास्कृतिक परपरा दाखविणारे चित्ररथ येत असतात त्यात कर्नाटकातील मदिरे, भारताच्या स्वातत्र्य लढ्यात कर्नाटकाने केलेले योगदान, कर्नाटकचे निसर्ग सौंदर्य, रेशमी उद्योग, वन्य जमातींचे नृत्य, कॉफीचे मळे, सगीत व साहित्य क्षेत्रातील परपरा, जगलातील प्राणी अशा विषयावर नेत्रदीपक चित्ररथ असतात. घोडदलाचे पथक, चित्रविचित्र मोठे मुखवटे घातलेले नर्तक, रस्त्याने जाताजाता प्रचड गोल तयार करणारे कारागीर इत्यादी नयनमनोहर दृश्ये या मिरवणुकीत असतात. जवळजवळ दीड मैल लाबीची ही मिरवणूक सथ गतीने लक्षावधी प्रेक्षकापुढून जाते मिरवणुकीच्या शेवटी नगाऱ्याचा हत्ती असतो या हत्तीवर सोन्याचे सिहासन असते पूर्वी या सिहासनावर म्हैसूरचे महाराज बसत आणि प्रजेच्या अभिवादनाचा स्वीकार करीत ते या मिरवणुकीने चार किलो मीटर्सवरील शमीच्या झाडावरील शस्त्रे काढण्यासाठी जात

या शमीच्या झाडाना महाभारत काळापासून महत्त्व आहे. पाडवानी दीर्घ वनवासाच्या काळात आपली शस्त्रे शमीच्या झाडात लपवून ठेवली होती याच विजयादशमीच्या दिवशी त्यानी शमीच्या झाडावरून शस्त्रे काढून सीमोल्लघन केले आणि विजय मिळवला दसरा हा शुभ दिवस तर आहेच, पण या दिवशी मोहिमेवर निघाल्यास विजय निश्चित मिळतो अशी राजेरजवाड्यामध्ये शेकडो वर्षे श्रद्धा आहे. याच दिवशी दुर्गादेवीने महिषासुराचा वध केला छत्रपती शिवाजी महाराजाच्या काळी व नतर पेशवाईसुद्धा नव्या मुलुखगिरीवर निघण्यासाठी दसऱ्याच्या दिवसाची निवड केली जात असे त्या दिवशी सोने लुटून आणण्याची प्रथा आहे

म्हैसूरच्या महाराजाना मिळालेल्या मानपत्राचे चादीचे व हस्तिदताचे करडक एक दालनात ठेवण्यात आले आहेत त्यात हत्तीच्या पायापासून केलेले एक करडक आहे महाराजानी शिकारीत मारलेले वाघ, सिह, अस्वले वगैरे पेढा भरलेली शरीरे एका दालनात आहेत तर दुसऱ्या दालनात महाराजाची चादीची व सोन्याची आसने व हत्तीवर घालायचे हौदे आहेत एका महाराजाचा आकार इतका मोठा होता की परपरागत आसनात ते मावत नव्हते म्हणून त्याच्यासाठी वेगळी आसनं तयार करून घ्यावी लागली, तीही येथे आहेत सकाळच्या न्याहारीसाठी हे महाराज तीस मसाला दोसे खात असत, असे त्याच्या एका प्रजाजनाने सागितले । या राजवाड्याच्या भिंतीवर जी अनेक चित्रे आहेत त्यात पूर्वीच्या काळी म्हैसूरच्या दसरा मिरवणुकीचे लाबलचक व भव्य तैलचित्र आहे त्यात या मिरवणुकीचे खरे वैभव व डामडौल उठून दिसतात

म्हैसूर हे शात निवात शहर असले तरी नवरात्र आणि दसरा या दहा दिवसात हे शहर चैतन्याने भरून गेलेले असते या दहा दिवसात भारताच्या सर्व भागातून आणि जगातील अनेक देशातून आलेल्या प्रवाशानी म्हैसूर शहर फुललेले असते राजवाड्यातून आलेले सगीताचे स्वर आकाश भरून टाकतात बसेस, खाजगी मोटारी, रिक्षा, सायकली इत्यादी वाहनाची रस्त्यावर गर्दी होते दसऱ्याच्या सोहळ्याची खूण म्हणून सर्व वाहनावर चुन्याची बोटे उठवलेली असतात दसऱ्याच्या दिवशी तर प्रत्येक वाहनाला फुलाच्या माळाच्या माळा घातलेल्या असतात बसेसवर केळीचे खाब लावून तोरण केलेले असते त्या तोरणावर भरगच्च भल्या मोठ्या फुलाच्या माळा, नारळ आणि केळीचे घडही बाधण्यात येतात लहानसा सायकवालाही सायकलीला माळ घालून फिरतो, त्यामुळे सर्वत्र उत्साहाचे आणि आनदाचे वातावरण पसरते प्रदर्शनाचे, खेळाचे, सगीताचे, कवी समेलनाचे कार्यक्रम झडतात या दिवसात इथे हॉटेलमध्ये जागा मिळणे मुष्किल त्यासाठी कित्येक दिवस आधी आरक्षण करावे लागते रात्री राजवाडे आणि प्रमुख इमारतीवर झळझळीत रोषणाई करण्यात येते म्हैसूरचा दसरा हा भारतातील एक अत्यत मोठा आनदोत्सव असतो

भारताच्या अनेक भागात नवरात्र आणि दसरा विविध प्रकारानी साजरे केले जातात गुजरातमध्ये रास गरबा व टिपऱ्यात रात्रीच्या रात्री धुद नादात व्यतीत होतात, उत्तरेत 'रामलीला' पाहण्यात लक्षावधी' लोक तहान-भूक-झोप विसरतात तर बगालमध्ये पूजेचा महोत्सव होतो दुर्गा व काली ही ललिता

देवीचीच नावे आहेत म्हैसूरची दसरा परपरा ३७७ वर्षांची जुनी आहे. विजयनगर साम्राज्यात इ स. १६१० मध्ये पहिला दसरा मोठ्या प्रमाणावर साजरा झाल्याची नोंद आहे विजयनगरचे साम्राज्य हे भारताच्या इतिहासातील एक सोनेरी पान आहे. या थोर विजयनगर साम्राज्याचा वारसा घेऊन गेली ३७७ वर्षे म्हैसूरच्या दसऱ्याचा दिमाखदार झेंडा फडकत आहे

दसऱ्याच्या दिवशी दुपारी दोन वाजता राजवाड्यातून ही भव्य मिरवणूक निघते सुरुवातीला बँड, ढोल, सनई ही वाद्ये असतात. ह्या वाद्याच्या मागोमाग आठदहा जणाने धरलेली निशाणाची एक उच काठी असते. म्हैसूरच्या महाराजाचे हे निशाण असते निशाणापाठोपाठ शृगारलेले हत्ती दिमाखात चालत असतात त्यानतर कर्नाटकचा इतिहास आणि सास्कृतिक परपरा दाखविणारे चित्ररथ येत असतात त्यात कर्नाटकातील मदिरे, भारताच्या स्वातत्र्य लढ्यात कर्नाटकाने केलेले योगदान, कर्नाटकचे निसर्ग सौंदर्य, रेशमी उद्योग, वन्य जमातीचे नृत्य, कॉफीचे मळे, सगीत व साहित्य क्षेत्रातील परपरा, जंगलातील प्राणी अशा विषयावर नेत्रदीपक चित्ररथ असतात. घोडदलाचे पथक, चित्रविचित्र मोठे मुखवटे घातलेले नर्तक, रस्त्याने जाताजाता प्रचड गोल तयार करणारे कारागीर इत्यादी नयनमनोहर दृश्ये या मिरवणुकीत असतात. जवळजवळ दीड मैल लाबीची ही मिरवणूक सथ गतीने लक्षावधी प्रेक्षकापुढून जाते मिरवणुकीच्या शेवटी नगाऱ्याचा हत्ती असतो. या हत्तीवर सोन्याचे सिंहासन असते पूर्वी या सिंहासनावर म्हैसूरचे महाराज बसत आणि प्रजेच्या अभिवादनाचा स्वीकार करीत ते या मिरवणुकीने चार किलो मीटर्सवरील शमीच्या झाडावरील शस्त्रे काढण्यासाठी जात

या शमीच्या झाडाना महाभारत काळापासून महत्त्व आहे पांडवानी दीर्घ वनवासाच्या काळात आपली शस्त्रे शमीच्या झाडात लपवून ठेवली होती याच विजयादशमीच्या दिवशी त्यानी शमीच्या झाडावरून शस्त्रे काढून सीमोल्लघन केले आणि विजय मिळवला दसरा हा शुभ दिवस तर आहेच, पण या दिवशी मोहिमेवर निघाल्यास विजय निश्चित मिळतो अशी राजेरजवाड्यामध्ये शेकडो वर्षे श्रद्धा आहे याच दिवशी दुर्गादेवीने महिषासुराचा वध केला छत्रपती शिवाजी महाराजाच्या काळी व नतर पेशवाईसुद्धा नव्या मुलुखगिरीवर निघण्यासाठी दसऱ्याच्या दिवसाची निवड केली जात असे त्या दिवशी सोने लुटून आणण्याची प्रथा आहे

वृदावन उद्यान हे म्हैसूरचे एक प्रमुख आकर्षण आहे म्हैसूरपासून एकोणीस किलो मीटर्सवर कावेरी नदीवर एक धरण बाधून तलाव करण्यात आला आहे त्याचे नाव कृष्टराज सागर असे आहे म्हैसूरचे महाराज कृष्णराज याचे नाव त्या धरणास दिले आहे पावणेदोन मैल लाबीचे व एकशेतीस फूट उचीचे हे धरण भारतातील प्रख्यात धरणापैकी एक आहे सर मोक्षगुडम विश्वेश्वरय्या या कल्पक इजिनियरने त्याची आखणी केली व त्यानीच ते पूर्ण केले १९११ साली सुरुवात करून १९३१ साली हे धरण पूर्ण करण्यात आले त्या काळी त्या धरणास अडीच कोटी रुपये खर्च आला व त्यामुळे पन्नास चौरस मैलाचा तलाव तयार झाला सर विश्वेश्वरय्या यानी कल्पिलेली ही अवाढव्य योजना पूर्ण झाल्यावर काही वर्षांनी म्हैसूरचे दिवाण सर मिर्झा इस्माईल यानी या धरणाच्या पायथ्याशी वृदावन गार्डन्स हे भारतातील सुदर व प्रशस्त उद्यान तयार केले या उद्यानात अनत प्रकारचे वृक्ष व वेली तर आहेतच, पण पाण्याच्या इतक्या विविध कलाकृती येथे पाहावयास मिळतात तेवढ्या इतरत्र कोठेही मिळत नाहीत धरण उचावर आहे व वृदावन उद्याने सखल भागात आहेत त्यामुळे वरील पाण्याच्या दाबाने अनेक प्रकारचे कारजे, धबधबे येथे सहजरीत्या तयार करता आले त्यातच रगाची किमया करून हे कारजे व धबधबे अगदी स्वप्निलतेचा आभास निर्माण करतात

वृदावन उद्यानातील झाडाना मनोरा, घुमट, गोल असे अनेक आकार, त्याची पाने व फाद्या कलात्मकरीत्या कापून दिले आहेत इतकेच नव्हे तर त्याच्या शेजारचे कारजेही त्या आकाराना अनुरूप असे आहेत उच मनोऱ्यासारख्या झाडाजवळचा कारजाही वीस-पचवीस फूट उच उडणारा, गोलाकार झाडाजवळ कारजाही गोलाकार अशी आकारसगती साधली आहे उद्यानाच्या वरच्या बाजूने विस्तीर्ण पसरलेल्या झाडी, वेली, फुलझाडे व कारजे याची समृद्ध पखरण असलेल्या वृद्धावन उद्यानाकडे पाहिले तर मयसभेचाच आभास होतो काही कारजाचे पाणी उतारावरून घसरत कृत्रिम धबधब्यात रुपातरित होते या सर्वांवर दिव्यानी ताबड्या, जाभळ्या, पिवळ्या, निळ्या रगाचा शिडकावा केला असल्याने हे सर्वच दृश्य अद्‌भुत व अविस्मरणीय असे वाटते

❑

म-प्रवास
६५६
२६९८६
२५।७।९२

# ५. श्रवणबेळगोळ, हळेबीड आणि बेलूर

म्हैसूर ते श्रवणबेळगोळ हे अतर ९८ किलोमीटर्सचे आहे बसला सुमारे तीन तास लागतात श्रवणबेळगोळला प्रवाशाची उत्तम व्यवस्था आहे टेकडीच्या पायथ्याशी गेट आहे तिथे सामान ठेवून घेण्याची सोय आहे. जे टेकडीच्या पायऱ्या चढून जाऊ शकत नाहीत किंवा चढणे ज्याना त्रासदायक असते त्याना डोली मिळू शकते

तीर्थक्षेत्र म्हणूनच महत्त्व आहे, असे नाही मराठी भाषेतील पहिले वाक्य त्या ठिकाणी आहे ते असे आहे

श्री चामुंडे राये करवियले
गगाराजे सुत्ताले करविले


हा मराठी भाषेचा आद्य शीलालेख श्रवणबेळगोळ येथे गोमतेश्वराच्या डाव्या पायाजवळ कोरलेला आहे

श्रवणबेळगोळ या कानडी नावाचा अर्थ 'श्रावकाचे धवल सरोवर' असा आहे विंध्यगिरी आणि चद्रगिरी या दोन टेकड्यांच्या मध्ये हे लहानसे गाव एका चौकोनी तळ्याच्या काठाला वसले आहे या तीर्थाचा इतिहास सतराशे वर्षांचा आहे जैनाचे पहिले तीर्थंकर पुरुदेव यांचे दोन पुत्र बाहुबली आणि भरत याच्यात राज्यावर कोणी बसावे याबद्दल वाद निर्माण झाला आणि त्याचे पर्यवसान युद्धात झाले बाहुबलीने हे युद्ध जिंकले, पण विजयी होऊनही त्याने राज्याचा उपभोग घेतला नाही त्याने राज्य आपल्या भावाला दिले व सन्यास घेऊन तो तपश्चर्येला निघाला. त्याने कर्मावर विजय मिळविला त्याचे स्मारक म्हणून भरताने पौडनपुरात त्याचा पुतळा उभारला. चामुडरायाने त्या मूर्तीची कीर्ती ऐकली व त्याचे दर्शन घेण्यासाठी त्याने प्रस्थान ठेवले. पण हा प्रवास खूपच दुर्गम व दीर्घ काल घेणारा असल्याने हा मार्ग न अनुसरता त्याने श्रवणबेळगोळ येथेच बाहुबली ऊर्फ गोमतेश्वराची मूर्ती उभारण्याचा निश्चय केला चामुडरायाने चंद्रगिरीवरून एक बाण सोडला तो बाण इद्रगिरीवर जिथे पडला, तिथे त्याने ही मूर्ती उभारली. अरिष्टनेमी या श्रावकाच्या देखरेखीखाली हा भव्य

पुतळा दीर्घ काळाच्या परिश्रमानें व शेकडो लोकांच्या श्रमदानाने उभारण्यात आला

गोमतेश्वराचा हा पुतळा टेकडीवर आहे. त्याचे मुख उत्तरेकडे आहे या मूर्तीचे खादे रुद व बळकट आहेत. हात सरळ खाली सोडले असून कंबर लहान आहे. शरीराच्या मानाने मूर्तीचे पाय आखूड व जाड आहेत पाढुरक्या करड्या रगाच्या एकाच प्रचड शिळेत हा पुतळा कोरलेला आहे दक्षिण भारतातील हा सर्वात उच पुतळा असून त्याची उची ५७ फूट आहे. बाहुबली हा चाळीस वर्षांचा असताना हा पुतळा केला असावा असे त्याच्याकडे पाहताना वाटते. पुतळ्याचा प्रत्येक अवयव कलात्मक आणि घाटदार आहे. चेहरा अत्यंत शात व कामक्रोधादी विकारावर विजय मिळविल्याचा अत्युच्च आनद दर्शविणारा आहे. स्मित करीत असलेला हा गोमतेश्वर अतिशय उदात्त वाटतो पुतळ्याचे पाय सव्वाआठ फूट उच आहेत व पायाचा अगठा दोन फूट नऊ इच आहे करागुलीची लाबी तीन फूट नऊ इच आहे हाताचे मधले बोट पाच फूट लांब आहे व चेहरा साडेसहा फूट उंच आहे पायाजवळ दगडाची वारुळे असून त्यांतील बिळातून साप निघाल्याचे दाखविले आहे या वारुळांतून निघालेल्या दोन वेली भुजदंडापर्यंत चढल्या असून पुतळ्याच्या खाद्यावर त्या वेलींचा तुरा आहे निसर्गमानव आणि प्राणिसृष्टी याचे ऐक्य दाखविणारा हा पुतळा आहे पौडनपुरा येथील मूळ पुतळ्याभोवती सर्प होते म्हणून चामुडरायाने येथेही सर्प दाखविले आहेत अंगावर चढलेली वेली माधवी नावाची वेली आहे

जैन धर्मातील तत्त्वे या गोमतेश्वराच्या महाकाय पुतळ्यात प्रतीत होतात सर्वसग-परित्यागाचे निदर्शक म्हणून नग्नता, सरळ व बेधडक उभे राहण्यातून निश्चय, चेहऱ्यावरील समाधानी वृत्तीमुळे सन्यासातील उदात्तता या जैन धर्मातील तत्त्वाचा साक्षात्कार होतो. फर्ग्युसन या पुरातत्ववेत्याने म्हटले आहे 'असा भव्य पुतळा व कलात्मता इजिप्त व भारत या दोनच देशात दिसतो हा पुतळा इजिप्तमधील कोणत्याही पुतळ्यापेक्षा अधिक उच आहे या पुतळ्याच्या उजव्या बाजूला जे आद्य मराठी वाक्य आहे ती आक्षरे उभट व वेलीच्या आकाराची आहेत प्रत्येक अक्षर दीड फूट उंचीचे आहे हा पुतळा उघड्यावर आहे त्यावर मंदिर, छत किंवा शिखर नाही शेकडो वर्षे तो उन्हा-पावसाला तोंड देत भक्कमपणे उभा आहे त्याच्या



गोमतेश्वराचा पुतळा

भोवती लहानशा चौकोनी ओवऱ्या आहेत त्या जैन तीर्थंकराच्या मूर्ती आहेत त्यापासून थोड्या अतरावर एक भक्कम भित आहे त्या भिंतीच्या आतील चौकोन हाच गोमतेश्वराचा प्राकार आहे या टेकडीवरून खाली गावाचे अतिशय मनोरम दृश्य दिसते टेकडी अगदी उघडी आहे तिच्यावर वृक्ष किंवा झुडपे नाहीत एकसारखा पाढरट पिवळसर कातळ आहे. त्यावर पायऱ्या खोदल्या आहेत मात्र तळाकडे नजर टाकली तर लहानसे गाव, चौकोनी नयनरम्य तळे आणि भरपूर झाडी दिसते

गोमतेश्वराच्या पुतळ्याचा काळ सहज कळावा असे शीलालेख असल्याने त्याबाबत मतभेद नाहीत. ज्या चामुडरायाने ही भव्य मूर्ती तयार केली, तो गग वशातील राजा म्हणजेच राजमल्ल सत्यवाक्य याचा अमल इ स. ९७४ ते ९८४ पर्यंत होता 'चामुडराय पुराण' या कानडी ग्रथावरून असा पुरावा मिळतो की या मूर्तीच्या घडणीस इ स ९७८ मध्ये सुरुवात झाली आणि इ स ९८३ मध्ये हे काम पूर्ण झाले गोमतेश्वराचा मस्तकाभिषेक हा एक प्रचड सोहळा असतो मूर्तीचा पहिला मस्तकाभिषेक इ स १३९८ मध्ये झाला दर बारा वर्षांनी हा महाभिषेक होतो

गोमतेश्वराच्या मूर्तीच्या पुढे चवऱ्या ढळविणाऱ्या सेवकाच्या दोन मूर्ती आहेत त्याची उंची सहा फूट आहे मूर्तीच्या डाव्या पायाजवळ तराजू कोरला आहे. त्याची उंची तीन फूट चार इंच आहे मूर्तीच्या समोरच्या मंड्यात सुंदर कोरीव काम केलेली नऊ छते आहेत त्यापैकी आठ छतावर अष्ट दिक्पालांच्या मूर्ती असून मधल्या छतावर इंद्राची देखणी मूर्ती कोरलेली आहे गोमतेश्वराच्या मूर्तीच्या डाव्या बाजूला एक दगडी गोल हौद आहे त्याला ललित सरोवर असे नाव आहे मूर्तीला स्नान घातल्यावर जे पाणी खाली ओघळते, ते या हौदात साठवले जाते मूर्तीच्या उजव्या बाजूला मराठीत, कानडीत व तामीळ भाषेत जो मजकूर कोरलेला आहे. त्याचा अर्थ असा आहे 'श्री चामुंडरायाने ही मूर्ती तयार केली आणि गंगाराजाने सभोवतीचा परिसर तयार केला'

इंद्रगिरी टेकडीजवळ चंद्रगिरी टेकडी आहे या टेकडीवर भद्रबाहू गुहा नावाची गुहा आहे श्रुतकेवली भद्रबाहू या गुहेत तप करीत होते अशी आख्यायिका आहे गुहेत त्यांच्या पादुका आहेत. सम्राट चंद्रगुप्त मौर्य या ठिकाणी आला होता व दक्षिणाचार्यांच्याकडून दीक्षा घेऊन त्याने अखेरपर्यंत येथेच साधना केली अशीही आख्यायिका आहे. बृहत्कथासागर या ग्रंथात या आख्यायिकेस आधार सापडतो


या गुहेच्या दक्षिणेस कुगे-ब्रह्मदेव स्तंभ आहे या स्तंभाच्या पायाजवळ आठ दिशांना तोंडे करून आठ हत्ती होते त्यापैकी काही आता नष्ट झाले आहेत हा स्तंभ इ स ९७४ च्या नंतरचा असावा कारण त्यावर गंगवंशातील दुसरा नटासिंह राजा इ स ९७४ मध्ये निधन पावल्याचा उल्लेख आहे या टेकडीवर जैनांच्या काही बस्ती आहेत त्यात पार्श्वनाथ बस्ती, शांतिनाथ बस्ती वगैरेचा समावेश आहे. ही जैन मुनींची निवासस्थाने होती शांतिनाथ बस्तीच्या उत्तरेला भरतेश्वरची मूर्ती आहे ही मूर्ती नऊ फूट उंच आहे ती अपूर्णावस्थेत असून गुडघ्यापर्यंतच पूर्ण केलेली आहे. भरतेश्वर हा गोमतेश्वराचा भाऊ होता या मूर्तीच्या पूर्वेस महानवमी मंडप नावाचे दोन मंडप आहेत त्याच्यामध्ये दोन नक्षीदार चौकोनी स्तंभ आहेत ते मंत्री नागदेवाने उभारलेले असून त्यावर जैन मुनी नयकीर्तीची वचने कोरलेली आहेत पार्श्वनाथ बस्तीजवळ जो मानस्तंभ आहे, त्यावर ब्रह्मदेवाची मूर्ती आहे कत्तलेबस्ती ही चंद्रगिरीवरील सर्वात मोठी बस्ती असून तीत मंदिर आहे. त्याशिवाय पद्मावती बस्ती [illegible] बस्ती, चंद्रप्रभा बस्ती अशा सुमारे तीस बस्त्या चंद्रगिरीवर आहेत

या गावात तांब्याची भांडी व तांब्याच्या वस्तू तयार होतात त्यामुळे ती घडली

जात असतानाचा आवाज आसमंतात घुमत राहतो गावची लोकसंख्या दोन-अडीच हजारांची आहे भंडारी बस्ती नावाचे मंदिर गावात आहे त्यात चोवीस तीर्थंकराच्या मूर्ती एका ओळीत उभ्या आहेत इतर काही बस्त्या व जैन मठ ही गावातील धार्मिक स्थळे आहेत चौकोनी तळ्याकाठी निवांत काही वेळ बसणे हे आल्हाददायक आहे.

श्रवणबेळगोळहून दोन तासात हळेबीडला जाता येते हळेबीड हे लहानसे गाव आहे. येथील सुप्रसिद्ध होयसाळेश्वर मंदिर व इतर मंदिरे पाहण्यासाठी हजारो प्रवासी येतात, पण ते येथे मुक्काम करीत नसून म्हैसूर किंवा बंगलोरला परत जातात हळेबीड या कानडी शब्दाचा अर्थ 'जुने गाव' असा आहे होयसाळ राजांनी बाराव्या शतकात हळेबीड ही आपली राजधानी केली होती तेव्हा या गावाचे नाव द्वारसमुद्र असे होते पुढे सतराव्या शतकात विजयनगरच्या सम्राटांनी बेलूरनजीक नवे गाव वसविले तेव्हा या द्वारसमुद्राला लोक जुने गाव (हळेबीड) म्हणू लागले होयसाळ राजांनी या समृद्ध शहरातून दीडशे वर्षे राज्य केले पण या संपन्नतेमुळेच मुसलमानांची वक्र नजर हळेबीडकडे वळली आणि इ स १३११ मध्ये मलिक काफर याने ही राजधानी जिंकून घेतली त्याने अनेक हत्ती व उंटांवर सोने-नाणे व जडजवाहीर घालून ते दिल्लीस नेले इ स १३९६ मध्ये महंमद तुघलक याने या शहरावर हल्ला केला त्यानंतर थोड्याच कालावधीत मदुराच्या सुलताने बल्लाळ (तिसरा) या होयसाळ राजाला तिरुचिरापल्लीच्या लढाईत नामोहरम केले तेव्हापासून होयसाळ राज्याला अवनती प्राप्त झाली तरीही होयसाळ राजांनी तीनशे वर्षे राज्य केले

हळेबीडमध्ये अनेक मंदिरे आहेत, पण होयसाळेश्वरचे मंदिर त्यापैकी सर्वश्रेष्ठ आहे विष्णुवर्धन राजाच्या कतेमल्ल या अधिकाऱ्याने इ स ११२१ मध्ये हे अत्यंत कलात्मक मंदिर बांधले होयसाळांची मंदिरकला ही एक स्वतंत्र शैली आहे ही मंदिरे श्रीचक्र नावाच्या चबुतऱ्यावर बांधलेली असतात मंदिराच्या बाहेरून व आतही उत्कृष्ट शिल्पकलेचे दर्शन घडविणाऱ्या यक्ष, गंधर्व, देवदेवता यांच्या मूर्ती असतात या मंदिराचे स्तंभही उत्तम कलाकुसर केलेले असतात मंदिराच्या शिखरावरही अशाच शिल्पकलेचा शोभादायक उत्सव असतो या मंदिराच्या समोर दोन नंदी असतात हे नंदी एकाच मोठ्या खडकात कोरून तयार केलेले असतात



**होयसाळेश्वर मंदिर**

तसेच नदीच्या गळ्यात देखण्या घटा व हार कोरलेले असतात होयसाळेश्वर मंदिर या शैलीचे सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे मंदिराच्या चबुतऱ्यावर हत्ती, सिंह वगैरे कोरलेले आहेत मंदिराच्या बाहेर जी कलात्मक शिल्पे आहेत, त्यात रामायणातील कथा, महाभारत व भागवतातील प्रसंग, पुराणातील व्यक्ती, प्राणी व पक्षी, नृत्य करणाऱ्या अप्सरा, यक्ष-किन्नर, योद्धे, फुले, पाने व वेली इत्यादींच्या हजारो मूर्ती आहेत. बहुतेक मूर्ती सुमारे तीन फूट उंचीच्या आहेत शिव, विष्णू व शक्ती यांच्या मूर्ती संख्येने अधिक आहेत. हे होयसाळेश्वर मंदिर म्हणजे भारतीय कलेचे वस्तुसंग्रहालयच आहे असे शिल्पकलातज्ज्ञांनी सार्थपणे म्हटले आहे

या मंदिराच्या बाहेरच्या स्तरावरील मूर्ती पाहण्यास नैऋत्येकडून सुरुवात केल्यास सहाव्या रांगेत केतमल्लाचा दरबार दिसतो विष्णुवर्धनाचा मंत्री केतमल्ल याने हे मंदिर बांधल्याने त्याला येथे महत्त्व देण्यात आले आहे त्यानंतर अमृतमंथनाचे दृश्य कोरलेले आहे त्यात देव आणि दानव अमृत मिळविण्यासाठी समुद्र घुसळतात असे दाखविले आहे मंदार पर्वताचा उपयोग त्यांनी रवी म्हणून केला असून वासुकी सर्प दोरीसारखा वापरला आहे पुढील शिल्पात दानवांचे गुरू शुक्राचार्य तप करताना



**होयसाळेश्वर मंदिरातील एक शिल्प**

दाखविले आहेत नतर शिव-पार्वतीच्या दरबारात विष्णू, ब्रह्मा, गण व दिक्पाल आहेत अष्ट दिशा व उपदिशाचे हे पालक आपापल्या वाहनावर आरूढ झाले आहेत हे शिल्प खूपच गुंतागुतीचे असूनही सर्व रेखीव व उत्तम आहेत विष्णूचा पाचवा अवतार वामन हा बलीच्या दरबारात येऊन तीन पावलाची जमीन मागतो हेच पुढील शिल्पात आहे बली त्याला ते दान देतो दोन पावलात वामन स्वर्ग व पृथ्वी व्यापतो आणि तिसरे पाऊल बलीच्या मस्तकावर ठेवून त्याला पाताळात धाडतो, या पौराणिक कथेवर हे शिल्प आधारलेले आहे कृष्णाला टोपलीत घेऊन यमुना नदी पार करणारा वासुदेव, दूध-लोणी चोरून घेणारा कृष्ण, मुरली वाजविणारा कृष्ण, गोवर्धन पर्वत उचलणारा कृष्ण, विश्वरूप दाखविणारा कृष्ण, अक्रुराबरोबर गोकुळ सोडून जाणारा कृष्ण, कुब्जेला शापमुक्त करणारा कृष्ण, हत्तीशी झुंज देणारा कृष्ण इत्यादी कृष्णचरित्रातील अनेक दृश्यांची देखणी शिल्पे या ठिकाणी आहेत

दक्षिणेच्या दरवाजावर शिल्पकार कालिदासाचे नाव आहे आणि या मूर्ती त्याने तयार केल्याचे कानडीत कोरले आहे मकरावर नटराजाची मूर्ती आहे. भिंतीवरील शिल्पात उदरावर नृत्य करणाऱ्या गणपतीची मूर्ती आहे गणपतीजवळ उंदीर हे त्याचे वाहन नेहमी असते, पण त्यावर नृत्य करणारा गणपती क्वचितच दिसतो. जवळच मोरावर बसलेल्या कार्तिकेयाचीही मूर्ती आहे या भागातील मूर्ती तीन फूट उंचीच्या व सारख्या आकाराच्या आहेत त्यांची शिल्पकलाही दक्षिण भारतीय कलेचे उत्कृष्ट नमुने आहेत शिव आणि पार्वती, मोहिनी रुपातील विष्णू, ब्रह्मा, मृदग वाजविणारे वादक, भैरव रूपातील शिवा, हनुमान, वीणेसह शारदा, मुरली वाजविणारा कृष्ण इत्यादींच्या या मूर्ती अतिशय प्रेक्षणीय आहेत. मुरलीधर कृष्णाच्या शिल्पात भोवताली गोपगोपीच नव्हे तर गाईसुद्धा एकाग्रतेने मुरली ऐकत असल्याचे दाखविले आहे त्याशिवाय नरसिह, नटराज, वराह, राजलीला अवस्थेत विष्णू व लक्ष्मी, नंदीवरील पार्वती, कैलास पर्वत उचलणारा रावण, महिषासुरमर्दिनी, गणेश, उजव्या सोंडेचा गणपती इत्यादी अनेक सुबक मूर्ती या भिंतीवर आहेत

होयसाळेश्वर मंदिराच्या नैऋत्य व पश्चिम बाजूच्या भिंतीवर हे शिल्पकलेचे नयनमनोहर नमुने दिसतात त्यात विशेषत: कर्णार्जुन युद्धाचे दृश्य विशेष सस्मरणीय आहे अर्जुनाच्या रथावरील हनुमान आणि कर्णाच्या रथावरील कावळा आपले लक्ष वेधून घेतात. या शिल्पात हवेत सोडलेले बाणही अतिशय रेखीव आहेत. प्रल्हादाची कथा अनेक शिल्पातून या भागात सादर केली आहे हिरण्यकश्यपूचा दरबार, प्रल्हाद हा विष्णुभक्त असल्याने त्याचा होणारा छळ, त्याला सर्पदंश करविला जातो, त्याला हत्तीच्या पायी दिले जाते, त्याला आगीत फेकले जाते तरीही विष्णूच्या आशीर्वादाने तो जिवत राहतो हे या शिल्पातून प्रभाविपणे दाखविले आहे शेवटच्या पॅनेलमध्ये खाब फोडून येणारा नरसिंह व त्याने केलेला हिरण्यकश्यपूचा वध दाखविला आहे नतरच्या शिल्पात हनुमान हा सुग्रीवाची व रामाची ओळख करून देतो, राम एकाच बाणाने सात माडाची झाडे तोडतो, वालीचा मृत्यू हे रामायणातील प्रसग सादर केले आहेत कृष्णार्जुन युद्ध, सुग्रीवाचा राज्याभिषेक, सीतेला देण्याकरिता राम आपली अंगठी हनुमानाला देतो हेही प्रसंग शिल्पाकृतीत चिरतन करण्यात आले

आहेत वायव्येकडील भितीवर अभिमन्यू चक्रव्यूहात शिरत असल्याचे भव्य शिल्प आहे भीम एक हत्ती उचलून शत्रूवर फेकत असल्याचे दृश्यही प्रभावी आहे

होयसाळेश्वराच्या मदिरात दोन प्रमुख मडप असून ते लहानशा वाटेने एकमेकाना जोडलेले आहेत स्तभ नक्षीदार असून छतावरही अतिशय मनोहर अशी नक्षी आहे काही मूर्ती मात्र चोरीला गेल्या आहेत किंवा नष्ट पावल्या आहेत अतर्गृहात जाण्याच्या वाटेवर दोन सुबक द्वारपाल असून दरवाजाही सुदर नक्षीने सुशोभित केला आहे गर्भगृहात दोन शिवलिंगे आहेत त्यापैकी एक राजाच्या नावाने व दुसरे राणीच्या नावाने बसविण्यात आले आहे विष्णुवर्धन हा रामानुजाचार्यांचा शिष्य होता. त्याने हे शिवमंदिर बाधले आहे फर्ग्युसन या थोर कलासमीक्षकाने होयसाळेश्वर मदिर पाहून ग्रीसमधील अथेन्स येथील पॅन्थिऑन या प्राचीन भव्य कलात्मक वास्तूची आठवण होते असे म्हटले आहे मदिराच्या आतील भिंतीवर, स्तभावर आणि ब्रॅकेट्सवरही अनेक सुदर मूर्ती आहेत त्यात गोवर्धन उचलणारा कृष्ण, दोन सोंडांच्या ऐरावतावर बसलेला इंद्र व त्याची पत्नी, वराहावतार, नरसिंह, सरस्वती (हे या मदिरातील एक उत्कृष्ट शिल्प आहे) त्रिविक्रमाचे पदप्रक्षालन करणारा ब्रह्म, नृत्य गणेश, विषकन्या, भिक्षाटन करणारा शिव, वामनावतार व बळी, शिवपार्वती इत्यादी देवदेवताच्याप्रमाणेच नृत्य करणारी अप्सरा, यक्ष-किन्नर, वाद्ये वाजविणाऱ्या सुदर स्त्रिया याचीही अत्यत देखणी शिल्पे मदिराच्या आतील भागात आहेत


या शिल्पाचा विशेष असा की, तीन फूट उच व दोन-सव्वादोन फूट रुद असा बहुतेक शिल्पांचा आकार असूनही एका एका शिल्पात अनेक व्यक्ती व प्राणी आहेत. तरीही प्रत्येकाचा बारकावा अचूक टिपला आहे. भारतीय युद्धात भीम हत्ती उचलून शत्रूवर फेकतो तेव्हा हत्तीवरील माहूत खाली पडतानाही दाखविला आहे कैलास पर्वत उचलणाऱ्या रावणाच्या शिल्पात कैलासावर वास्तव करणारे देवही सर्व बारकाव्यासह दाखविले आहेत. हे मदिर लक्षपूर्वक पाहण्यास एक सबध दिवस लागतो तरीही दीडदोन तासाच्या अवधीत त्यातील मूर्तिकलेच्या श्रेष्ठतेची कल्पना येतेच हळेबीड येथील होयसाळेश्वर मदिर पाहून आम्ही १८ किलो मीटर्सवरील बेलूरकडे

निघालो या बेलूरचा इतिहास असा की, दहाव्या शतकापासून चौदाव्या शतकाच्या प्रारभापर्यंत हळेबीडच्या खालोखाल बेलूरला महत्त्व होते. कारण हळेबीडनतर बेलूर ही होयसाळाची राजधानी होती. यगची नदीवर वसलेली बेलूर हे सर्व दृष्टींनी राजधानी म्हणून सोयीचे गाव होते.

होयसाळ वशातील बिहिदेव ऊर्फ गुणवर्धन राजाने तालकदच्या लढाईत चोळाच्यावर जो विजय मिळवला त्या विजयप्रीत्यर्थ त्याने बेलूर येथे चेन्नकेशव मदिर बाघले १११७ साली हे सर्वांग सुदर मदिर पूर्ण झाले होयसाळ पद्धतीचा सर्वोत्कृष्ट नमुना म्हणून या चेन्नकेशव मदिराचा उल्लेख कलातज्ज्ञ करतात. चेन्नकेशव याचा अर्थ सुदर नारायण या मदिराच्या प्रवेशद्वारावर जे विटाचे गोपुर आहे ते नतरच्या काळात जोडलेले आहे हे उघडच आहे कारण होयसाळ पद्धतीच्या मदिरात फक्त दगडाचा वापर होत असे प्रवेशव्दारातून आत गेल्यावर भव्य दगडी चौक आहे त्याच्या उजव्या बाजूला एक पुष्करणी व डाव्या बाजूला कप्पेचेन्निगरायाचे मंदिर आहे. समोर एक ध्वजस्तभ आहे त्याच्या मागचे चेन्नकेशवाचे मंदिर पाहिल्याबरोबर त्याचे जे वैशिष्ट्य आपल्या लक्षात येते ते म्हणजे त्या मदिराला कळस नाही मात्र मुख्य दरवाजाच्या पायऱ्यांवर लहान लहान गोपुरे दिसतात होयसाळ पद्धतीची मदिरे ही चालुक्य पद्धतीतूनच निघाली पण नंतर होयसाळानी आपली स्वतत्र शैली निर्माण केली हळेबीडप्रमाणेच बेलूर येथील मदिरही चबुतऱ्यावर उभे आहे येथे त्याची उची पाच फूट आहे हा चबुतरा ताऱ्याच्या आकाराचा आहे. या मदिरात अक्षरश· हजारो विलक्षण सुदर मूर्ती आहेत. फर्ग्युसनने म्हटले आहे की, या भागातील मूर्तिकलेचे हे एक उत्कृष्ट वस्तुसंग्रहालयच आहे. या मदिराच्या उभारणीसाठी तज्ज्ञ मूर्तिकारानी जे जे परिश्रम घेतले आहेत त्यांना जगात इतरत्र क्वचित तोड मिळेल.'

या मदिराच्या भिंतीच्या बाहेरच्या बाजूने जे कलात्मक पट्टे आहेत, त्यातील सर्वात खालच्या पट्ट्यावर सुबक हत्ती कोरण्यात आले आहेत त्याची संख्या ६५० आहे विशेष म्हणजे प्रत्येक हत्ती वेगळ्या प्रकारे कोरण्यात आला आहे म्हणजेच या पट्ट्यावर हत्तीच्या ६५० पोझेस आहेत. इतकी विविधता इतरत्र कुठेही आढळत नाही हे हत्ती पाहून मदिराचा मुख्य वास्तुशिल्पकार जनकचारी याच्या प्रतिभेचे कौतुक वाटते.

त्यानतरच्या पट्ट्यात देवदेवता, यक्षकिन्नर, अप्सरा, वादक व नर्तक इत्यादींच्या रेखीव मूर्ती आहेत. वेलींच्या मंडपात उभ्या असलेल्या सुदरींच्या मूर्ती विशेष आकर्षक आहेत मात्र या मूर्ती लहान आहेत त्यात भस्मासूर-मोहिनीसारखे पौराणिक प्रसगही साकार केले आहेत त्या वरच्या पट्ट्यावर सिंह कोरलेले आहेत त्यावरच्या पट्ट्यावर रामायण व महाभारत यातील महत्त्वपूर्ण प्रसग कोरलेले आहेत. या मदिरातील नक्षीच्या दगडी जाळ्याही प्रेक्षणीय आहेत एका जाळीनतर हौयसाळ राजाच्या दरबाराचे दृश्य आहे विष्णुवर्धन राजा व त्याची राणी शातलादेवी यांचा हा दरबार आहे या दरबारात सरदार, माडलिक, नृत्यागना, शिपाई वगैरे अनेक जण आहेत



**बेलूरचे चेन्नकेशव मदिर**

मदिरातील छताजवळ चाळीस ब्रॅकेट्स आहेत त्यावरील मूर्ती दोन फूट उचीच्या आहेत. या मूर्ती भारतीय शिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने मानले जातात या मदनिका आहेत प्रसाधन करणारी स्त्री, दर्पणधारिणी, त्रिभग अवस्थेतील मदनिका (तीन ठिकाणी दाकलेली), नृत्याच्या तयारीत असलेली मदनिका, भावसमाधीत गढलेली मदनिका, पिंजऱ्यातील राघूबरोबर बोलणारी कामिनी, प्रियकराची वाट पाहणारी मीलनोत्सुक मदनिका, होळीच्या दिवशी प्रियकरावर रगाचे पिचकारी मारणारी प्रमदा,

प्रियकरासाठी आपल्या नाजुक हातात विडा घेऊन तिष्ठत असलेली मदनिका इत्यादी. सुंदर स्त्रीची ही दगडातील अमर रूपे म्हणजे चेन्नकेशव मंदिरातील अग्रगण्य शिल्पे आहेत या मूर्तीची प्रमाणबद्धता, रेखीवपणा, सौंदर्य आणि भावना व्यक्त करण्याची क्षमता ही अवर्णनीय आणि अद्धितीय अशी आहेत धनुष्यबाणाने शिकार करणारी मदनिका तेथे आहे तर हळुवारपणे बासरी वाजविणारी, डोळ्यात काजळ घालणारी सुदरी अशी स्त्रीची ॐ१क चेतोहर रूप या मदिरात दिसतात

मदिराच्या आतील काही शिल्पे वीररसाचाही परिपोष करतात अगडी गावाजवळ वाघाला पाहून मुनी ओरडले, 'होय साल' . . . . ते दृश्य एका मूर्तीत साकार करण्यात आले आहे त्यावरून या वशाला होयसाळ हे नाव पडले मदिराच्या दक्षिणेकडील दरवाजास 'शुक्रवार दरवाजा' असे नाव आहे तिथे प्रल्हादाची कथा शिल्पाद्वारे दाखविली आहे. नृत्य व गायन करणाऱ्या अप्सरा आणि मोहिनी-भस्मासुर कथा याचीही देखणी शिल्पे या भागात आहेत इतर भागात फळे तोडणारी स्त्री, वीनावादिनी, मृदंगवादिनी, गरूड आणि नदी याच्यासह शिव, हातात परशू घेतलेला परशुराम, गदाधारी विष्णू, सरस्वती, कैलास पर्वत उचलणारा रावण इत्यादी शिल्पे विशेष प्रेक्षणीय आहेत हळेबीड आणि बेलूर या दोन मदिरातील शिल्पात अनेक विषयाची पुनरावृत्ती आढळते. नवरंगगृहात मोठ्या आकाराची दगडी पादत्राणे दिसतात चाभार जमातीने देवाला वाहिलेली ही पादत्राणे आहेत रामानुजाचार्य यानी अस्पृश्याना मदिरे खुली केली त्याची ही खूण आहे नवरंगगृहातील स्तभ विशेष कलात्मक व प्रेक्षणीय आहेत छतही १३ फूट चौकोनाचे असून जमिनीपासून वीस फूट उच आहे. छतावरही अप्सराच्या नृत्याची व इतर मदनिकांची मनोहर दृश्ये कोरलेली आहेत.

गर्भगृहात केशवाची पुरुषभर उचीची भव्य व नितांत सुंदर अशी मूर्ती आहे. मूर्तीवर अनेक दागिने कोरलेले आहेत मूर्तीच्या एका बाजूला पृथ्वी व दुसऱ्या बाजूला लक्ष्मी आहे चौथऱ्यावर ही मूर्ती होयसाळाच्या वंशातील विष्णुवर्धनाने बसवली असा शिलालेख आहे.

❑

# ६. धर्मस्थळ, मंगलोर, उडुपी आणि गोकर्ण

मगलोरच्या वाटेवरच पण थोडे आत वळणावर धर्मस्थळ आहे हसनपासून धर्मस्थळचे अतर १५० किलो मीटर्स व तियून पुढे मगलोर ७५ किलो मीटर्स आहे धर्मस्थळचा इतिहास आठशे वर्षांचा असला तरी सध्याच्या धार्मिक केंद्राची निर्मिती अलीकडची म्हणजे १९८२ ची आहे आठशे वर्षांपूर्वी हे ठिकाण कुदुमा या नावाने ओळखले जात होते या ठिकाणी बीरमन्ना पेरगडे व त्याची पत्नी हे सत्त्वशील कुटुंब राहत होते त्याच्या निवासाजवळ चद्रनाथ स्वामींचे मंदिर होते एकदा स्वामींनी दृष्टान्त देऊन कुमारस्वामी, कन्याकुमारी, कलाराहू आणि कलाटकी याची मदिरे बाधण्यास सागितले या देवता आपले पुजारी ऊर्फ हेगडे यांच्याकरवी आपले मनोगत व्यक्त करतील असेही या दृष्टान्तात सागण्यात आले या प ्पत्नींनी दृष्टान्ताप्रमाणे येथे मदिरे बाधली व तेव्हापासून हे धर्मक्षेत्र झाले देवाचा साक्षात्कार सागणारे पुजारी म्हणून हेगडे याना धार्मिक क्षेत्रात फार महत्व मिळाले १९५५ ते १९६८ या काळात रयनवर्मा हेगडे हे प्रमुख पुजारी होते त्यांनी या ठिकाणी अनेक धर्मशाळा बाधल्या आणि शाळा व कॉलेज सुरू केले. या ठिकाणी बाहुबलीची प्रचड मूर्ती उभारावी असे त्यांचे स्वप्न होते. त्याच्या निधनानतर त्याच्या पत्नी श्रीमती रत्नम्मा यांनी हे कार्य चालू ठेवले १९७३ साली बाहुबलीची ३९ फूट उंचीची आणि २१० टन वजनाचे मूर्ती तयार झाली १९७५ साली राष्ट्राध्यक्ष श्री गिरी याच्या हस्ते कोनशिला बसविण्याचा समारभ झाला ४ फेब्रुवारी १९८२ रोजी बाहुबलीची प्रतिष्ठापना करण्यात आली या धर्मस्थळाचे वैशिष्ट्य असे की हे जैन धर्म व ज्ञानप्रसाराचे केंद्र आहे, तसेच येथे अनेक हिंदू देवदेवताही आहेत वास्तविक, येथे दोनतीन महिने निवात राहून अभ्यास व चितन करण्यासाठी फार अनुकूल वातावरण आहे

धर्मस्थळवरून मगलोरला जाता येते मगलोर शहरातील सर्वात प्रेक्षणीय वास्तू म्हणजे रोझॅरियो चर्च मगलोरमध्ये ख्रिश्चन, हिंदू व मुसलमान या तिन्ही धर्मांची प्रार्थना मदिरे आहेत त्याला या बंदराचा

सातशे वर्षांचा इतिहास कारणीभूत आहे हे बारमाही बंदर असल्याने पूर्वीच्या काळापासून परदेशी जहाजे व व्यापारी याना त्याचे आकर्षण वाटत आले आहे. १३४२ सालापासून येथे पर्शिया आणि येमेनची जहाजे येऊन व्यापार करीत असत १४४८ साली विजयनगरच्या सम्राटाच्या दरबारात पर्शियाचा राज्यप्रतिनिधी अब्दुल रझाक आला होता, तो प्रथम मंगलोर बंदरात उतरला होता १४९८ साली वास्को द गामा मंगलोरजवळ उडुपीला आला होता १५२६ साली पोर्तुगीजानी बिदनूर नायकाच्याकडून मंगलोरचा ताबा घेतला. वीस वर्षांनी या शहरात मोठी आग लागली, ती पोर्तुगीजांनी मुद्दाम लावली असा अनेक इतिहासकारांनी संशय व्यक्त केला आहे. १६७० साली पोर्तुगीजानी येथे कारखाना उघडला पोर्तुगीजाचे या भागातील वर्चस्व सहन न होऊन अरबानी या शहराला आग लावली अठराव्या शतकाच्या सुरुवातीस बिदनूर नायकानी पोर्तुगीजाचा पराभव करून मंगलोरवर ताबा मिळवला, पण त्यानी पोर्तुगीजाच्या कारखान्यास परवानगी दिली कारण या भागाचा औद्योगिक विकास व्हावा अशी त्याची मनीषा होती. १७६३ साली हैदर अलीने मंगलोर जिंकून आपला अमल बसवला पण नंतर लगेच पाच वर्षांनी ब्रिटिशानी मंगलोर घेतले १७९४ साली हैदर अलीचा मुलगा टिपू सुलतान याने मंगलोर जिंकले, पण श्रीरंगपट्टणच्या पाडावानंतर हे शहर पुन्हा इंग्रजाच्याकडे गेले हिंदू, ख्रिश्चन आणि मुसलमान असे राज्यकर्ते बदलत गेल्याने येथे चर्चेस, मंदिरे आणि मशिदींचीही संख्या वाढत राहिली.

मंगलोरमध्ये चार किल्ले बांधण्यात आले होते; पण टिपू सुलतान, पोर्तुगीज आणि ब्रिटिश याच्या स्वाऱ्यामुळे त्यापैकी तीन पूर्णपणे व चौथा अंशत: उद्ध्वस्त झाला. पोर्तुगीजानी बांधलेल्या सेंट सेबॅस्टियन किल्ल्याचे अवशेषच काय ते आता इतिहासाची साक्ष देत कसेबसे उभे आहेत मोस्ट होली रोझरी चर्च हे दक्षिण कर्नाटकातील अतिशय जुने व भव्य चर्च आहे १५२६ साली बांधलेले हे बळकट, सुंदर आणि प्रचंड चर्च सुमारे एक हजार लोकाना एका वेळी प्रार्थनेसाठी सामावून घेऊ शकते त्याशिवाय सेंट अलॉयसिस कॉलेज चर्च व इतर अनेक चर्चेस मंगलोरमध्ये आहेत. हिंदू मंदिरात मंगलादेवी आणि मंजुनाथ ही प्रमुख मंदिरे आहेत या मंगलादेवीवरूनच मंगलोर हे नाव आले आहे बंदर भागातील जुम्मा मशीद

मोठी आहे ती पाचशे वर्षांपूर्वी अरबानी बांधली आहे दीपस्तभाजवळ इदगा मशीद आहे व गावातही अनेक मोठ्या मशिदी आहेत. इदगा मशीद ही टिपू सुलतानाने बांधली तिसरी झमीर मशीद ही शहा अमीर या फकिराच्या स्मरणार्थ बाधलेली आहे या तिन्ही प्रमुख जातीचे सबंध सलोख्याचे असल्याने समिश्र वस्ती असूनही मगलोर हे जातीय तणावापासून अलिप्त आहे

मगलोरपासून उडुपी हे सुप्रसिद्ध गाव ५८ किलोमीटर्स आहे सव्वातासात हा प्रवास होतो उडुपी गावच्या लोकानी आता उपाहारगृहाचा धदा सर्व भारतभर काबीज केला आहेच, पण परदेशातही न्यूयॉर्क, लडन, पॅरिस अशा जागतिक पातळीवरच्या महानगरात आपले बस्तान बसवले आहे

उडुपी या शब्दाचा अर्थ चद्र असा आहे उडू म्हणजे तारे व पा म्हणजे राजा ताऱ्याचा राजा चद्र आहे शकराने चद्राला आपल्या शिरावर धारण केले असल्याने उडुपीला महादेवही मानतात. धार्मिकदृष्ट्या उडुपी हे रौप्यपीठ किंवा रजत पीठ आहे हे सात धर्मपीठापैकी एक आहे. ही सात पीठे म्हणजे उडुपी, सुब्रम्हण्यम, कुंभसई, कोटेश्वर, शकरनारायण, गोकर्ण आणि कोल्लूर अशी आहेत उडुपीचे मूळ नाव शिवाली असे होते, तेही शकराच्या नावाशी निगडित आहे कर्नाटक व केरळची समुद्रालगतची पट्टी परशुरामाची भूमी म्हणून ओळखली जाते त्याबद्दलची पौराणिक कथा अशी आहे की, पृथ्वीवर क्षत्रिय फार माजले आणि जुलूम करू लागले म्हणून विष्णूने परशुरामाचा अवतार घेतला. पृथ्वीवर येऊन त्याने क्षत्रियाचा नि:पात केला क्षत्रियाच्यापासून जिंकून घेतलेले राज्य परशुरामाने कश्यप ऋषींना दिले त्यानतर तिथे सताचे व ज्ञानी लोकाचे राज्य सुरू झाले पण हे राज्य कश्यपाला दिल्यानतर तिथे राहणे परशुरामाला अशक्य झाले स्वत:साठी क्षेत्र तयार करावे म्हणून परशुरामाने समुद्रात आपला परशू फेकला हा परशू जेथे पडला तिथपर्यंत सागराने मागे हटावे अशी त्याने आज्ञा केली व सागर हटला त्यामुळे जी भूमी निवासाला योग्य झाली, ती ही परशुराम भूमी एका कवीने याचे मोठे रसिक वर्णन केले आहे तो म्हणतो, 'परशुरामाने पृथ्वीच्या माडीवरील वस्त्र हलक्या हाताने दूर केले'

कृष्णभक्त उडुपी या शब्दाचा आणखी एक अर्थ सागतात व तो अधिक ग्राह्य मानतात. उडुपी या सस्कृत शब्दाचा अर्थ नाव असा आहे श्रीकृष्ण नावेतून द्वारकेहून या गावी आला म्हणून त्याचे नाव उडुपी पडले असे कृष्णभक्त सागतात मालये गावाजवळ श्रीकृष्णाची नाव फुटली असे सागण्यात येते उडुपीमध्ये अनतेश्वर किंवा भुजगशयनाचे मदिर आहे अनत म्हणजे शेष शेषशायी भगवानाच्या या मदिरात मध्वाचार्याचे वडील नादिल्य हे पूजाअर्चा करीत होते. त्यानी याच देवाकडे पुत्रप्राप्तीसाठी याचना केली देवांच्या आशीर्वादाने त्याना पुत्र झाला तोच पुढे मध्वाचार्य म्हणून कार्य करू लागला मध्वाचार्यंचा जन्म इ. स. १३१३ मधला. त्यांनी लहानपणापासूनच संस्कृत भाषेत नैपुण्य मिळविले अच्युत पक्षाचार्य याच्याकडून त्यानी दीक्षा घेतली ही दीक्षा अद्वैत मताची होती पण पुढे मध्वाचार्यांना द्वैत मत अधिक पटू लागले गीता, ब्रम्हसूत्रे, उपनिषदे याच्यावर त्यानी द्वैत मतास अनुसरून प्रवचने दिली अनेक ठिकाणी वैष्णव धर्माचा व द्वैत मताचा प्रसार करून ते उडुपीस स्थायिक झाले. यज्ञात जे बळी दिले जात ते मध्वाचार्यांनी बद केले. पशुहत्या बद करून त्यानी अहिसेचा प्रभाव पाडला मध्वाचार्यांनी उडुपी येथे आठ मदिरे बांधली त्यापैकी एका मदिरात त्यानी विष्णूची शाळिग्राम मूर्ती स्थापन केली. मध्वाचार्यांचे शिष्य नाकापासून कपाळाच्या केसापर्यंत उभे गंध लावतात. गधाच्या मधोमध काळी रेघ असते कानाजवळ, बाहूवर आणि छातीवर चदनाच्या मुद्रा काढण्याचीही माध्वांची पद्धत आहे. अंकन (देह चिन्हानी अकित करणे), नामकरण आणि सतत हरिभजन ही मध्वाचार्यांच्या शिष्यांच्या उपासनेची तीन अंगे आहेत. नामकरण म्हणजे मुलाची नावे विष्णूच्या एखाद्या नावावरून ठेवणे विष्णूची सहस्त्र नावे असल्याने या कामी टचाई भासत नाही 'हरिभजनाविण काळ घालवू नको रे' हे माध्वाचे ध्येयवाक्य आहे मध्वाचार्यांना ऐंशी वर्षांचे दीर्घ आयुष्य लाभले त्यानी ते धर्मप्रसार आणि भक्ती यात उत्तम रीतीने व्यतीत केले कर्नाटकात त्यानी माध्वसप्रदाय हा प्रभावी संप्रदाय सुरू केला. त्याचे शिष्य हरिदास म्हणून ओळखले जाऊ लागले नरहरितीर्थ हे मध्वाचार्यांचे पट्टशिष्य हरिदास होते कीर्तन-प्रवचन करणे हे हरिदासाचे मुख्य कार्य होते कीर्तनाच्या रुपाने त्यांची धर्माची तत्त्वे सर्वसामान्य लोकाच्यापर्यंत

पोचविली मध्वाचार्यांच्या निर्वाणानतर नरहरितीर्थ त्याच्या पीठावर आले व त्याच्यानतर श्रीपदराय हे मठाचे आचार्य झाले याच पीठाचे आचार्य व्यासराय हे विजयनगरच्या सम्राटाचे राजगुरू होते पुढे पुरदरदास आणि कनकदास हे याच हरिदास ऊर्फ दासकूट पथाचे महान प्रसारक होऊन गेले आपल्याकडे जशी नामदेव व तुकाराम याची महती आहे तशीच कर्नाटकात पुरदरदास व कनकदास याची आहे

मध्वाचार्य याच्या मठात मूर्ती नसून एक शिला आहे या शिलेवर बसून मध्वाचार्य प्रवचने देत म्हणून ती माध्वाना अत्यत पवित्र आहे मदिराच्या गाभाऱ्याबाहेर मात्र मध्वाचार्यांची मूर्ती आहे असे सांगतात की जिथे शिला आहे त्यावरही मूर्ती बसवावी असा भक्तांचा बेत होता. पण मध्वाचार्यांनी दृष्टान्त देऊन आदेश दिला की, 'माझ्या डोकीवर दगड बसवू नका' म्हणून ती मूर्ती आत न बसविता बाहेर ठेवण्यात आली

अनतेश्वर मदिराचे आवार खूपच प्रशस्त आहे त्यात अनतेश्वर, चंद्रेश्वर अशी दोन मदिरे; मध्वसरोवर कुड आणि कृष्ण मठ, पालिनार मठ, पुट्टिगे मठ, वाडिराज मठ असे अनेक आहेत आवारात बऱ्याच गाईही आहेत त्यामुळे आवारात अगदी गोकुळात आल्यासारखे वाटते हे मदिर ∩ अशा आकाराचे म्हणजे इग्रजी 'यू' हे अक्षर उलट धरले असता जसा आकार होईल तसे आहे या शैलीला गजपृष्ठशैली म्हणतात. सुरुवातीलाच मध्वाचार्य मठ लागतो त्याचे वर्णन वर आलेले आहे ज्या फरशीवर मध्वाचार्य बसत असत, ती बदिस्त आहे व एका झरोक्यातून ती पाहावी लागते. मात्र हिच्याभोवती प्रदक्षिणा मार्ग आहे अनतेश्वर मंदिराजवळच चद्रमौलिश्वराचे मदिर आहे. या ठिकाणी पुराणकालात चद्राने तप करून शंकराला प्रसन्न करून घेतले व तिथे शकराने चद्राला दर्शन दिले अशी आख्यायिका या मदिराच्या सदर्भात सागण्यात येते हे मदिर अनतेश्वर मदिरापेक्षा लहान आहे

याच आवारात श्रीकृष्णाचेही मदिर आहे मध्वाचार्यांच्या धर्मकृत्यामुळे आकर्षित होऊन श्रीकृष्ण द्वारकेहून येथे आले अशी आख्यायिका आहे श्रीकृष्णाचे हे मदिर तेराव्या शतकातील आहे. या मूर्तीचे कथा अशी की, द्वारकेहून उडुपीला ही मूर्ती घेऊन येणारी नाव मालये येथे फुटल्याचा दृष्टान्त मध्वाचार्यांना झाला तेव्हा ते मालये येथे गेले आणि त्यानी ही मूर्ती

कृष्णभक्त उडुपी या शब्दाचा आणखी एक अर्थ सांगतात व तो अधिक ग्राह्य मानतात उडुपी या संस्कृत शब्दाचा अर्थ नाव असा आहे श्रीकृष्ण नावेतून द्वारकेहून या गावी आला म्हणून त्याचे नाव उडुपी पडले असे कृष्णभक्त सांगतात मालये गावाजवळ श्रीकृष्णाची नाव फुटली असे सांगण्यात येते. उडुपीमध्ये अनंतेश्वर किंवा भुजंगशयनाचे मंदिर आहे अनंत म्हणजे शेष शेषशायी भगवानाच्या या मंदिरात मध्वाचार्यांचे वडील नादिल्य हे पूजाअर्चा करीत होते त्यांनी याच देवाकडे पुत्रप्राप्तीसाठी याचना केली देवाच्या आशीर्वादाने त्यांना पुत्र झाला तोच पुढे मध्वाचार्य म्हणून कार्य करू लागला मध्वाचार्यांचा जन्म इ स १२१३ मधला. त्यांनी लहानपणापासूनच संस्कृत भाषेत नैपुण्य मिळविले अच्युत पक्षाचार्य यांच्याकडून त्यांनी दीक्षा घेतली ही दीक्षा अद्वैत मताची होती. पण पुढे मध्वाचार्यांना द्वैत मत अधिक पटू लागले गीता, ब्रम्हसूत्रे, उपनिषदे यांच्यावर त्यांनी द्वैत मतास अनुसरून प्रवचने दिली अनेक ठिकाणी वैष्णव धर्माचा व द्वैत मताचा प्रसार करून ते उडुपीस स्थायिक झाले. यज्ञात जे बळी दिले जात ते मध्वाचार्यांनी बंद केले. पशुहत्या बंद करून त्यांनी अहिंसेचा प्रभाव पाडला मध्वाचार्यांनी उडुपी येथे आठ मंदिरे बांधली. त्यापैकी एका मंदिरात त्यांनी विष्णूची शाळिग्राम मूर्ती स्थापन केली मध्वाचार्यांचे शिष्य नाकापासून कपाळाच्या केसापर्यंत उभे गंध लावतात गंधाच्या मधोमध काळी रेघ असते कानाजवळ, बाहूवर आणि छातीवर चंदनाच्या मुद्रा काढण्याचीही माध्वाची पद्धत आहे. अंकन (देह चिन्हांनी अंकित करणे), नामकरण आणि सतत हरिभजन ही मध्वाचार्यांच्या शिष्यांच्या उपासनेची तीन अंगे आहेत नामकरण म्हणजे मुलांची नावे विष्णूच्या एखाद्या नावावरून ठेवणे विष्णूची सहस्त्र नावे असल्याने या कामी टंचाई भासत नाही. 'हरिभजनाविण काळ घालवू नको रे' हे माध्वाचे ध्येयवाक्य आहे मध्वाचार्यांना ऐंशी वर्षांचे दीर्घ आयुष्य लाभले त्यांनी ते धर्मप्रसार आणि भक्ती यात उत्तम रीतीने व्यतीत केले. कर्नाटकात त्यांनी माध्वसंप्रदाय हा प्रभावी संप्रदाय सुरू केला त्यांचे शिष्य हरिदास म्हणून ओळखले जाऊ लागले नरहरितीर्थ हे मध्वाचार्यांचे पट्टशिष्य हरिदास होते. कीर्तन-प्रवचन करणे हे हरिदासांचे मुख्य कार्य होते. कीर्तनाच्या रूपाने त्यांची धर्माची तत्त्वे सर्वसामान्य लोकांच्यापर्यंत

पोचविली मध्वाचार्यांच्या निर्वाणानतर नरहरितीर्थ त्याच्या पीठावर आले व त्याच्यानतर श्रीपदराय हे मठाचे आचार्य झाले याच पीठाचे आचार्य व्यासराय हे विजयनगरच्या सम्राटांचे राजगुरू होते पुढे पुरदरदास आणि कनकदास हे याच हरिदास ऊर्फ दासकूट पथाचे महान प्रसारक होऊन गेले आपल्याकडे जशी नामदेव व तुकाराम याची महती आहे तशीच कर्नाटकात पुरदरदास व कनकदास याची आहे

मध्वाचार्य याच्या मठात मूर्ती नसून एक शिला आहे या शिलेवर बसून मध्वाचार्य प्रवचने देत म्हणून ती माध्वाना अत्यत पवित्र आहे मदिराच्या गाभाऱ्याबाहेर मात्र मध्वाचार्यांची मूर्ती आहे असे सागतात की जिथे शिला आहे त्यावरही मूर्ती बसवावी असा भक्ताचा बेत होता पण मध्वाचार्यांनी दृष्टान्त देऊन आदेश दिला की, 'माझ्या डोकीवर दगड बसवू नका' म्हणून ती मूर्ती आत न बसविता बाहेर ठेवण्यात आली

अनतेश्वर मंदिराचे आवार खूपच प्रशस्त आहे त्यात अनतेश्वर, चद्रेश्वर अशी दोन मदिरे, मध्वसरोवर कुड आणि कृष्ण मठ, पालिनार मठ, पुट्टिगे मठ, वाडिराज मठ असे अनेक आहेत आवारात बऱ्याच गाईही आहेत त्यामुळे आवारात अगदी गोकुळात आल्यासारखे वाटते हे मदिर ∩ अशा आकाराचे म्हणजे इंग्रजी 'यू' हे अक्षर उलट धरले असता जसा आकार होईल तसे आहे या शैलीला गजपृष्ठशैली म्हणतात सुरुवातीलाच मध्वाचार्य मठ लागतो त्याचे वर्णन वर आलेले आहे. ज्या फरशीवर मध्वाचार्य बसत असत, ती बंदिस्त आहे व एका झरोक्यातून ती पाहावी लागते मात्र हिच्याभोवती प्रदक्षिणा मार्ग आहे अनतेश्वर मदिराजवळच चंद्रमौलिश्वराचे मदिर आहे. या ठिकाणी पुराणकालात चद्राने तप करून शंकराला प्रसन्न करून घेतले व तिथे शकराने चद्राला दर्शन दिले अशी आख्यायिका या मदिराच्या सदर्भात सागण्यात येते हे मदिर अनतेश्वर मदिरापेक्षा लहान आहे

याच आवारात श्रीकृष्णाचेही मदिर आहे मध्वाचार्यांच्या धर्मकृत्यामुळे आकर्षित होऊन श्रीकृष्ण द्वारकेहून येथे आले अशी आख्यायिका आहे श्रीकृष्णाचे हे मदिर तेराव्या शतकातील आहे या मूर्तीचे कथा अशी की, द्वारकेहून उडुपीला ही मूर्ती घेऊन येणारी नाव माल्ये येथे फुटल्याचा दृष्टान्त मध्वाचार्यांना झाला तेव्हा ते मालये येथे गेले आणि त्यानी ही मूर्ती

२-श्रीराम
६५६
२६९४६
२५/१०/८३

उडुपीला आणली सत पुरदरदास आणि सत कनकदास हे कृष्णभक्त होते व कृष्णदर्शनासाठी उडुपीस यात्रा करीत असत. एकदा कनकदास येथे आले असताना त्याच्या एका भक्ताने त्याच्यासाठी मदिराच्या जवळ झोपडी बाधली. या झोपडीत बसून कनकदास भजन म्हणत असत पण मध्ये भिंत असल्याने त्याना श्रीकृष्णाची मूर्ती दिसत नसे स्वत श्रीकृष्णच या कनकदासाचे दर्शन घेण्यासाठी उत्सुक होते, म्हणून एका रात्री चमत्कार झाला आणि भूकप झाला कनकदास आणि कृष्णमूर्ती याच्यामधील भिंतीला खिंडार पडले व कनकदासाला मूर्ती दिसू लागली यामागे परमेश्वरच असल्याने मदिराच्या चालकानी हे खिंडार न बुजवता तिथे खिडकी केली ही खिडकी अजूनही कनकखिंड या नावाने तिथे आहे आठ मठाचे अधिपती प्रथम या खिडकीतून मूर्तीचे दर्शन घेऊन मगच मदिरात प्रवेश करतात. कनकदासाबद्दल आणखी एक कथा येथे प्रचलित आहे ती अशी की, कनकदासाच्या वेळी श्रीकृष्णास पचपक्वान्नाचा नैवेद्य देण्याची प्रथा होती. कनकदास गरीब होता तो स्वत भात उकडून खात असे. त्या भातावर वरणही नसे एकदा त्याने भातची मूद घेऊन मदिराच्या आवारात जेवण्यास प्रारभ केला तेव्हा कृष्णमदिराच्या मुदपाकखान्यातून वरण वाहत आले ते त्याने नारळाच्या करवटीत धरले व देवाला प्रसाद दिला तेव्हापासून तेथील पुजारी म्हणाले की, आमच्या पचपक्वान्नापेक्षा श्रीकृष्णास कनकदासाच्या वरण-भाताचीच आवड अधिक आहे. आजही इतर पक्वान्नाबरोबर श्रीकृष्णाच्या प्रसादात कनकदासाचा प्रसाद म्हणून वरण-भात ठेवतात. कृष्णमदिराबाहेर एक स्तभ असून तो कनकदास स्तभ म्हणून प्रसिद्ध आहे.

[illegible] उजवीकडेच जातो कारण तिथे मिरवणुकीत वापरतात तो भव्य रथ असतो. उजवीकडेच मदिराची कचेरी आहे. तिथून आत जाताना मध्व सरोवर लागते त्याच्या पश्चिमेकडून मदिरात प्रवेश करता येतो. प्रवेशद्वाराशी चेन्नकेशवाचा पुतळा आहे याच दरवाजातून स्वामीजी गर्भगृहात प्रवेश करीत असत सध्या हे दार फक्त दसऱ्याच्या दिवशीच उघडण्यात येते तेव्हा स्वामीजी या दरवाजातून प्रवेश करून नवे धान्य देवाला अर्पण करतात या खोलीत श्रीकृष्णाची सोन्याची पालखी ठेवलेली आहे ती कृष्णापूर मठाच्या ३३ व्या अधिपतीनी मदिरास दिलेली आहे पश्चिमेच्या बाजूस वेदपठन व कीर्तनाचे सभागृह आहे.

त्याला सूर्यशाला असे नाव आहे. त्या जवळच्या खोलीत देवाचा जमदारखाना आहे सभामडप आणि गर्भगृह याच्यामध्ये लहानशी वाट आहे. गर्भगृहाचा दरवाजा चादीचा आहे या दरवाजाला एक लहानशी खिडकी आहे तीतून मूर्तीचे दर्शन घ्यावे लागले. या खिडकीच्या दोन्ही बाजूना जय व विजय या द्वारपालाच्या मूर्ती आहेत या दरवाजावर विष्णूचे दहा अवतार चादीच्या पत्र्यावर कोरलेले आहेत

या खिडकीतून आत पाहिल्यावर कृष्णाची बालपणीची मूर्ती दिसते. ही मूर्ती लहानखुरी आहे मूर्तीच्या उजव्या हातात ताक घुसळण्याची रवी आहे आणि दुसऱ्या हातात दोरी आहे अशा तऱ्हेची कृष्णाची मूर्ती सबध भारतात ही एकमेव आहे मूर्तीच्या जवळ जे दिवे आहेत त्यापैकी एक दिवा स्वत: मध्वाचार्यांचा आहे तो दिवा कधीही विझू दिला जात नाही चैतन्य महर्षी या मदिरात आले तेव्हा त्यानी मध्वाचार्यांच्या दिव्यावर दुसरा दिवा पेटविला व तो घेऊन ते वृदावनाला गेले मुख्य मूर्तीच्या उजव्या हातास श्रीकृष्णाची वेणुगोपाल अवस्थेतील मूर्ती आहे मदिराच्या पश्चिमेस भिंतीत सुप्रसिद्ध कनक खिडकी आहे श्रीकृष्णाच्या या दोन्ही मूर्ती अयोध्येहून उडुपीस आणण्यात आल्या आहेत त्यानतर हनुमान व गरूड याच्या मूर्तीही अयोध्येहून आणून येथे बसविण्यात आल्या

कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षात येथे नृत्यगायनाचे कार्यक्रम होतात या तुळसी वृदावनाच्या पुढे मुदपाकखाना व कोठार आहे भोजनशाळेची ही इमारत २७ व्या स्वामींनी १९१५ मध्ये बाधली त्याच्या जवळच वसत महाल आहे तेथील व्यासपीठावर मोठमोठे आचार्य व कीर्तनकार कथाकीर्तने करतात जवळच्या मध्व सरोवराला पट्टिगे मठाच्या स्वामींनी सोळाव्या शतकात फरशी बाधून घेतली देवाची पूजाअर्चा करण्यापूर्वी या सरोवरात स्वामी स्नान करतात वैशाख महिन्यात वसत महालात वसतोत्सव साजरा करण्यात येतो वसत महालाच्या पूर्वेस सुब्रम्हण्यम मदिर आहे ते वादिराज यानी बाधले आहे मुख्य मदिराच्या आसपास आठ मोठे मठ असून पाच लहान मठ आहेत कनपूर मठ, पट्टिगे मठ, पालिमार मठ इत्यादी या मठात धर्मशास्त्राचा अभ्यास व पठन चालते

उडुपीपासून फक्त सहा किलो मीटर्सवर मणिपाल आहे मणिपाल हे डोंगर व टेकड्या याच्या बेचक्यात वसलेले गाव आहे या टेकड्यात एक लहानसे

तळे आहे पावसाळ्यात ते भरते तेव्हा पाणी व चिखल यानी हा भाग भरून गेलेला असतो तुळू भाषेत त्याला 'मणपाल' म्हणजे चिखलाचे तळे असे नाव आहे त्यावरूनच या गावाला मणिपाल हे नाव पडले आहे चाळीस वर्षांपूर्वी येथे हे चिखलाचे तळे आणि डोंगर व टेकड्या याशिवाय काहीही नव्हते आज मात्र अद्ययावत हॉस्पिटल, महाविद्यालये, बँका, कारखाने, उद्योगधदे यानी हा भाग भरगच्च झाला आहे

मगलोर ते उडुपी आणि नतर उडुपी ते गोकर्ण हा रस्ता भारतातील अत्यत नयनमनोहर व डोळे निववणाऱ्या रस्त्यापैकी एक आहे डावीकडे निळा अथाग सागर, उजवीकडे नारळाच्या उच उच राया, वरती निळे आकाश आणि समुद्रावरून येणारा थड सुखद वारा यामुळे हा प्रवास अगदी सस्मरणीय होतो शिवाय, मुबई-पुणे रस्त्यासारखी वाहनाची गर्दी नाही. वीसपचवीस मिनिटानी एखादी बस लागते, एवढी तुरळक वाहतूक मागून येणारी वाहने पुढे जाण्याची धडपड करीत नाहीत, की कर्कश कर्ण्यांनी कान किटत नाहीत रम्य निसर्गाच्या सागाती हळूहळू पुढे सरकायचे. मधूनच डावीकडचा समुद्र अदृश्य होऊन तो माडानी झाकला जातो आणि हिरव्या गर्द झाडीत छोटेसे बैठे गाव लागते एवढेच उडुपी ते गोकर्ण हे अतर १८० किलो मीटर्सचे

अद्‌भुतता हा आपल्या सर्वच पुराणाचा विशेष आहे पण गोकर्णाची निर्मिती हे अद्‌भुत रसातीलही अद्‌भुत आहे रामायण, महाभारत, भागवत, स्कद पुराण, काशीखड अशा प्राचीन पुराण ग्रथाप्रमाणेच रघुवशासारख्या श्रेष्ठ कृतीतही गोकर्णाचा उल्लेख आहे वाल्मीकी रामायणात उत्तरकाडात रावणाने गोकर्णास ठेवलेल्या शिवलिंगाचा उल्लेख आहे महाभारतात आदिपर्वात अनेक उल्लेखापैकी एक असा आहे

अथ गोकर्णमासाद्य त्रिषु लोकेषु विश्रुत ।
समुद्रमध्ये राजेंद्र सर्वलोकनमस्कृतम् ॥

रघुवशातील आठव्या सर्गात म्हटले आहे,

अथ रोधसि दक्षिणोदधे·
श्रितगोकर्णनिकेतमीश्वर ।
उपवीणयितु ययौ रवे-
रुदयावृत्तिपेदन नारदः ॥ ३३ ॥

आपल्या पुराणानुसार श्रीक्षेत्र गोकर्णाची कथा सृष्टीच्या निर्मितीपासून सुरू होते सृष्टीच्या प्रारभी सारे जलमय होते ब्रम्हदेवाने शकराची ऊर्फरुद्राची निर्मिती केली आणि सृष्टी रचण्याची जबाबदारी त्याच्यावर सोपवली रुद्राने असा विचार केला की, अमर, सत्त्वगुणी व समानसत्त्व अशी प्रजा उत्पन्न करावी त्यासाठीच तो पाताळात जाऊन घोर तपश्चर्या करू लागला

तीन युगे लोटली तरी त्याचे तप सपेना ब्रम्हदेवाला चिंता पडली की रुद्राच्या कल्पनेतील सृष्टी प्रत्यक्षात आली तर सर्वच आदर्श शिव होतील म्हणून त्याने त्रिगुणात्मक अशी सृष्टी निर्माण केली सत्त्व, रज व तम हे ते तीन गुण होत रुद्राला जेव्हा ही गोष्ट समजली तेव्हा तो भयकर सतप्त झाला सृष्टी नष्ट करण्याचा विचार त्याने केला तेव्हा तो पाताळात म्हणजे पृथ्वीच्या पोटात होता पृथ्वी भयभीत होऊन म्हणाली, "तू रुद्ररूप घेऊन बाहेर आलास तर माझा नाश होईल म्हणून मी गोमातेचे रूप घेते तू सूक्ष्म रूप घे आणि माझ्या कानातून बाहेर पड." ही विनती रुद्राने मान्य केली गोकर्ण या ठिकाणी तो बाहेर पडला म्हणून गाईचा कान या अर्थाने गोकर्ण हे नाव या जागेला पडले. ज्या ठिकाणाहून रुद्र पाताळातून वर आला ते ठिकाण आदी गोकर्ण म्हणून प्रसिद्ध आहे. त्यावर जे शिवलिंग आहे त्याला आत्मलिंग म्हणतात

असो. स्मशानाकडून पुन्हा पुराणाकडे वळू. रुद्राने ब्रम्हसृष्टीतील सर्व प्राण्याचे सत्त्व काढून एक महाबलशाली असे आत्मलिंग बनवले लकेत रावणाने त्याचा प्रभाव हेरला आणि त्याच्या प्राप्तीसाठी घोर तपास आरभ केला नेहमीप्रमाणे नारदाला ती गोष्ट समजली त्याने इद्राला सागितले की, "अरे बाबा, रावणाने ते लिग प्राप्त करून घेतले तर तो सर्व देवाना नामोहरम करू शकेल" मग देवानी डावपेच करण्यास सुरुवात केली

रावणाने रुद्राला प्रसन्न करून घेतले आणि आत्मलिंग मिळवले पण रुद्राने ते देताना बजावले, 'हे लिंग जिथे जमिनीवर ठेवले जाईल, तिथेच ते स्थिर होईल" ते लिंग घेऊन रावण लकेकडे निघाला एकदा का रावण आत्मलिंगासह लकेस पोहोचला तर तो महाशक्तिमान व अजिक्य होईल म्हणून तो लकेला जाण्यापूर्वीच त्याची व आत्मलिंगाची फारकत करावयाची, असे देवानी ठरवले रावण जेव्हा आत्मलिगासह गोकर्णास आला तेव्हा विष्णूने एक डाव रचला रावण हा ब्राम्हण होता व तो न चुकता सध्यावदन करीत

असे विष्णूने गणपतीला बोलावले व त्याला सांगितले की, ''तू गुराख्याच्या मुलाचे रूप घेऊन गोकर्णात रावणाजवळ उभा रहा संध्याकाळ झाली की, रावण तुझ्या हाती आत्मलिंग देऊन संध्येस बसेल तू रावणाला सांग की, हे आत्मलिंग मला फार जड वाटू लागले तर मी तुला तीन वेळा हाक मारीन त्या तीन हाकात तू आला नाहीस, तर मी ते खाली ठेवीन'

यावेळी संध्याकाळ झाली नव्हती, पण विष्णूने आपले सुदर्शन सूर्याच्या आड धरले आणि संध्याकाळचा आभास निर्माण केला. संध्याकाळ झाली असे समजून रावणाने आत्मलिंग गुराख्याच्या मुलाच्या रुपातील गणपतीच्या हाती दिले. गणपतीनेही विष्णूने पढविल्याप्रमाणे रावणाला बजावले रावण संध्येस बसला व गायत्री मंत्र जपू लागला तेव्हा गणपतीच्या हातातील आत्मलिंग जड व्हावे म्हणून देवांनी त्रैलोक्याचा भार त्यावर टाकला गणपतीने भराभर रावणाच्या नावाचा तीन वेळा पुकार केला आणि आत्मलिंग जमिनीवर ठेवले विष्णूने सुदर्शन मागे घेतले तेव्हा संध्याकाळ झाली नाही हे रावणाच्या लक्षात आले त्याने पाहिले तो आत्मलिंग जमिनीवर स्थापित झाले आहे ते वर काढण्याचा त्याने कसोशीने प्रयत्न केला पण ते काही केल्या जमिनीतून वर निघेना. या प्रयत्नात रावण मूर्च्छित होऊन पडला शुद्धीवर आल्यावर रावणाने रागाने त्या आत्मलिंगावरचे लिंगाला गुंडाळलेले वस्त्र, लिंग ठेवलेले संपुट (करंज) व संपुटावरचे झाकण वेगवेगळ्या दिशांना फेकून दिले तीही तीर्थे झाली संपुटेश्वर आणि मुर्डेश्वर या नावाची ही तीर्थक्षेत्रे आहेत जिथे आत्मलिंग स्थिर झाले तेच गोकर्ण. रावण शरमिंदा होऊन लंकेला गेला

गोकर्णचे मुख्य मंदिर समुद्रकिनाऱ्यावर आहे. हे महाबळेश्वरचे मंदिर मध्यम आकाराचे, पारंपरिक पद्धतीचे आहे या मंदिराच्या आवारात अनेक लहान लहान मंदिरेही आहेत गोकर्णचे पुजारी सांगतात की काशीपेक्षा गोकर्णाचे धार्मिक महत्त्व गुंजभर अधिक आहे, असे दाखविणारी ताम्रगौरीची मूर्ती इथे आहे हिच्या हातातील तराजूत एका पारड्यात काशी, दुसऱ्या पारड्यात गोकर्ण असून गोकर्णाचे पारडे जड आहे समुद्रकिनाऱ्याजवळ चाळीस फूट उंचावर कल्केश्वर मंदिर आहे त्याशिवाय नागेश्वर, वैतरणी, दुर्गादेवी, भद्रकाली इत्यादी मंदिरे येथे आहेत

❑

भू-प्रवास

# ७. गुलबर्गा, गाणगापूर आणि बिदर

गुलबर्गा हे तीन लाख वस्तीचे गाव पूर्वी ते निजामाच्या राज्यात होते. भाषावार प्रातरचनेनतर ते कर्नाटकात आले आहे गुलबर्गा हे नाव कलबुर्गी या नावाचा अपभ्रश होऊन आले आहे आजही ग्रामीण भागात त्याला कलबुर्गी असे म्हणतात कलबुर्गी या नावाचा उल्लेख असलेला शीलालेख हुणची हडट्टीळ या गावात सापडला आहे तो सहाव्या विक्रमादित्याच्या काळातील म्हणजे इ स १०९५ मधील आहे कानडीमध्ये कल्ल म्हणजे दगड असा अर्थ असून दुर्गाचा भाग म्हणून कलबुर्गी असे नाव पडले अशी एक उपपत्ती आहे मात्र सरकारी गॅझेटियरमध्ये असा उल्लेख आहे की, गुल म्हणजे फूल व बर्गा म्हणजे पान, यावरून गुलबर्गा असे नाव पडले आहे

हैहय वशातील रेवरस याची सत्ता गुलबर्गा, रायचूर व आसपासच्या दोन हजार गावावर होती त्याचा अमल इ स १०५० च्या सुमारास होता इ स ९४० च्या सुमारास झालेल्या कालचद्राच्या स्मरणार्थ गुलबर्गा येथील कमलेश्वर हे मदिर स्थापन झाले असावे असा अदाज आहे या गावाचे नामातरही झाले आहे हसनगगू बहामनी याने इ स १३५२ साली आपली राजधानी देवगिरीहून गुलबर्गा येथे हलविली त्यावेळी त्याने या गावाचे नाव हसनाबाद असे ठेवले नतरची चारशे वर्षे हे गाव हिरापूर-हसनाबाद या नावाने ओळखले जात होते हैहय वंशाची सत्ता रामदेव यादवने १२९२ मध्ये सपविली यादवांचे राज्य तुगभद्रेपासून नर्मदेपर्यंत विस्तारलेले होते १३०६ ते १३५२ पर्यंत गुलबर्ग्यावर मुसलमानाच्या आठ स्वाऱ्या झाल्या, त्यामुळे या भागात हिंदूच्याप्रमाणेच मोगल सस्कृती व धर्म याच्याही विपुल खुणा दिसतात

गुलबर्गा येथील सुप्रसिद्ध दर्गा केवळ भव्य आहे, इतकेच नव्हे तर त्याची धार्मिक व सांस्कृतिक पार्श्वभूमीही श्रेष्ठ आहे हा भाग म्हणजेच एकच दर्गा नसून अनेक मशिदी, दर्गे, मदरसे आणि निवासी स्थाने याचे एक मोठेच केंद्र आहे हजरत गेसू दराझ याचा दर्गा हा मुख्य दर्गा आहे ज्याच्या नावावरून हा दर्गा ओळखला जातो, ते हजरत सय्यद महम्मद

हुसैनी ख्वाजा बंदा नवाझ गेसुद्रास हे पैगबर महमद याच्या बाविसाव्या पिढीतील शिष्य होते त्याचा जन्म दिल्लीत हिजरी ७२१ मध्ये झाला त्याना लहानपणीच साधना प्राप्त झाली ते पीर हझरा ख्वाजा नसिरुद्दिन महमद चिराग देहलवी यांचे शिष्य झाले व गुरूच्या निधनानतर हिजरी ७२७ मध्ये त्याच्या जागी आले त्यानी चाळीस वर्षे दिल्लीत धर्मसाधना केली आणि हिजरी ८०३ मध्ये ते गुलबर्गा येथे आले येथे त्याना फार मोठा शिष्यवर्ग मिळाला येथे त्यानी महान धार्मिक, सास्कृतिक व साहित्यिक कार्य केले त्यांच्या निधनानतर बाधलेल्या कबरीचा शिलान्यास सुलतान अहमद शहा बहामनी याने केला हजरत गेसू दरझ याचे वैशिष्ट्य असे की त्याची शिकवण एकाच धर्मासाठी नव्हती तर सर्व धर्मासाठी होती मानवतावादी दृष्टिकोनातून ते उपदेश करीत असत इ स १४२२ मध्ये त्याचे निधन झाले

या दर्ग्याच्या बाधकामास पधराव्या शतकात सुरुवात झाली तरी काही भाग सतराव्या शतकापर्यंत बाधला जात होता दर्ग्यावर फारशी कलाकुसर नाही पण हिंदू शैलीतील काही भाग दिसतात लक्षात राहण्यासारखी एक गोष्ट म्हणजे मोठ्या कमानीवर शिवलिंग आहे असे इतरत्र मशीद अगर दर्ग्यात दिसत नाही त्याबद्दलची लोककथा अशी की, ही भव्य कमान बाधली जात असताना तीन वेळा कोसळली त्यावेळी असा दृष्टान्त झाला की, येथे महादेवाचे जागृत स्थान आहे कमानीवर महादेवाची पिंड असेल, तर कमान टिकेल त्याप्रमाणे कमानीच्या मध्यभागी महादेवाची पिड ठेवली व कमान टिकली हे शिवलिंग आजही कमानीवर दिसते दोनशे वर्षे दर्गा बाधला जात असल्याने त्याच्या उभारणीत विविध शैली आढळतात दक्षिणेची मोठी कमान ओलाडून गेल्यावर उजवीकडे दर्ग्याची कचेरी लागते मोठे पटागण सपल्यावर डावीकडे हजरत गेसू दरझ दर्गा आहे त्याचा घुमट फारच मोठा व पाहताक्षणी आपल्या भव्यतेने छाप पाडणारा आहे आत कबर आहे आतील भिंतीवर कुराणातील वचने रगविली आहेत तीनशे वर्षांनतरही हे रग अजून चागल्या स्थितीत आहेत

या दर्ग्याजवळच गुलबर्ग्याचे दुसरे एक सत शहा कमल मुजारद याचा दर्गा आहे तिथे पधराव्या शतकाच्या शैलीतील एक लहान मशीद आणि या सताची कबर आहे या मशिदीतील कलाकुसर लक्षात राहण्यासारखी असून

इतकी कलाकुसर गुलबर्ग्यातील इतर कोणत्याही मशिदीत नाही या मशिदीजवळ ज्या दोन इमारती आहेत, त्यापूर्वी सराया किंवा यात्रेकरूना राहण्याच्या जागा होत्या गुलबर्ग्याच्या उत्तरेला लगर की मशीद नावाची एक मशीद आहे ती पधराव्या शतकात बाधली गेली या मशिदीचे प्रार्थनागृह वेगळे आहे. अनेक कमानींनी ते सिद्ध झाले आहे व या कमानीपैकी मुख्य कमान ही नक्षीची आहे. तिच्याकडे तोंड करून नमाज पढला जात असे या मशिदीच्या शैलीत मुस्लिम व हिंदू शैलीचे मिश्रण दिसते

पहिल्या बहामनी सुलतानाचे गुरू शेख सिराउद्दिन जुनयादी याचा दर्गा बहामनी सुलतानांच्या कबरीजवळ आहे चौदाव्या शतकाच्या अखेरच्या शैलीतील ही कबर आहे ही साधीच आहे, पण सोळाव्या शतकात विजापूर राज्याचा सस्थापक युसुफ आदिल खान याच्या कबरीजवळ एक भव्य कमान आहे जवळच दोन उच मिनार आहेत चोर गनबाद नावाची एक इ स १४२० मधील इमारत गुलबर्ग्यात आहे हे विचित्र नाव पडण्याचे कारण असे की, एका धनिक व्यापाऱ्याने हजरत गेसू दरझ याच्यासाठी ती बाधली, पण त्यानी ती स्वीकारण्यास नकार दिल्याने ती रिकामी पडून राहिली त्या रिकाम्या इमारतीत चोराची वस्ती वाढली म्हणून तिला चोर गनबाद असे नाव पडले

गुलबर्ग्याचा किल्ला हा एक विशेष लक्षणीय असा बळकट किल्ला आहे. त्याची काळ्या फत्तराची लांबून दिसणारी तटबदी आपले सहजच लक्ष वेधून घेते सुपर मार्केटकडून एस टी स्टँडकडे जाताना उजवीकडे खदक व ही तटबंदी दिसते अल्लाउद्दीन हसनगगू बहामनी आणि त्याचा मुलगा यानी हा किल्ला बांधला. चौदाव्या शतकात बदुकीच्या दारूचा शोध लागला, त्यामुळे त्या काळच्या संरक्षण व्यवस्थेत आमूलाग्र क्राती झाली या क्रातीची दखल हा किल्ला बाधताना घ्यावीच लागली प्रचंड तोफा बसवून किल्ल्याबाहेरील शत्रूसैन्यावर त्या डागण्यासाठी उच बुरूज बाधण्यात आले तटाला भोके ठेवून त्यातून बदुका मारण्यासाठी मारगिऱ्या तयार करण्यात आल्या या किल्ल्यातील जामी मशीद ही भव्य आहे व अनेक वैशिष्ट्यामुळे ख्यातनाम झाली आहे २१६ फूट लाब व १७६ फूट रुदीच्या या प्रचड मशिदीत एकशे चार खाब आहेत विशेष म्हणजे

मशिदीच्या भिंती, खाब व घुमट याची चकाकी अजूनही उत्तम आहे. हसनगगू बहामनीच्या काळात ही मशीद बाधण्यास सुरुवात झाली. दरवेश सैफुद्दौला शहा याच्या मार्गदर्शनाखाली फेब्रुवारी १३५३ ते जानेवारी १३५४ पर्यंत या मशिदीचे बाधकाम झाले या मशिदीत उघडे पटागण नाही व सपूर्ण मशीद घुमटानी व गच्चीने झाकलेली आहे अशी ही भारतातील एकमेव मशीद आहे, असे वास्तुशिल्पतज्ज्ञानी म्हटले आहे या मशिदीत पाच हजार लोक प्रार्थना करू शकतात. दक्षिणेत त्याकाळी ही सर्वात मोठी मशीद होती या मशिदीच्या शैलीवर स्पॅनिश शैलीचा प्रभाव दिसतो हे हिचे आणखी एक वैशिष्ट्य या मशिदीपुढे एक शिलालेख आहे. त्यात म्हटले आहे की, शम्सचा मुलगा रफी याने शहा बहामनी याच्या आज्ञेबरहुकूम ही मशीद बाधली

किल्ल्याची तटबदी आतून बरीच ढासळली आहे त्यावरून बाहेरून भक्कम वाटणारी तटबदी नतर डागडुजी करून बळकट केली असावी हे लक्षात येते किल्ल्यात एक प्रचड, पहाडासारखा उंच बुरूज आहे. त्यावर ३५ फूट मोठी तोफ बसवलेली आहे. हा बुरूज बाराह मलिक याने १६२३ साली बाधला इ स १६८३ साली औरगजेबाने गुलबर्गा जिंकले आणि या किल्ल्यात तोफा ओतण्याचा आणि दारूगोळा तयार करण्याचा कारखाना सुरू केला त्यासाठी त्याने बाधलेली अनेक कोठारे आजही पाहायला मिळतात किल्ल्यात काही घरे आहेत, मशिदीचा भाग सोडला तर आजचा किल्ला हा पडीक, भकास व उदास वाटतो दर्शनी कमान मात्र भव्य व आकर्षक आहे

गुलबर्गा व बिदर या भागाचा उल्लेख पुराणात मणिचूल पर्वत किंवा मणिगिरी असा आढळतो. बिदरचे पूर्वी विदुरनगर असे नाव होते 'रसकौमुदी' हा मराठी भाषेतील रसव्यवस्थेविषयीचा आद्य ग्रथ याच भागात विठ्ठल गलड यानी शके १४५६ मध्ये रचला आहे ते विजापूरहून गुलबर्गा येथे आले होते गुलबर्गा येथून तीस मैलावर गाणगापूर हे दत्त सप्रदायातील तीर्थक्षेत्र आहे आळद-गुलबर्गा रस्त्यावरील कडगत्ती येथील कवी सरस्वती गगाधर यानी 'गुरुचरित्र' या ज्येष्ठ ग्रथाची रचना शके १४७० च्या सुमारास केली आळद तालुक्यातील किणी सुलतान येथील रामचद्र सेतवाल या कवीने मराठी ग्रथ लिहिले आहेत बिदर जिल्ह्यातील

अनेक मठातील शिष्यानी ग्रथरचना केली आहे बिदरचे विणे अण्णा दफ्तरदार यांनी अनेक अभग लिहिले आहेत 'धन्य धन्य हो प्रदक्षिणा गुरुरायाची' हे त्याचे पद आज घरोघर झाले आहे कल्याणी येथील आनद सप्रदायी सदानद मठातील अनेक शिष्यानी रसात्मक रचना केल्या आहेत गाणगापूर येथील श्री. सच्चिदानद सरस्वती याची चरित्रात्मक पोथी सोमेश्वर यानी लिहिली असून ती २१ अध्यायाची आहे कोनेरराव, सावळेश्वर यानी सूफी पथावर लिहिलेली कैफियत आता अडीचशे वर्षांची झाली आहे दासोपतांचे चरित्र लिहिणारे हनुमदात्मज हे बिदरचेच बिदरजवळील अष्टूर येथील अलतमखान याच्या काव्यरचनाही प्रसिद्ध आहेत

जगदीश कवीने श्री चद्रालोपाख्यान लिहिले आहे महादेव मठात 'वरदनागेश' हा ग्रथ रचला गेला शिवरामस्वामी हा या भागातील कवी रामदास व तुकाराम यांचा समकालीन होता आद्य शकराचार्यांप्रमाणे या कवीसही फक्त ३२ वर्षांचे आयुष्य मिळाले पण या अल्पावधीत त्यानी १३० ग्रथ लिहिले शिवराम स्वामी हे सत एकनाथाचे पणतू होते

गुलबर्ग्यापासून तीस मैलावर क्षेत्र गाणगापूर आहे तिथे श्रीदत्त मदिर आणि श्री नरसिंह सरस्वती याच्या निर्गुण पादुका आहेत दत्त संप्रदायाचे हे महान पवित्र क्षेत्र आहे गाव लहानसेच आहे तीन-साडेतीनशे घरांचे, आपल्याकडील नृसिंहवाडीच्या सारखे बस-स्टँडपासून मदिरापर्यंत फरशीचा रस्ता आहे वाटेत सर्व क्षेत्रात असतात तशी माळा, प्रसाद, नारळ, प्लॅस्टिकची खेळणी, देवाचे फोटो वगैरेची दुकाने आहेत

गावात आठदहा धर्मशाळा आहेत त्यात चिदानद, जेठमल, केशवसुती, श्री. वासुदेवानद सरस्वती, चिदबर इत्यादी नावाच्या धर्मशाळाचा समावेश होतो. दत्त मदिराच्या दर्शनी बाजूला भव्य महाद्वार किंवा गोपुर आहे त्यावर श्रीदत्त व इतर देवदेवताच्या मूर्ती आहेत मदिराच्या सभोवती उच भिंत आहे गाणगापूर हे गाव भीमा नदीच्या काठी आहे त्यामुळे आजूबाजूला झाडे व पिके आहेत व हवेत थडावाही असतो गाणगापूर हे दत्त सप्रदायात राजदरबाराचे क्षेत्र आहे असे भक्त मानतात. या दरबारात भूतपिशाच्चे आपल्या योनीतून मुक्त होतात, अशीही त्याची श्रद्धा आहे

महाद्वारातून आत गेल्यावर दत्तमदिर लागते त्याचे स्तभ उत्तम कोरीव कामामे समृद्ध आहेत. वर सपाट छत्त असून मध्येच शिखर आहे लंबचौकोनी मडप व त्यात गर्भगृह अशी मदिराची रचना आहे मडपासमोर तुलसी वृदावन व दक्षिणेस औदुबर वृक्ष आहे गर्भगृहाच्या उत्तरेला भिंतीत एक खिडकी आहे त्या खिडकीतून दत्ताचे दर्शन घेता येते जवळच श्री नरसिह ग्ररस्वती यांनी स्थापन केलेल्या निर्गुण पादुका आहेत या पादुकामुळेच गाणगापूरला महत्त्व आले आहे श्री नरसिह सरस्वती यांचा काळ इ॰स १३८० ते १४५९ असा होता. ते श्रीदत्ताचे तिसरे अवतार होते अशी दत्तभक्ताची श्रद्धा आहे ब्रम्हा, विष्णू व शकर याचा पहिला अवतार म्हणजे श्रीदत्त श्रीपाद वल्लभ हे दत्ताचे दुसरे अवतार होते असे मानले जाते याचा जन्म वऱ्हाडात करजपूर येथे झाला सहा वर्षांचे होईपर्यंत ते ओंकाराशिवाय काहीही बोलत नसत आपला मुलगा मुका झाला अशी आईबापाना भीती वाटू लागली सातव्या वर्षी त्याची मुज केली आई भिक्षा वाढण्यास आली पहिली भिक्षा झोळीत पडताच श्री नरसिंह सरस्वती ऋग्वेद म्हणू लागले दुसरी भिक्षा आईने वाढली तेव्हा त्यानी यजुर्वेद म्हटला व तिसऱ्या भिक्षेच्या वेळी सामवेद म्हटला. चारी वेदात मुलगा वयाच्या सातव्या वर्षीच पारगत झालेला पाहून हा परमेश्वराचाच अवतार आहे अशी सर्वांचीच खात्री झाली

वर्षभराने नरसिंह सरस्वतींनी तीर्थयात्रेसाठी मातापित्याचा निरोप घेताना 'आता एकवीस वर्षांनी भेट होईल' असे सागितले काशीस जाऊन त्यानी सन्यास घेतला तीर्थाटन करीत ते गाणगापूरला आले व भीमा-अमरजा सगमावर राहिले येथे अनेक वर्षे राहून त्यानी धर्मकार्य केले व मग श्रीशैलास निघून जाऊ लागले. तेव्हा हजारो भक्तानी साकडे घातले आणि स्वामींनी येथेच राहावे असा आग्रह धरला त्यावेळी श्री नरसिंह सरस्वती यानी आशीर्वाद दिला की, 'मी यापुढे देहरूपाने येथे नसलो तरी माझ्या निर्गुण पादुका मठात राहतील त्या रूपाने मी येथे राहीन,' असे सागून ते श्रीशैलास गेले शके १३८० मध्ये माघ वद्य प्रतिपदेस ते अनतात विलीन झाले त्यानी येथे केलेल्या अनेक चमत्काराच्या कथा या भागात ऐकावयास मिळतात श्री क्षेत्र गाणगापूरपासून दोन फर्लांगावर कल्लेश्वर नावाचे देवस्थान आहे तिथे नरकेशरी नावाचा भक्त शकराची आराधना

करण्यासाठी राहत होता जवळच इट्टगी हे गाव आहे तिथे सच्चिदानद महाराजांची समाधी आहे

गाणगापूरपासून दोन मैलावर पश्चिमेस भीमा व अमरजा या नद्याचा सगम आहे या ठिकाणी श्री नरसिंह स्वामी स्नान करीत होते, त्यामुळे या ठिकाणास महत्त्व प्राप्त झाले आहे सगमावर एक दत्त मदिरही आहे या मदिरापुढे एक अश्वत्थ वृक्ष होता त्या वृक्षाखाली श्री नरसिंह सरस्वती हे अनुष्ठानास बसत असत आता हा वृक्ष पडला आहे, पण तिथे पादुका व शिवलिंग याची स्थापना करण्यात आली आहे. मुख्य मदिरात त्रिमूर्ती दत्ताचे दर्शन घेता येते. या मदिराच्या मागे सगमेश्वर मदिर आहे दत्तमदिरामागे मोठा औदुबर वृक्ष लावण्यात आला आहे विश्रातीकट्टा नावाचे एक ठिकाण ह्या भागात आहे तिथे श्री नरसिंह सरस्वती हे सगमावरून गाणगापुरास जातायेताना विश्राती घेत असत याशिवाय षटकुलतीर्थ, नरसिंहतीर्थ, भागीरथीतीर्थ, पापविनाशतीर्थ, कोटितीर्थ, रुद्रवादतीर्थ, चक्रतीर्थ आणि मकरतीर्थ अशी आठ तीर्थे सगमावर आहेत गाणगापूर येथील दत्ताची पूजा रोज पहाटे तीन वाजता सुरू होते मग माध्यान्ह पूजा व रात्री आठ वाजता पूजा-आरती होते. रोज रात्री व विशेषत: गुरुवारी रात्री उत्सवमूर्तीची पालखी निघते गुरुवारची पालखी मोठी असते व त्यावेळी भक्तही विपुल सख्येने हजर असतात दरमहा काही ना काही धार्मिक विधी होतात व दत्तजयतीस मोठी यात्रा भरते त्या रात्री १० ते १२ भव्य प्रमाणावर उत्सव होतो.

बिदर येथील गुरू नानक झिरा हे शिखाचे फार मोठे केंद्र आहे ते केवळ धार्मिक नाही तिथे हॉस्पिटलही आहे, निवासी गाळेही आहेत गुरुद्वाराची मुख्य इमारत भव्य आणि सगमरवरी आहे. या भागात दुष्काळ होता तेव्हा गुरू नानक येथे आले होते असे शीख सांगतात तेव्हा गुरू नानक यानी चमत्कार करून येथे पाण्याचा झरा निर्माण केला व तीव्र अवर्षणात लोकाची पाण्याची सोय केली. आजही येथे पाण्याचा भरपूर पुरवठा आहे हे केंद्र एकंदरीत खूपच समृद्ध दिसले हा परिसर निवात आहे, स्वच्छ आहे आणि झाडे व पाणी यानी भरलेला आहे. गुरुद्वारामध्ये रोज शिखाची धर्मकृत्ये व धर्मग्रथाचे वाचन चाललेले असते या ठिकाणाहून जवळच पापनाशक महादेव हे हिंदूचे पवित्र क्षेत्र आहे. नदीच्या काठी महादेवाचे

लहानसेच पण सुदर मदिर आहे जवळ घाट आहे हाही परिसर शात व प्रसन्न आहे

बिदरचा राजकीय इतिहास असा की, बहामनी राज्याची राजधानी गुलबर्गा येथे होती तेव्हा अतर्गत वादंगाला ऊत आला होता त्याच वेळी विजयनगरच्या हिंदू साम्राज्याचे हल्लेही वाढत होते

या द ' कारणामुळे शहाबुद्दिन अहमद (पहिला) याने १४२४ साली राजधानी गुलबर्ग्याहून बिदर येथे हलविली बिदर उचावर होते, तिथे पाणी भरपूर होते आणि विजयनगरच्या सीमेपासून ते लांब असल्याने अधिक सुरक्षित होते बिदरवर इराणी व मध्य आशियाई सस्कृतीचा अधिक प्रभाव दिसतो अहमदने पर्शियाहून अनेक पडित बिदरला आणले अहमद हा ज्ञानी लोकाचा आश्रयदाता होता त्यामुळे त्याच्या काळात साहित्य व सस्कृती याचा विकास झाला. इ स १४३६ साली अहमदनतर अल्लाउद्दीन बिदरच्या गादीवर आला. त्याला अनेक आक्रमणाना तोंड द्यावे लागले. विजयनगर, खानदेशचे मुस्लिम सत्ताधारी आणि गुजरात व माळवा यानी बहामनी राज्याचे लचके तोडून घेण्याचे निकराचे प्रयत्न केले त्याच्यानतर १४५८ पासून तीन वर्षे अल्लाउद्दीन हुमायून हा बहामनी राज्यावर होता त्याने ख्वाजा महमद गावन या कर्तबगार नेत्याची प्रमुख प्रशासक म्हणून नेमणूक केली त्याने राज्यात अनेक सुधारणा करून विविध आक्रमकाना तोंड दिले १४६२ साली माळव्याच्या सुलतानाने केलेल्या आक्रमणात बिदरच्या अनेक इमारती उद्ध्वस्त झाल्या पण त्याला परतवण्यात बहामनींना यश आले हळूहळू महमद गावन हाच खरा सत्ताधारी झाला शमसुद्दिन महमद (तिसरा) हा १४६३ ते १४८८ पर्यंत गादीवर होता, पण तो नामधारीच राजा होता

ख्वाजा महमद गावन याने बिदरमध्ये अनेक भव्य इमारती उभारल्या गावनचा मदरसा ही त्यांपैकीच एक आहे त्याने बिदरच्या हिंदू प्रजेचीही सहानुभूती मिळविली पण १४८१ साली त्याच्याविरुद्ध बंड झाले आणि बडखोरानी गावनचा शिरच्छेद केला त्यानंतर बहामनी राज्याचा ऱ्हास व विभाजन सुरू झाले युसुफ आदिल आणि निझामुल मुल्क यानी विजापूर व अहमदनगरची स्वतत्र्य राज्ये स्थापन केली. कासिम बारिद हा बलिष्ठ झाला आणि तो बिदरचा प्रमुख प्रशासकही झाला १५१८ पासून १५३८ पर्यंत

बिदरचे चार सुलतान झाले, पण ते कळसूत्री सुलतान होते विजापूर, गोवळकोंडा आणि अहमदनगरच्या स्वतंत्र राज्यापुढे व विजयनगरच्या विस्तारापुढे ते दुर्बल ठरले कासिम अली हा अखेरचा बहामनी सुलतान त्याच्या निधनानंतर बहामनी राज्य संपुष्टात आले दिवाण बारिदच्या मुलाने राज्यकारभार स्वत:च्या हाती घेतला व सुल्तानाची वस्त्रे त्याने आपल्या अंगावर चढवली १५८० पर्यंत त्याने बिदरवर राज्य केले. १६१९ साली इब्राहिम आदिलशहा याने बिदरचा पाडाव करून बिदरला विजापूर राज्यात समाविष्ट केले

आजही बिदरमधून फेरफटका मारताना मोगल राजवटीचे अवशेष जागोजागी दिसतात गावाभोवती पूर्वी तटबंदी होती तिच्या खुणा अद्यापही नजरेत भरतात अर्थातच आताचे बिदर ही तटबंदी ओलांडून बरेच पसरले आहे जागोजाग कबरी व स्मारके दिसतात किल्ला हे गावातील प्रमुख प्रेक्षणीय स्थळ आहे बिदर हे उंचवट्याचे शहर आहे त्याची उंची वाढता वाढता शंभर मीटरपर्यंत जाते किल्ल्याचा परिसर एवढा मोठा आहे की, हा किल्ला आणि बिदर गाव याचे क्षेत्रफळ जवळजवळ सारखेच आहे किल्ल्याभोवती खंदक आहे आणि किल्ल्याची तटबंदी एकेकाळी बळकट असली तरी १४६८ च्या आक्रमणात बरीचशी ढासळली आहे बंदुकीच्या दारूचा शोध लागल्यानंतर किल्ल्याची त्यादृष्टीने शमसुद्दिन महमद (तिसरा) याने पुनर्बांधणी केली त्याने तोफांच्यासाठी भव्य बुरूज बांधले आणि तटबंदीतून गोळीबार करता येईल अशी व्यवस्था केली बंदुकीच्या दारूचा शोध लागण्यापूर्वीचे व नंतरचे किल्ले हे वेगळे आहेत पूर्वीचे किल्ले हे तलवारी व बाण यांच्यापासून संरक्षण करण्यासाठी बांधले जात होते; पण आता लांब पल्ल्याच्या तोफांपासून व बंदुकीपासून बचाव करण्याच्या दृष्टीने किल्ले नव्याने बांधले जाऊ लागले बिदरच्या किल्ल्यात अनेक जुन्या इमारती आहेत काही अर्धवट पडक्या, काही बऱ्याच पडक्या तर काही बव्हंशी शाबूत त्यापैकी सोळा खांबा मशीद ही सर्वात उत्तम अवस्थेतील व सर्वात जुनी आहे

सोळा खांबा मशीद ही बहामनी राज्याची राजधानी गुलबर्ग्याहून बिदरला हलविण्यापूर्वीपासूनची आहे या मशिदीला सोळा खांब आहेत म्हणून हे नाव पडले आहे त्यातील अनेक भाग उत्तम तऱ्हेने राखून ठेवले आहेत

उदाहरणार्थ, तख्त महाल हा पहिल्या सुलतानाचा राजवाडा, दिवाण-ई-आम, तरकश महाल व रंगीन महाल आजही चांगल्या अवस्थेत आहेत. या सर्व वास्तू बहामनी काळातल्या असून बारिदी सुलतानांनी त्याच्यात सुधारणा केलेल्या आहेत किल्ल्यात दुसरे गावच वसले आहे व पूर्वीही होते पण त्याची रचना योजनाबद्ध नसून अव्यवस्थितपणे पसरलेली घरे, बुरुज, मशिदी, कबरी, यामुळे किल्ल्याच्या आतील गावाला एक प्रकारचे मौला रूप आले आहे चौबारा रस्त्यावर मध्येच एक उंच बुरूज आहे. तो बहामनी काळातील टेहळणी बुरूज असावा या सर्व अस्ताव्यस्त ढिगाऱ्यात आपले लक्ष वेधून घेते ती सोळा खंबा मशीद ही नीटनेटकी वास्तू, ही १३२७ साली बांधली गेली जवळच लाल बाग नावाचे उद्यान आहे. महमद तुघलकच्या काळातील ही मशीद म्हणजे दक्षिणेतील एक जुन्यातली जुनी मशीद आहे या मशिदीसमोर आता एक पुराणवस्तुसंग्रहालय आहे ते लहानसेच आहे व त्यात जुन्या दगडी व ब्राँझच्या मूर्ती नुसत्या ठेवल्या आहेत

तख्त महाल हा आता चार पचमाश पडलेलाच आहे काही अर्धवट भिंती, काही कमानी दिवस मोजत उभ्या आहेत. शहाबुद्दिन अहमद (पहिला) याचा हा वाडा मुळात वैभवशाली व खूपच विशाल असावा असे त्याच्या उरलेल्या अवशेषावरून वाटते. काही कमानींवरील सिरॅमिकचे नक्षीकाम अजूनही तग धरून आहे, त्यात वाघ आणि सूर्य याची प्रतीके प्रेक्षणीय आहेत दिवाण-ई-आम ही प्रशस्त वास्तू आता ढासळली असून तिच्या काही भिंती, तुरळक कमानी व खुडासारखे पुरुषभर उंचीची दगडी भाग शिल्लक आहेत तरीही काही पर्शियन फरशा अजून आपले लक्ष वेधून घेतात मात्र रंगीन महालाची इमारत बरीचशी शाबूत आहे कारण ती अली बारीदने डागडुजी करून ठाकठीक केली होती त्यातील लाकडी कमानी व दरवाजे याचे कोरीव काम पाहण्यासारखे आहे हिंदू व मुस्लिम अशा दोन्ही पद्धतींची कोरीव कामे त्यात दिसतात

ख्वाजा अहमद गावन याचा मदरसा ही बिदरच्या किल्ल्यातील एक महत्त्वाची वास्तू आहे या इमारतीची शैली मध्य आशियातील खुरासानची आहे हा मदरसा १४८२ साली बांधून पूर्ण झाला बहामनी कारकीर्दीतील पर्शियन वास्तुशिल्पकाराची ही कलाकृती आहे त्या काळी दक्षिणेत शिया पंथाची चलती होती त्याचे हे निदर्शक आहे मध्यवर्ती चौकाभोवती चार भव्य

दरवाजे अशी याची रचना आहे हे दरवाजे तीन मजली होते या मदरसाच्या तीन बाजू बऱ्याच प्रमाणात अजून शाबूत असून एक बाजू सपूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे शिक्षण व ग्रथालय यासाठी ही इमारत त्या काळी वापरली जात असे दोन उच मनोऱ्यापैकी एक अजून आहे दुसरा वीज पडल्यामुळे उद्ध्वस्त झाला या मनोऱ्यावरचे रगीत सिरॅमिकचे कामही काही अशी टिकून आहे तख्त की किरमानी ही भव्य कमान अजून जवळजवळ मूळ स्वरुपात उभी आहे ही १४३० सालची वास्तू आहे वाड्याचे हे मुख्य प्रवेशद्वार होते तिथून जामी मशिदीस जाता येते ही मशीद बहामनी राज्याच्या उत्तर काळातील म्हणजे सोळाव्या शतकातील आहे बिदरपासून जवळच असलेल्या अष्टूर येथेही अनेक ऐतिहासिक इमारती आहेत त्यात शियाउद्दिन अहमदाची कबर महत्त्वाची आहे

बिदरजवळ हलकेरी येथे असलेले नरसिंह मदिर हे अतिशय वेगळे व वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे ते एका गुहेत असून तीथपर्यंत जायचे तर कबरभर पाण्यातून जावे लागते हे अतर सुमारे शभर मीटर्स आहे या गुहेबाहेरही एक कुड आहे भक्ताना स्नान करण्यासाठी आसमत फरशानी बाधून काढलेला आहे या मदिराच्या आसमतात वड आणि चिंचाची विपुल झाडे आहेत पूर्वी गुहेतून मूर्तीकडे जाताना काही अपघात झाले, म्हणून आता रेती टाकून जमिनीची उची वाढवलेली आहे तसेच गुहेत विजेच्या दिव्याचीही सोय करण्यात आली आहे ही गुहा नागमोडी वळणाची आहे प्लॅस्टिकचे पाईप लावून आत हवा खेळती ठेवण्यात आली आहे गुहेच्या टोकाशी चार पायऱ्या चढून वर येताच एक दगडी कोठी लागते समोरच्या गाभाऱ्यात स्वयभू नरसिंह मूर्ती आहे मूर्तीचा दर्शनी भाग सपाट आहे व त्याला खास असा आकार नाही झारासुराला मारून नरसिंह या गुहेत गेला व न वळताच स्थिर झाला म्हणून त्याचे मुख दिसत नाही त्याने झारासुराला मारले म्हणून हा झरणी नरसिंह या नावाने प्रसिद्ध आहे गुहेतील पाणी गधकमिश्रित आहे या मुख्य मदिराच्या आसपास गणेश मदिर, नवग्रह मदिर, माणिक प्रभूची गादी, धर्मशाळा, दीपस्तभ वगैरे आहेत बिदर येथील शुल्क यजुर्वेदी पाठक याच्या घराण्याकडे देवाच्या पूजा अर्चेचे काम आहे

❑

# ८. हंपी : पूर्वेकडील बॅबिलॉन

कर्नाटकातील प्रेक्षणीय स्थळात हपी हे अत्यंत महत्त्वाचे गाव आहे गाव तसे लहानच वस्ती दीड हजाराच्या आसपास पण गावाचा इतिहास उज्ज्वल, पराक्रमी आणि गौरवशाली विजयनगर साम्राज्याची ही राजधानी आणि विजयनगर हे हिंदूचे सर्वात मोठे साम्राज्य विजयनगरचे साम्राज्य म्हणजे हिंदु संघटनेचा परमोच्च काळ ते तीनशे वर्षे टिकले सगम, साळुवा, हिळुवा आणि अटविहू या चार वंशांतील राजानी या साम्राज्यावर आधिपत्य गाजवले त्यानी मुसलमानाचे आक्रमण तीन शतके यशस्वीपणे थोपवले नसते आणि हिदू साम्राज्य वाढवले नसते तर भारताचा संपूर्ण इतिहास बदलून गेला असता महाराष्ट्रात शिवाजी महाराजानी जे धर्मरक्षणाचे व सस्कृतिरक्षणाचे थोर कार्य केले, तेच विजयनगर साम्राज्याने कर्नाटकात केले हरिहर या राजाने तर उत्तरेत मथुरेच्या राजाचा पराभव केला होता आणि ब्रह्मदेश ते लकेपर्यंत आपले वैभवशाली साम्राज्य पसरवले होते राक्षसतागडीच्या लढाईत विजयनगरचा राजा रामराव याचा मुसलमानानी १५६५ साली पराभव केला त्या वेळी तीन शतकांचा सूड मुसलमानांनी क्रूरपणे उगवला केवळ माणसांनाच नव्हे तर दगडी पुतळे व इमारतींनाही त्यानी कडक शासन केले हपीचा विध्वंस त्यानी सतत सहा महिने चालविला होता त्यात राजवाडे, महाल, मदिरे, मूर्ती, कलात्मक पुतळे यांचा एवढा विराट सहार करण्यात आला की, हंपी ही 'पूर्वेकडील बॅबिलॉन' म्हणून ओळखले जाऊ लागले आजही सव्वीस चौरस किलो मीटर्सच्या विशाल क्षेत्रात या भग्नावस्थेतील राजधानीचे अवशेष पाहायला सापडतात प्रभावी तुगभद्रेच्या काठच्या या एकेकाळच्या महापराक्रमी नगरीचे उद्ध्वस्त रूप काळजाला घरे पाडून जाते

हपीचा इतिहास प्राचीन आहे हपीचा रामायणातही उल्लेख झालेला आहे वाली व सुग्रीव यांचे राज्य या ठिकाणी होते त्यावेळी हे शहर किष्किंधा या नावाने ओळखले जात होते आजही हपी येथे विपुल प्रमाणावर वानर दिसतात आजची तुगभद्रा नदी त्याकाळी पपा या नावाने

ओळखली जात होती त्यावरून या भागास पपा क्षेत्र असेही नाव पडले होते या ठिकाणी रामाने वालीला मारून सुग्रीवाला किष्किंधाचे राज्य दिले होते त्यावेळी राम व लक्ष्मण सीतेचा शोध घेत दक्षिणेस आले होते हपीजवळच्या निंबपुरम गावी वालीचे दहन झाले पुराणकाळाकडून इतिहासकाळाकडे आपण आलो तर सम्राट अशोकाच्या काळापासून हपीचा इतिहास सिद्ध होतो सध्याच्या विठ्ठल मदिराजवळ केलेल्या उत्खननात अशोककालीन भाडी व शस्त्रे सापडली आहेत त्यानतर कदब, चालुक्य, बदामी आणि राष्ट्रकूट या वशातील राजांनी या भागावर राज्य केले

विरूपाक्ष मदिर हे हपीचे एक महत्त्वाचे आकर्षण आहे मदुराईतील सुप्रसिद्ध मीनाक्षी मदिरासारखे या मंदिराचे भव्य गोपुर लाबूनच दिसले ते पिवळसर रगाचे आहे व त्यावर अनेक मूर्ती कोरल्या आहेत विरूपाक्ष मदिर हे या भागातील सर्वांत श्रेष्ठ असे मदिर असून पपापती मदिर या नावानेही ते ओळखले जाते पपा ही ब्रह्मदेवाची मुलगी हिच्या नावावरून येथे तुगभद्रा नदीही पपा नदी या नावाने ओळखली जाते विरूपाक्ष मदिराचा आसमत मनोहर आहे तुगभद्रेच्या दक्षिण किनाऱ्यावरील हे मदिर प्रथमदर्शनीच आपल्यावर त्याच्या भव्यतेने छाप टाकते गोपुर ओलाडून आत गेल्यावर विस्तीर्ण व स्वच्छ असे पटागण लागते त्यानतर नक्षीदार शिखराचे मुख्य मदिर लागते पटागणात शिरल्यावर डावीकडे एक हत्ती बाधलेला दिसतो जवळच मदिराची कचेरी आहे पटागण ओलाडल्यावर लहान गोपुर लागते त्यानतर मदिराचे 'विमान' लागते त्यावर अनेक लहान लहान शिखरे आहेत हे मदिर पूर्वाभिमुख आहे मदिराचे पहिले गोपुर ५२ मीटर्स उचीचे आणि अकरा मजल्यांचे आहे त्याचे पहिले दोन मजले दगडाचे व पुढील विटाचे आहेत प्रत्येक मजल्यावरची खिडकी एकाखाली एक अशी येते व शिखराकडे लहान लहान होत जाते हे गोपुर देवरायचा अधिकारी प्रोलुगटी हिप्पा याने १४२२ साली बाधण्यास सुरुवात करून १४४६ साली पूर्ण केले. कृष्णदेव याने १५१० साली नतर त्याच्यात सुधारणा केली त्यामुळे त्याला कृष्णदेवराय गोपुर असे नाव पडले आहे

गोपुर ते मुख्य मदिर हे पटागण ७८ मीटर्स लाब आणि ५१ मीटर्स रुद आहे बाजूला लग्न मडप नावाची इमारत आहे तिथे अद्यापही लग्नसमारभ होतात आतील गोपुर तीन मजली आहे विरूपाक्ष मदिरात


अतराळ, अर्धमडप, महामडप किंवा रगमडप आणि गर्भगृह असे मुख्य भाग आहेत हा महामडप उत्कृष्ट मूर्तिकलेने समृद्ध आहे त्याला सोळा नक्षीदार स्तभ असून देवदेवताच्या व यक्षकिन्नराच्या मूर्ती आहेत छतावर विजयनगर शैलीतील चित्रे आहेत त्यात माशाच्या डोळ्याचा वेध घेणारा अर्जुन, विद्यारण्याची मिरवणूक, दशावतार इत्यादी उत्तम चित्रे आहेत विजयनगर कलेचे मूळ नमुने म्हणून ही चित्रे विशेष महत्त्वाची आहेत

महामडपाच्या पश्चिमेस अर्धमंडप आहे त्याच्या प्रवेशद्वाराला पावणेतीन फूट उचीचे दोन द्वारपाल आहेत छतावर कमळाची फुले आहेत हा मडपही विजयनगर शैलीचा उत्तम नमुना आहे. मुक्तिनरसिह, पात्राचेश्वर, नवदुर्गा इत्यादी देवताही या मडपात आहेत पश्चिमेला एका कॉरिडॉरमध्ये महिषासुरमर्दिनीची अष्टभुजामूर्ती आहे पण ती बरीचशी झिजलेली आहे उत्तरेकडील बाजूला पार्वती व भुवनेश्वर याच्या मूर्ती आहेत मदिराच्या गर्भगृहाला प्रदक्षिणेचा मार्ग आहे मध्यभागी विरूपाक्ष ऊर्फ महादेवाचे लिग आहे त्यावर विरूपाक्षाचा मुखवटा आहे गर्भगृहाच्या उत्तरेला बाहेर पाच मजली गोपुर आहे विरूपाक्ष मदिराच्या मुख्य गोपुराच्या बाहेर पूर्वेस हपीच्यामागे बाजार आहे तो ३५ फूट रुद आणि २००० फूट लाब असल्याने त्याची आपल्या मनावर सहजच छाप पडते विजयनगरच्या प्राचीन साम्राज्याच्या वेळीही राजधानीत हाच मुख्य रस्ता व बाजार होता आज या रस्त्याच्या दोन्ही बाजूला उपाहारगृहे, विविध वस्तूंची दुकाने, हपीशी निगडित अशा इमारती व अवशेष याच्या प्रतिकृती, हपीविषयीची पुस्तकाची दुकाने वगैरे या बाजारात विपुल सख्येने आहेत विरूपाक्ष मदिराच्या डाव्या बाजूला टेकडीवर काही जैन मदिरेही आहेत या टेकडीला हेमकुटम असे नाव आहे

विरूपाक्ष मदिराकडून डावीकडे तुगभद्रा नदी, उजवीकडे उचच उच पहाड आणि पायदळी निबर कातळ असा हा मार्ग आहे नदीत एक प्रचड भोवरा आहे त्याला चक्रतीर्थ म्हणतात त्या चक्रतीर्थासमोरच कोदड राम मदिर आहे मदिरात शिरण्यापूर्वी प्रचंड कातळावरची एक पाढरी रेघ आहे राम, सीता आणि लक्ष्मण येथे राहत होते तेव्हा सीतेच्या साडीचा पदर या खडकावरून गेला त्याची ही रेषा अजून पडली आहे असे सागण्यात येते हे मदिर उत्तराभिमुख आहे मदिराचे गर्भगृह चौकोनी आहे गर्भगृहात

राम, सीता आणि लक्ष्मण याच्या साडेतेरा फूट उचीच्या काळ्या पाषाणाच्या मूर्ती आहेत. मंदिर अगदी साधेच आहे पण पुढे झाड आहे, उत्तम चबुतरा बाहेर बसायला आहे, डावीकडे तुगभद्रा वाहते आहे आणि वर मोकळे आकाश आहे त्यामुळे इथे विश्राती घ्यायला बरे वाटते. जवळच एक गावठी उपाहारगृह आहे कोदडरामाच्या मदिराजवळच सूर्यनारायणाचे मंदिर आहे त्यातील मूर्ती मानवी देहाची व सोळा हाताची आहे त्याच्या बाजूला हनुमान मदिर आहे त्याला यत्रोद्धारक अजनेय असे नाव आहे कारण तिथे अवजड गोल यत्र उचलणाऱ्या हनुमानाची मूर्ती आहे जवळच्या खडकावर अनतशयनाची मूर्ती कोरलेली आहे. तिथून थोड्याच अंतरावर एका रस्त्याचे उद्‌ध्वस्त रूप दिसते हे अवशेष अच्युतपेठ नावाच्या रस्त्याचे आहेत याच रस्त्यावर अच्युतराय मदिर होते अच्युतरायाच्या (१५३० ते १५४२) कारकीर्दीत हे मदिर बाधले गेले होते गोपुर, कल्याण मडप व गर्भगृह अशी या मदिराची रचना होती या मदिराच्या दक्षिणेस वीरभद्राचे मंदिर व काही लहान मदिरे आहेत याच मार्गावर आता पडीक अवस्थेत असलेले वराह पेरूमल मदिर आहे

याच भागात पूर्वाभिमुख असलेले कदब शैलीतील राम मंदिर आहे त्याची रचना पिरॅमिडच्या आकाराची आहे हे जैन मदिर आहे असे पूर्वी काही जणानी मत व्यक्त केले होते पण गरूड, गडालक्ष्मी आणि हनुमान याच्या या मदिरातील मूर्तीवरून हे निश्चितच हिंदू मदिर आहे, असे आता मान्य झाले आहे त्या मदिराच्या समोरच एक गुहा असून ती सुग्रीवाची गुहा रावणाने जेव्हा सीतेला उचलून पळवून नेले तेव्हा सीतेने अगावरील दागिने खुणेसाठी म्हणून खाली टाकले याच गुहेत सुग्रीवाने ते दागिने ठेवले होते या गुहेसमोर एक लहानसे तळे आहे त्याला सीता सरोवर असे नाव आहे जवळच तुगभद्रेवर एक पडका पूल आहे तो इ. स १३८३ साली हरिहरचा पुत्र कपकूप याने बाधला होता. या भागातून आपण पूर्वेकडे निघालो की 'राजाचा तराजू' या वैशिष्ट्यपूर्ण कमानीकडे येतो पूर्वी दानासाठी येथे प्रचड तराजू होता आता नुसतीच कमान आहे एका पारड्यात राजाला बसवून त्याच्या वजनाच्या मोहरा तोलून त्या गोरगरिबाना दान करण्याची पूर्वी पद्धत होती



हंपीचे विठ्ठल मंदिर

नतर पुढे हपीतील सर्वात भव्य आणि सर्वात कलात्मक असे विठ्ठल मदिर लागते सुदैवाने विठ्ठल मदिर बरेचसे शाबूत आहे तुगभद्रेच्या दक्षिण किनाऱ्यावरील हे मदिर म्हणजे भारतीय शिल्पकलेचा अमोल ठेवा आहे हे मदिर सुमारे साडेपाचशे वर्षांचे जुने आहे देवरायच्या (इ स १४२२ ते १४४६) कारकीर्दीपूर्वीचे हे मदिर आहे राक्षसतागडीच्या लढाईपूर्वीपर्यंत या मदिरात पूजाअर्चा होत असे विजयनगर मदिर शैलीचा हा सर्वोकृष्ट नमुना आहे शिल्पकलेच्या वैभवात असे समृद्ध असलेले दुसरे वास्तुशिल्प नाही, असे अनेक तज्ज्ञाचे मत आहे १६४ x ९५ मीटर्सच्या लाबचौकोनावर हे मदिर उभारलेले आहे. या मंदिरास पूर्व, उत्तर आणि दक्षिण या दिशाना तीन भव्य द्वारे आहेत त्यावर अनेक उत्तम मूर्ती कोरलेल्या आहेत या मदिराच्या आवारात अनेक शिलालेख आहेत. त्यापैकी बरेच भग्नावस्थेत असले तरी शाबूत असलेल्या शिलालेखावरून असे दिसते की, कृष्णदेवराय याने हे मदिर बाधले विठ्ठल हा या भागातला देव नव्हता, पण विष्णूचे विठ्ठलाच्या रूपातील मदिर म्हणून हे मदिर विठ्ठलासाठी बाधण्यात आले होते या मदिराचे बाधकाम अनेक वर्षे चालले होते ते पूर्ण होण्यापूर्वीच मोगलाचा हल्ला झाला तरी पण त्या वेळी ते बऱ्याच अशी बाधले गेले होते या दीर्घ काळचे कारण असे की मदिरातील स्तभ व छत याची नक्षी ती अतिशय कलात्मक असून तशी नक्षी दगडावर

कोरण्यास वर्षानुवर्षे लागतात अशी एक आख्यायिका आहे की, हे मदिर जवळजवळ पूर्ण झाल्यावर येथील पुजारी पढरपूरला तेथील विठ्ठलमूर्ती आणण्यासाठी गेले पण विठ्ठलाने सागितले की, मला ऐश्वर्यवान व नक्षीदार भव्य मदिर नको मला पढरपूरचे साधेसुधे मदिरच अधिक आवडते

विठ्ठलमदिराभोवती तटबदी आहे. दक्षिणेकडील बहुतेक मंदिरांना ही सरक्षक भिंत असते. कन्याकुमारीपर्यंत ही पद्धत दिसते या मदिराचा कल्याण मडप अत्यत शोभिवत आहे. येथील कलाकुसरीच्या स्तंभाना लहानसे प्रत्येकी सोळा स्तभ आहेत, ते पोकळ आहेत त्या लहान स्तभावर हलक्या हाताने प्रहार केला असता 'सा रे ग म' इत्यादी सप्तसूर ऐकू येतात या मडपाबाहेर व्हाराडा आहे मडपाच्या पायऱ्याजवळ दगडी हत्तींच्या सुबक मूर्ती आहेत पायऱ्याच्या पट्ट्यावरही उत्कृष्ट कोरीव काम केलेले आहे त्यात हत्ती व योद्धे आहेत वरच्या पट्ट्यावर चेतोहर नक्षी आहे या मदिराविषयी सुप्रसिद्ध कलासमीक्षक फर्ग्युसन याने म्हटले आहे की, भारतीय मूर्तीकला व कोरीव काम यांची ही अत्युच्च परिसीमा आहे मुख्य मडपाच्या नक्षीदार स्तभाचे ब्रॅकेट्सही नक्षीचे आहेत स्तभावरही योद्धे, यक्षकिन्नर व अप्सरा याच्या मूर्ती कोरल्या आहेत काही स्तभावर रामायणातील दृश्ये कोरलेली आहेत हजार राम मदिर व विठ्ठल मदिर याच्या नक्षी कामात इतके साम्य आहे की दोन्ही मदिरे एकाच कलाकाराच्या कलाकृती असाव्यात, निदान एका कलाकाराने दुसऱ्या कलाकाराची हुबेहूब नक्कल केली असावी असे अनुमान काढता येते विठ्ठल मदिराचे छतही उत्कृष्ट कोरीव कामाने सपन्न झालेले आहे स्तभावरचा प्रचड आकाराचा घोडा व त्यामानाने लहान असलेला घोडेस्वार कुतूहलजनक आहेत लढाईत स्वारापेक्षा घोड्याला अधिक महत्त्वच आहे हे दाखविण्याचा कलाकाराचा उद्देश असावा घोड्याच्या पायाशी वराह आहे स्तभावर लक्ष्मी, गणपती, शिव, पार्वती इत्यादींच्या मूर्तीही आहेत या भव्य मडपात शभर नक्षीदार खाब आहेत मदिरावर शिखर नसून सपाट गच्ची व काही मनोरे आहेत

या मडपानतर महामडप, अर्धमडप व गर्भगृह लागते महामडपात ५६ स्तभ असून त्याची उची साडेतीन मीटर्स आहे छतावर कमळाच्या फुलाचे कोरीव काम केलेले आहे अर्धमंडपाचा बराच भाग पडलेला आहे, त्यामुळे

त्यातून आकाश दिसते. या अर्धमडपाच्या एका कोपऱ्यात पावणेतीन मीटर्स उचीचा भव्य द्वारपाल आहे उत्तरेला उत्सव-मडप आहे, तो कल्याण मडपाच्याच धर्तीचा आहे विठ्ठल मदिराच्या बाहेर दगडी रथ आहे, तो शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणून प्रसिद्ध आहे या रथात गरुडाची मूर्ती आहे हा रथ म्हणजे त्या काळच्या लाकडी रथाची दगडातील प्रतिकृती आहे त्याचा विशेष म्हणजे ही चाके दगडाची असूनही आसाभोवती फिरतात या रथावर एक विटाचे विमान (शिखर) होते- पण ते काळाच्या ओघात नष्ट झाले आहे


राणीचे स्नानगृह ही एक तत्कालीन वैशिष्ट्याची इमारत आहे अजून ती चागल्या स्थितीत आहे बाहेरून ही इमारत साधी दिसते हिच्याभोवती लहानसा चर आहे पण आतून मात्र ही इमारत मनावर छाप पाडणारी आहे हिच्या मध्यभागी एक दगडी मोठे कुड आहे ते लाबट असून त्याची लाबी पधरा मीटर्स व रुदी दोन मीटर्स आहे या कुडात पाणी असे व राणी आणि तिच्या मैत्रिणी त्यात स्नान करीत असत या इमारतीची बाधणी इडो-सिरॅकन शैलीची आहे या कुडाभोवती कॉरिडर्स व कमानी आहेत स्नानानतर कपडे बदलण्यासाठी हा आडोसा असावा भितीवर हत्ती व कमळे याचे उत्कृष्ट नक्षीकाम आहे हे राणीचे स्नानगृह असले तरी अनेकदा राजा आपल्या जनान्याबरोबर जलविहार करण्यासाठी त्याचा उपयोग करीत असे जवळचा कमल महाल आणि स्नानगृह ही एकाच काळात बांधली गेली आहेत. स्नानगृहाला नक्षीदार गवाक्षे आणि सर्वात वरती नक्षीदार कमानीही आहेत मी हे ठिकाण पाहायला गेलो तेव्हा सध्याकाळ होत आली होती आणि या एके काळच्या वैभवाच्या इमारतीवर विषण्णतेची छाया पडली होती मदनिकानी एके काळी गजबजलेले हे विशाल स्नानगृह आता उदास व भकास दिसत होते

या सर्व आसमताला जनाना विभाग म्हणत असत त्यातील सर्वात सुदर इमारत म्हणजे कमल महाल इडो-सिरॅकन शैलीचे हे सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे या महालाचा चबुतरा उच व नक्षीचा आहे वरच्या कमानीत अनेक पदर असल्याने कमळाच्या पाकळ्या उमलत आहेत, असा भास त्या निर्माण करतात दुसऱ्या मजल्यावरही तशाच पाकळ्यासारख्या लहान कमानी असून वर मदिरासारखी शिखरे आहेत या इमारतीचे

चोवीस स्तभ व कमानी मुस्लिम शैलीच्या आहेत तर चबुतरा व शिखर हिंदू स्थापत्य शैलीची आहेत. मात्र आज वरच्या मजल्यावर जाण्यासाठी जो जीना आहे, तो विजोड वाटतो तो नतरच्या काळात जोडला असावा जवळच सरक्षक शिपायासाठी एक लहानशी इमारत आहे कमल महालावरच्या शिखरावर सिंहमुख नरसिंहाच्या मूर्ती आहेत राणी व तिच्या सख्या याच्यासाठी हा महाल बाधला गेला असावा इथून राणीचे स्नानगृह जवळच असल्याने या कयासाला दुजोरा मिळतो जनाना परिसरात दोन टेहाळणी मनोरे आहेत त्या उंच मनोऱ्यावरील गवाक्षे नक्षीदार आहेत जवळच हत्ती बाधण्याचे तबेले आहेत बारा कमानी व आत हत्ती बाधण्याची जागा असे हे तबेले बसकट व लाब एक मजली इमारतीचे आहेत

जनाना परिसराकडून हजार राम मदिराकडे जाताना वाटेवरच पट्टनाद यल्लमा मंदिर लागते ही शहर-देवता आहे कुलबा नावाची जमात अजूनही या देवीची पूजा-अर्चा करते विजयनगरचे राजे मूळ कुलबा जमातीचे होते, त्यामुळे या देवीला त्या काळी अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले होते. हे मदिर दक्षिणाभिमुख असून त्याला विजयनगर शैलीचे क्यूबच्या आकाराचे स्तभ आहेत यल्लमा देवीची मूर्ती एक मीटर उचीची व चार हातांची आहे तिच्या एका हातात डमरू, दुसऱ्या हातात खड्ग, तिसऱ्या हातात त्रिशूल व चौथ्या हातात कवटी आहे. तिच्या गळ्यातही कवट्याची माळ आहे तिच्या पायथ्याशी एक सिंह व दोन मुडकी आहेत हे मदिर जमिनीच्या पातळीखाली आहे. कदाचित ते विजयनगर काळच्या पूर्वीचे असेल व नंतर जमिनीची पातळी वाढविण्यात आली असेल असेच एक दक्षिणाभिमुख मदिर म्हणजे रगा मदिर. ते विमान व शिखरयुक्त आहे त्याच्या अर्धमडपात आठ फूट उच हनुमानाची मूर्ती आहे या रगा मदिराजवळच आणखी एका उद्ध्वस्त मदिराचे अवशेष आहेत

कमलपुरमच्या वाटेवर भोजनशाळा नावाची २३ मीटर लाबीची, एक मीटर रुद व अर्धा मीटर खोल अशी लाब पट्टी आहे तीत अन्न ठेवले जाई व लोक त्यातून ते आपल्या थाळीत घेत असत ती ग्रॅनाईटची आहे येथून जवळच शिवमदिर आहे ते पूर्वाभिमुख असून जमिनीच्या पातळीखाली आहे ते बरेचसे उद्ध्वस्त झालेले आहे पूर्वेकडील गोपुरही पडीक आहे



हंपीतील उद्‌ध्वस्त मंदिर

असतील, पराक्रमी वीराचे त्या रजन करीत असतील सम्राट या ठिकाणी अवाढव्य युद्धमोहिमाची खलबते रचीत असतील मोगलाच्या आक्रमणाना नेस्तनाबूत करण्याचे मनसुबे याच ठिकाणी रचले गेले असतील. शेकडो हत्ती, हजारो घोडेस्वार इथून सीमोल्लघन करून विजय खेचून आणणाऱ्या मोहिमावर निघत असतील केवढी ही एके काळची चैतन्यशील राजधानी ! आज नुसती पडक्या मंदिराचा, राजवाड्याचा आणि शिळाखडकाचा उद्‌ध्वस्त ढीग होऊन पडली आहे

श्री वि वा शिरवाडकर या ठिकाणी आले होते त्याचे वर्णन त्यानी असे केले आहे, 'सर्वंकष विध्वसाच्या मिठीत आवळलेला एक मानवी जीवनाचा आणि कर्तृत्वाचा फुलोरा मनाला आणि दृष्टीलाही उसत मिळत नव्हती आश्चर्य वाटण्याची अथवा सौंदर्याचे आकलन करण्याची ताकदही

मनाला राहिली नाही जाणवत होता फक्त एक बोथट सुन्नपणा

काहीच वास्तव नव्हते, काहीच व्यक्त होत नव्हते काळाच्या ओघात वाहत गेलेल्या एका ऐश्वर्यशाली अस्तित्वाची ती फक्त सूचिते आणि प्रतीके होती विषाद, राग, करुणा इत्यादी भावना मागे पडत होत्या आणि विश्वव्यवहाराच्या गाभाऱ्यातील जीवन-मृत्यूच्या सापळ्यासमोर आपण उभे आहोत असे वाटत होते . माणसाचे सर्व व्यवहार निरर्थक करणाऱ्या एका अमानुष शक्तीच्या आद्यतत्त्वाखाली पादाक्रांत केलेल्या प्रदेशात आपण वावरत आहोत असे वाटू लागले होते '

हंपी असा भव्यतेचा साक्षात्कार देते तेवढ्यापुरते आपण आपल्या नेहमीच्या लहान जगातून मुक्त होतो आणि शेकडो वर्षांपूर्वीच्या पराक्रमी, वैभवशाली जगात जातो त्या वैभवाचा आपल्या डोळ्यासमोर विनाश चालल्याचे दृश्य दिसते आणि विश्वाच्या क्षणभंगुरतेपुढे आपण नतमस्तक होतो.

❑

# ९. विजापूरचा जगप्रसिद्ध गोलघुमट

विजापूर हे नाव उच्चारल्याबरोबर प्रथम कशाची आठवण येत असेल तर ती गोलघुमट या जगप्रसिद्ध इमारतीची स्थापत्यशास्त्रातील हा एक अद्‌भुत चमत्कार आहे

गोलघुमट हा विजापूर शहरात कोठूनही दिसतोच, पण त्याचा भव्य चकाकणारा गोल विजापूरपासून सातआठ किलो मीटर्स अंतरावरूनही ठळकपणे नजरेत भरतो जवळ गेल्यावर रिक्षातून उतरून पायी जावे लागले गोलघुमटचा परिसर सुदर हिरवळ आणि उद्यान यांनी सुशोभित व ताजा टवटवीत ठेवण्यात आला आहे त्यामुळे या ऐतिहासिक वास्तूकडे जाताना मन प्रसन्न होते गोलघुमटाला जाण्यापूर्वी आपण म्युझियमला भेट देतो या म्युझियममध्ये या भागाशी निगडित असलेल्या इतिहासाचे स्मरण करून देणारी शिल्पे, भग्न व अखड मूर्ती इत्यादी ठेवण्यात आली आहेत विजापूर हे शहर इ स १०७५ च्या सुमारास वसले आहे त्याचे मूळ नाव बीजनहळ्ळी असे कानडी पद्धतीचे होते त्यावेळी ते राष्ट्रकुटाच्या ताब्यात होते भीमा आणि कृष्णा या नद्याच्या मध्ये जो रूक्ष, वाळवटी व कमी पावसाचा भाग आहे त्यात हे शहर वसले आहे या शहराचे नाव अनेक वेळा राजकर्त्यांच्या सोयीनुसार बदलले गेले आहे. राष्ट्रकुटाचा पराभव करून चालुक्य राजानी हे शहर जिंकले या विजयाचे चिन्ह म्हणून त्याचे नाव विजयपूर असे ठेवण्यात आले हा विजयस्तंभ आजही गोलघुमटाच्या नगारखान्यात आहे पुढे आदिलशहा इब्राहिम दुसरा याने या शहराचे नाव नद्यापूर असे ठेवले महमद अलीच्या सेनापतीने या शहराचे मुहमदपूर असे नामातर केले पण नतर राजा वरीनतार याने पन्हा या शहराचे नाव बदलून ते विजापूर असे ठेवले व तेच आता प्रचलित आहे

ओसाड, दुष्काळी भागातल्या या शहराने अनेक राजवटी पाहिल्या आहेत यादवाच्या काळात हे एक मोक्याचे ठिकाण होते, पण अल्लाउद्दिन खिलजी याने १२९४ साली यादवाचा पराभव करून देवगिरी जिंकून घेतले बहामनी राज्याचे चार तुकडे होऊन नगर, बिदर वेगळे झाले तेव्हा

विजापूरही स्वतत्र झाले सोळाव्या शतकाच्या मध्यास विजापूरच्या सुभेदाराने स्वत ला शहा हे बिरूद लावून घेऊन स्वतत्र राज्य पुकारले आणि येथे आदिलशाही अमल सुरू झाला हे राज्य १९७ वर्षे टिकले त्यावेळी त्याच्या ताब्यात गोवाही होते पोर्तुगीजानी गोव्यावर ताबा मिळवला तेव्हा आदिलशाहीला चागलाच धक्का बसला इब्राहिम (पहिला), अली (पहिला), इब्राहिम (दुसरा) आणि महमद यानी या शहरावर १५३० पासून सतराव्या शतकाच्या मध्यापर्यंत राज्य केले दुसरा इब्राहिम हा अल्पवयीन सुलतान म्हणून गादीवर आला आदिलशाहीचे सुलतान सतत लढायात गुतलेले असत जवळची मुसलमान राज्ये, विजयनगरचे हिंदू साम्राज्य व नतर दिल्लीचे मोगल सम्राट याच्याबरोबर त्याचे कायमचे सघर्ष होते १६५९ साली छ शिवाजी महाराजानी अफझलखानाचा वध करून त्याच्या सैन्याचा विध्वस केल्यामुळे विजापूर अधिकच दुर्बळ झाले नतर १६८६ मध्ये औरगजेबने विजापूर शहर ताब्यात घेऊन आदिलशाहीचा अत केला आणि ते राज्य मोगल साम्राज्यात विलीन करून टाकले तेव्हा शिकदर हा अल्पवयीन सुलतान अधिकारावर होता या अनेक राजवटीचे अवशेष विजापूर व आसमतात सर्वत्र पसरलेले दिसतात

या सर्वात गोलघुमट ही जगप्रसिद्ध आणि पाहणाऱ्याला त्या काळच्या मुस्लिम स्थापत्य शास्त्राच्या अपूर्व कौशल्याची तारीफ करायला लावणारी इमारत आहे या घुमटाच्या प्रवेशद्वारावरील कमानीवर अशा अर्थाचे कोरीव काम आहे की, या ठिकाणी महमद आदिलशहा याच्या अस्थी असून त्याच्या निधनानतर त्याना स्वर्गप्राप्ती झाली आणि आता ते आकाशात तेजस्वी ताऱ्याच्या रूपाने निरतर राहिले आहेत इतक्या प्रचड घुमटाला मध्ये एकाही खाबाचा आधार न देता पेलणारी जगातील ही एकमेव इमारत आहे या घुमटाखालचा हॉल अठरा हजार दोनशे पचवीस चौरस फूट आहे ज्या मुख्य घनाकृती भागावर हा भव्य घुमट आधारलेला आहे, त्याचा तळ १३५ फूट आहे आतील भागाची जमिनीपासून घुमटाच्या मध्यभागाची उची १७८ फूट असून बाहेरून ही उची १९८ फूट आहे लडन येथील सेंट पॉल कॅथेड्रल या चर्चची उची यापेक्षा अधिक असली तरी त्या चर्चला अनेक स्तभाचा आधार दिला आहे मात्र विजापूरच्या गोलघुमटाला एकाही स्तभाचा आधार नाही

हा वास्तुशिल्पकलेचा चमत्कार महंमद आदिलशहा याने इसवी सन १६२७ ते १६५५ या काळात हा गोलघुमट बांधला त्यासाठी त्याने इराणहून तज्ज्ञ इंजिनियर आणला होता गोलघुमटाची इमारत पूर्ण झाल्यावर महमद आदिलशाहाने त्या इराणी इंजिनियरला बोलावून घेतले या अनुपम कलाकृतीबद्दल त्याला काहीतरी बक्षीस जाहीर करण्यात येईल असे सर्वांना वाटले, पण आदिलशहा म्हणाला, 'याचे हातपाय तोडून टाका म्हणजे हा पुन्हा दुसऱ्या कोणासाठी अशी इमारत बांधणार नाही माझी ही इमारत जगात अद्वितीयच राहिली पाहिजे' महमद १६५६ साली निधन पावला त्याचे अवशेष या गोलघुमटाखाली कबर बांधून तीत ठेवण्यात आले आहेत आज गोलघुमटात जी काही थडगी मध्यभागी दिसतात ती मूळची खरी थडगी नसून देखाव्यासाठी बांधण्यात आली आहेत गोलघुमटाच्या अर्ध्याहून अधिक अंतरावर (१२५ फुटावर) चढून जाण्यासाठी पायऱ्या आहेत तिथे एक गोलाकार गॅलरी आहे या गॅलरीतून एकदा टाळी वाजवली तर त्याचा अनेकदा प्रतिध्वनी येतो त्याचे प्रात्यक्षिक म्हणून प्रेक्षक टाळ्या, शिट्ट्या, नाव पुकारणे, हाक मारणे इत्यादी प्रकारांनी आवाज करतात व त्या सर्वांचे प्रतिध्वनी अनेकवार घुमत राहतात तेव्हा मोठी गमत वाटते कधी कधी शाळा-कॉलेजची ट्रीप आली तर दोनदोनशे मुले विविध आवाज काढून कानठळ्या बसवून टाकतात ! गोलघुमटापासून पन्नाससाठ फूट अंतरावरून त्याच्याकडे पाहिल्यावर तो विशेष सुंदर व कलात्मक दिसतो त्याच्या चार बाजूंना चार उंच मनोरे आहेत त्यांना आठ मजले आहेत त्या षट्कोनी मनोऱ्याला नक्षीदार कमानी आहेत गोलघुमटाच्या चारी बाजूंना चार भव्य कमानी व दरवाजे आहेत घुमट व हे दरवाजे यांच्या मधल्या भागावर अतिशय देखणी अशी नक्षी आहे.

विजापूर हे लहान-मोठ्या घुमटांचेच शहर आहे गोलघुमट, जोड घुमट, जुम्मा मशीद व अन्य मशिदी, इब्राहिम रोझा इतर अनेक कबरी यांचे घुमट व मनोरे यांनी हे शहर गजबजून गेले आहे शहरातली मुसलमानी संस्कृतीची ठळक छाप सर्वत्र दिसते जुम्मा किंवा जुमा मशीद ही विजापूरमधील सर्वांत मोठी मशीद पहिला अली आदिलशहा (इ स १५५७ ते १५८०) याने धर्मप्रसारासाठी ही मशीद बांधून घेतली शहराच्या


आग्नेय भागात असलेली ही मशीद आदिलशहाच्या हुकुमावरून मलिक याकूब याने बाधली या मशिदीने १ लक्ष १६ हजार चौरस फूट जागा व्यापली आहे स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीनेही ही मशीद अगदी लक्षणीय आहे अलीच्या निधनामुळे ही मशीद अपूर्णच राहिली जिथे उच मिनार उभे राहणार होते तिथे मुढे स्तभ उठले या भव्य इमारतीसाठी प्रथम नऊ उच कमानी बाधल्या गेल्या मग त्यावर पाच कमानी बाधून त्यावर घुमट रचण्यात आला या मशिदीचे प्रार्थनागृह इतके मोठे आहे की, तिथे हजारो लोक एकाच वेळी प्रार्थना करू शकतात या मशिदीची पूर्व-पश्चिम लांबी ४५० फूट व दक्षिण-उत्तर रुदी २२५ फूट आहे जमीन सगमरवरी दगडाची असून तीवर २,२८० लंब चौकोन आखण्यात आले आहेत त्यावर प्रत्येकी एक इसम नमाज पढू शकतो. प्रार्थनागृहाच्या समोरील भिंतीवर सोनेरी रगात कुराणातील वचने लिहिलेली आहेत या भागास महिरप म्हणतात खास प्रसगी येऊन पेशईमाम कुराण पढतात जामा मशिदीच्या भव्य इमारतीत एकदर ४५ कमानी आहेत औरगजेबाने विजापूर जिंकल्यावर मशिदीची डागडुजी करून प्रार्थना हॉल, कमानी व दगडांनी पक्का करून घेतला

विजापूरमध्ये जी अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत, त्यात मुलुख-मैदान ही अवाढव्य तोफही आहे मक्कागेट आणि शहापूरगेट या दोन दरवाजाच्या मधल्या तटावर ही तोफ ठेवण्यात आली आहे ज्या बुरुजावर ही तोफ ठेवली आहे, त्याचे नाव शेर बुरूज किंवा सिंहाचा बुरूज असे आहे विजापूरमधील ही सर्वात मोठी तोफ ५५ टन वजनाची आहे ती चौदा फूट लाब असून तोंडाकडे हिचा व्यास ४ फूट ११ इच आहे या मुखाजवळ एक अक्राळविक्राळ प्रचड नाग कोरला असून त्याने आपल्या तोंडाने हत्ती पकडल्याचे दाखविले आहे या तोफेवर तीन लेख कोरलेले आहेत त्यावरून ही तोफ महमद बीन रुमी याने बनवली हे स्पष्ट होते अब्दुल गाजी निझामशहा याच्या हुकुमावरून हिजरी १०९७ मध्ये (इ स १६८५-८६) ही तोफ तयार केली गेली मुळात ही तोफ अहमदनगरमध्ये ओतण्यात आली होती आणि पराड्याच्या किल्ल्यावर ठेवण्यात आली होती विजापूरचा सुभेदार मुरारी पडित याने पराडा किल्ला जिंकून घेतला आणि ही मुलुखमैदान तोफ तिथून विजापूरला आणली ताबे, लोखड आणि

जस्त याच्या मिश्रणामुळे तयार झालेल्या धातूत ही तोफ ओतविली गेली आहे १६७५-७६ मध्ये औरंगजेबने विजापूर जिंकून या तोफेचा उपयोग केला होता या तोफेजवळ एक तळघर आहे तोफ उडविणारे तोफेच्या गोळ्याला मशाल पेटवून ती उडविण्याची सिद्धता करीत व ताबडतोब या तळघरात कान झाकून लपून बसत. कारण या तोफेचा आवाज इतका प्रचंड असे की, तो जवळून ऐकला तर कान फाटत असत एकेकाळची ही पराक्रमी मुलुखमैदान तोफ आजच्या जेट युगात प्रवाशाच्या कुतूहलाचे एक ठिकाण झाले आहे

विजापूर शहराच्याभोवती भक्कम तटबंदी होती आता ती अनेक ठिकाणी पडलेली आहे मुळातली तटबंदीही एकसारखी किंवा सुबक नव्हती कारण पहिला अली याने ही तटबंदी बांधण्याचे काम अनेक सरदाराच्यावर सोपवून दिले होते त्या प्रत्येक सरदाराचे बांधकाम-प्रमुख वेगळे होते व सर्वांच्या तटबंदीबद्दलच्या कल्पनाही एकसारख्या नव्हत्या. ही तटबंदी बांधण्यापूर्वी यादव काळातील एक तटबंदी येथे होती, पण ती मातीची होती, काळाच्या ओघात ती पडून व धुऊन गेली सध्याची तटबंदी युसूफने सुरू केली, पण तिचे बांधकाम पहिल्या अलीने पूर्ण केले विजापूरभोवती साडेसहा मैल परिघात ही पक्की तटबंदी असून तीमुळे तेराशे एकर जमीन वेढली गेलेली आहे या तटबंदीवर ९६ बुरूज आहेत त्यापैकी काही आता ढासळले आहेत तटबंदीला पाच मुख्य दरवाजे आहेत ते म्हणजे पूर्वेचे अलिपूर गेट, उत्तरेचे बहामनी गेट, शहापूर गेट, मक्का गेट आणि फत्तेह गेट, शेवटच्या दरवाजाचे नाव औरंगजेबने विजापूर जिंकल्यावर त्या स्मरणासाठी फत्तेह गेट असे ठेवले अनेक ठिकाणी पाण्याचे पक्के हौदही आहेत. ही तटबंदी इ स १५६५ साली पूर्ण करण्यात आली

आदिलशाहीच्या पूर्वीच्या फारच थोड्या इमारती विजापूरमध्ये आहेत मक्का मशिदीच्या आवारात बहामनी काळातील दोन मनोरे आहेत ते विटाचे असून त्यांच्या लाकडी गॅलऱ्या मोडक्या आहेत हिंदू मंदिरांचे स्तंभ घेऊन त्यातून हे मनोरे बांधले गेले आहेत हिंदू मंदिराचा विध्वंस करून त्यातील अवशेषाच्या साहाय्याने बांधल्या गेलेल्या मुस्लिमांच्या इतरही अनेक वास्तू विजापुरात पाहावयास मिळतात शहरातून फेरफटका करू लागलो की, शहराच्या मध्यभागी एक प्रचंड बुरूज दिसतो त्याला बेटोळे



बिजापूरचा गोलघुमट

घालणारा एक जिनाही आहे या बुरुजाचे नाव हैदर बुरूज ८० फूट उचीच्या या महाकाय बुरुजाला ७५ पायऱ्या आहेत पहिल्या अलीने हैदर नावाच्या आपल्या सरदाराच्या स्मरणार्थ हा बुरूज बाधला या बुरुजावर लाब पल्ल्याच्या दोन तोफा ठेवण्यात आल्या आहेत त्यापैकी एक तीस फूट लाब व दुसरी एकोणीस फूट लाब आहे या तोफा नेहमीसारख्या एकच ओतकामाच्या नसून कच्च्या बिडाची चाके एकमेकाना जोडून तयार केलेल्या आहेत हा बुरूज इ स १५८३ साली बाधण्यात आला

गोलघुमट ही विजापूरमधील सर्वात प्रसिद्ध वास्तू असली तरी जोड घुमट नावाच्या दोन इमारतीही त्याच्या ऐतिहासिक महत्त्वामुळे प्रेक्षणीय आहेत हे घुमट म्हणजे खान महमद आणि सत अब्दुल रझाक कादरी याच्या कबरी आहेत या दोन्ही कबरी एकाच आवारात व जवळजवळ असल्याने त्याचे घुमट हे जोड या नावाने ओळखले जातात खान महमद हा आदिलशहाचा सेनापती होता त्याचा मुलगा खवासखान हा बादशहा सिकदर आदिलशहा या शेवटच्या आदिलशहाचा दिवाण होता हे दोघेही औरगजेबाला फितूर झाले आणि त्याच्यामुळे औरगजेबाला विजापूर जिंकता आले मात्र त्याची फितुरी आदिलशहाला समजताच त्याने खान महमद आणि खवासखान याना ठार मारले औरगजेबाने या दोघाची आठवण ठेवून त्याने विजापूरच्या खडणीतील एक वर्षाचा महसूल खर्च करून हे घुमट बाधले येथील कमानीवर असा उल्लेख आहे की, मलिक सदल याने हे बाधकाम केले व त्यासाठी ७० हजार सुवर्णमुद्रा खर्च आला या जोड घुमटाचा परिसर सुदर उद्यान व हिरवळ यानी सुशोभित ठेवला आहे

असर महाल एकेकाळी शाही महाल होता हा महाल महमद शहा याने इ स १६४६ साली आपली न्यायनिवाडा करण्याची कचेरी म्हणून बाधला हा महाल दोन भागात विभागलेला आहे पुढच्या भागात प्रशस्त हॉल असून त्यामागे दोन खोल्या आहेत या खोल्या ८१ फूट लाब व २७ फूट रुद आहेत कलेच्या दृष्टीने हा महाल अत्यत प्रेक्षणीय आहे एकेकाळी त्याच्या दरवाजावर व छतावर सोने आणि हस्तिदत याची अत्यत देखणी नक्षी होती आता छतावर काही हस्तिदती नक्षी तेवढी उरली आहे. सोन्याच्या लालसेने दरवाजे चोरीला गेले औरगजेबाने हा महाल आपले निवासस्थान

म्हणून निवडला होता ही इमारत विजापूरमधील सर्वात पवित्र वास्तू आहे. कारण या इमारतीत एका पेटीत धर्मसंस्थापक महंमद पैगबर याचे केस ठेवण्यात आले आहेत, असे सागण्यात येते. या इमारतीच्या आवारात पाण्याचा हौद व कारजे आहेत पूर्वी या इमारतीभोवती सरक्षणासाठी खदक होता

इब्राहिम रोझा ही विजापूरमधील सर्वात कलात्मक व भव्य वास्तू आपल्यावर चागलीच छाप पाडते मक्का गेटच्या बाहेर सुबकपणे सजलेली ही इमारत दुसऱ्या इब्राहिमच्या पत्नीची कबर म्हणून बाधण्यात आली होती पण प्रत्यक्षात ती इब्राहिम व त्याच्या कुटुबियाची कबर झाली त्यात इब्राहिम अली (दुसरा), त्याची पट्टराणी ताज सुल्ताना आणि इतर चार कुटुबिय याची थडगी आहेत इब्राहिम रोझाचे दोन भाग असून एका भागात रोझा आणि दुसऱ्या भागात मशीद आहे या दोन्हीसभोवती १४० चौरस मीटर्सचे सुदर उद्यान आहे. रोझा, मशीद व त्यातील चौक अतिशय स्वच्छ ठेवण्यात आले आहेत रोझा व मशीद लालसर दगडाची आहेत रोझाला चार बाजूना उच मनोरे असून त्याशिवाय प्रत्येक बाजूला सहा लहान घुमट आहेत रोझा कलात्मक नक्षीने उत्तम सजलेला आहे रोझाच्या पहिल्या घुमटाखाली चाळीस चौरस फुटाचा हॉल आहे रोझाचे दरवाजे व खिडक्या उत्कृष्ट नक्षीच्या आहेत भिंतीवर सोनेरी रगात कुराणातील वचने लिहिलेली आहेत मशीद आणि रोझा याच्यामध्ये जो चौक आहे तो खूपच मोठा आहे पण रोझाच्या दरवाजात उभे राहिल्यास मशिदीतून अगदी हळू टाळी वाजविली तरी ती ऐकू येते मशिदीवरील नक्षीत दगडी साखळी व मनोरे प्रेक्षणीय आहेत जवळच अब्दुल रजाक खादरी याची कबर आहे तो महमदचा मौलवी होता त्याच्या कबरीसमोर एका फकिराची कबर आहे तो मूळ हिदू होता, पण नतर मुसलमान झाला

विजापूरच्या डाक बगल्याच्या बाजूला कमान नावाची अर्धवट इमारत आहे या इमारतीचा तळमजला २२५ चौरस फूट आहे सुलतान महमदने बाधलेल्या गोलघुमट ह्या इमारतीपेक्षा मोठी इमारत बाधण्याच्या उद्देशाने अली (दुसरा) याने ही इमारत बाधण्यास सुरुवात केली पण ती बाधली जात असतानाच अली लढाईत मारला गेल्याने ही अपूर्ण राहिली हिचा पहिला मजला बाधून झाला आहे हे बाधकाम पक्के दगडाचे व मजबूत

आहे त्यात दुसरा अली, त्याची राणी व इतर अकरा जणाच्या कबरी आहेत जामा मशिदीच्या दक्षिणेकडे मेहतर महाल नावाची मोडकळीस आलेली इमारत आहे ती सत मेहतर (गानी) याने पहिल्या अली शहाच्या कारकीर्दीत बाधली होती त्याला बागी महाल असेही म्हणतात सत मेहतर याने अलीकडून अनेक देणग्या मिळवून ही इमारत बाधली या इमारतीचा दर्शनी दरवाजा उत्तम शिसवी लाकडाचा आहे आतील दिवाणखान्याच्या छतावर सुदर नक्षी कोरलेली आहे ही इमारत चौकोनी आकाराची व दुमजली आहे दोन्ही मजल्यावर देखणे कॉरिडर्स असून कमानी व भिंतीवर उत्तम नक्षी आहे या इमारतीची उची ९६ फूट आहे या इमारतीत त्या वेळच्या मुसलमान स्त्रिया काही खास सण व उत्सवप्रसगी जमत असत

विजापूरमध्ये अनेक विहिरी आहेत त्यापैकी काही विहिरीना ऐतिहासिक महत्त्व आहे ताज बावडी नावाची तलावाच्या आकाराची विहीर ही त्यापैकीच एक आहे मलिक सदल या वास्तुशिल्पकाराने ही प्रचड विहीर दुसऱ्या इब्राहिमची पट्टराणी ताज सुलताना व त्याची आई याच्या स्मरणार्थ बाधली म्हणून हिचे नाव ताज बावडी असे आहे या बावडीत जाताना प्रथम ६५ फूट रुद अशी भव्य कमान दिसते त्या वेशीसमोर दोन खोल्या व दोन मिनार आहेत त्यामागे भिंती बाधून ही विहीर तयार केली आहे कमानीतून आत गेल्यावर थोड्या पायऱ्या लागतात पुढे तिन्ही बाजूना गॅलरी बाधलेली आहे या गॅलरीस कठडे आहेत तिथून आतील खोलीत जाता येते ताज बावडी ही विहीर २३१ चौरस फूट आहे तिची खोली ५२ फूट आहे या बावडीचा विशेष असा की मुस्लिम बाधणीची ही विहीर असूनही हिच्या जवळच्या इमारतीत दक्षिण भिंतीत बलदेव, विष्णू व शिव याची लहान मदिरे आहेत शहापूर गेटजवळ चाद बावडी ही विहीर आहे पहिल्या अलीने आपली पट्टराणी चांदबिबी हिच्या स्मृतिप्रीत्यर्थ ही बावडी इ स १५७९ साली बाधली

पहिल्या अलीच्या कारकीर्दीत जी अनेक सस्मरणीय बाधकामे झाली, त्यात गगन महालाचाही समावेश होतो पहिल्या अलीने विजापूरभोवतालची तटबदी बाधून काढली आणि विजापूर प्रातात चार किल्लेही बाधले विजापूर शहरातील गगन महाल ही इमारत त्याने इ स

१५६१ मध्ये बाधली आमजनतेच्या बैठकीसाठी हे एक मोठे सभागृह आहे समोर ७० फूट उचीची भव्य कमान आहे सरदार लोकाना बसण्यासाठी ही जागा होती या इमारतीच्या कमानीत खाली डोके असलेल्या माशाच्या आकाराचे ब्रॅकेट्स वापरण्यात आले आहेत या इमारतीचा काही भाग आता पडलेला असला, तरी लाकडावरचे कोरीव काम अजूनही पाहण्यासारखे आहे गगन महालच्या दक्षिणेला सात मजली नावाची इमारत आहे पूर्वी या इमारतीला सात मजले होते, पण आता वरचे दोन मजले पडून गेले आहेत तरीही उरलेल्या पाच मजल्याची उची ९७ फूट आहे ही सात मजली इमारत दुसऱ्या इब्राहिमने १६८३ साली बाधली. या उच इमारतीचा उपयोग टेहळणी बुरूज म्हणून करण्यात येत असे या सात मजलीजवळच मोहरममधील ताबुताच्या आकाराची एक इमारत आहे हिचे नाव जलमदिर पूर्वी या इमारतीच्या हौदात पाणी असे व त्याचा उपयोग जलक्रीडेसाठी करण्यात येई चिनी महाल या नावाची आता मोडकळीला आलेली जुनी इमारत विजापुरात आहे या इमारतीत चिनी मातीची जुन्या काळची भाडी सापडली म्हणून तिला हे नाव पडले ग्रेनरी नावाच्या इमारतीत पूर्वी धान्य साठवले जाई कलेक्टर कचेरीजवळ जी मक्का मशिदीच्या आकाराची मशीद आहे, ती मक्का मशीद या नावाने प्रसिद्ध आहे ताडा कासव बुरूज, अड्डु मशीद, अदालत महाल, मोती गुमझ, ख्वाजा अमीन दरवाजा, अफझल अली समाधी, बेगम तलाव ही विजापूर व आसपासची आणखी काही प्रेक्षणीय स्थळे पण आता मोडकळीस आलेली, अर्धीअधिक पडलेली, माती आणि धूळ यानी भरलेली ही ठिकाणे पाहून व त्याचा पूर्वीचा वैभवाचा काळ पाहून मन विषण्ण होते विजापूर हे वास्तविक दुष्काळी, ओसाड जमिनीवरचे शहर पण आदिलशाही सुलतानानी इथे दोनशे वर्षांत एवढे वैभव निर्माण केले होते की, ग्रँड डफ याने 'युरोपातसुद्धा असे शहर आढळणार नाही', असे म्हटले आहे युसूफ आदिल खान याने इ स १४८९ साली आदिलशाही या स्वतत्र राज्याची स्थापना केली त्यानतर १३८ वर्षांनी गादीवर आलेल्या महमद शहाने १६२७ ते १६५५ पर्यंत येथे राज्य केले आदिलशाहीची राजधानी येथून गोव्याला हलवावी असे अनेकदा मनसुबे केले गेले पण त्यापेक्षा विजापूरलाच पाणी व भव्य इमारती याच्या सुविधा आणण्याचे ठरवून आदिलशाही सुलतानानी या ओसाड गावाला वैभवावर चढवले

त्यानी शहराभोवती भक्कम तटबदी तर बांधलीच, पण त्या तटबदीबाहेर खोल खदक खणून त्यात बाहेरून पाणी आणून ओतले गोलघुमट, जामा मशीद, इब्राहिम रोझा अशा कित्येक भव्य आणि कलात्मक वास्तू बाधल्या आदिलशाही सुलतानीजवळचे विजयनगरचे साम्राज्य आणि इतर लहान राजे याच्या मुलखाचे लचके तोडून आपले राज्य वाढवले त्यानी दोनशे वर्षे समृद्ध . ;ग केले- पण १६८५ ला औरगजेबासारख्या बलाढ्य मोगल सम्राटाची वक्रदृष्टी आदिलशाहीकडे वळली सिकदर आलिशहा हा सुलतान अल्पवयी असतानाच औरगजेबने प्रचंड सैन्यानिशी स्वारी केली सिकदरच्या सैन्याला मागे लोटीत मोगल सैन्याने चढाई केली तेव्हा सिकंदराने विजापूरच्या किल्ल्याचे दरवाजे बद करून घेतले औरगजेबाने किल्ल्याला वेढा घालून रसद तोडली किल्ल्यावर असलेल्या सामग्रीवर सिकदराच्या सैन्याने काही महिने तग धरला औरंगजेबाने तोफाचा भडिमार करून तटबदीला खिंडारे पाडली विजापूरमधील इमारतींनाही या तोफाच्या गोळ्यानी धोका आणला अखेर उपासमार होऊ लागली तेव्हा सिकदर अलिशहा शरण आला आणि १५ ऑक्टोबर १६८६ रोजी औरगजेबचे निशाण विजापूरवर फडकले. त्यावेळी या वैभवशाली शहरातील अनेक इमारती उद्ध्वस्त झाल्या होत्या किल्ल्यातील लोकानी झाडे तोडून ती सरपणासाठी वापरली होती, उपासमारीने शेकडो लोक मृत्युपथाला लागले होते हे भयानक दृश्य पाहून औरगजेबासारखा बादशहासुद्धा रडला, अशी इतिहासात नोंद आहे. सैन्याच्या आणि रोगराईच्या या दुहेरी माऱ्यातून विजापूर कधीच सावरले नाही त्याला गत वैभव पुन्हा कधीच मिळाले नाही

❑

# १०. ऐहोळे, पट्टदकल आणि बदामीची शिल्पकला

विजापूरहून बदामी सुमारे दोनशे किलो मीटर्सवर आहे बदामी हे कलात्मक लेण्याबद्दल प्रसिद्ध आहे बदामीच्या दक्षिणेकडील डोंगरात एकदर चार लेणी आहेत त्यापैकी तीन हिंदूची असून एक जैनाचे आहे या हिंदू लेण्याचे वैशिष्ट्य असे की, दक्षिण भारतात हिदू राजानी कोरलेली ही सर्वात प्राचीन लेणी आहेत लेणी क्रमाक एक व दोन ही पुलकेशी राजाने इ स ५५० मध्ये कोरून घेतली या दोन्ही लेण्याची रचना सर्वसाधारपणे सारखीच आहे प्रथमदर्शनी एक सज्जा, मग मडप व आत गर्भगृह अशी ही रचना आहे क्रमाक एकचे लेणे शिवाचे आहे या लेण्यातील चौकोनी खाबावर अप्रतिम नक्षी आहे त्यावर गण हे शिवाचे अनुयायीही कोरलेले आहेत मुख्य मूर्ती सोळा हाताच्या शिवाची असून तो ताडव नृत्य करीत असल्याचे दिसते कलेच्या दृष्टीने ही शिवमूर्ती अत्यत सुबक आहे याच लेण्यात शेषावर बसलेल्या चार हाताच्या विष्णूचीही प्रेक्षणीय मूर्ती आहे महिषासुरास ठार करणाऱ्या दुर्गेची मूर्ती येथे आहे तसेच अर्धनारीनटेश्वरच्या मूर्तीत अर्धा शकर आणि अर्धी पार्वती उत्तमपणे कोरण्यात आली आहेत जवळच हाडाची काडे झालेल्या भृगीचीही मूर्ती आहे शकर-पार्वतीचे दोन पुत्र गणपती आणि स्कद याच्या मूर्ती या लेण्यात पाहावयास मिळतात मुख्य मूर्ती चागल्या दीड पुरुष उच आणि रेखीव आहेत या लेण्यात एक नागाची मूर्ती आणि एक शिवलिंगही आहेत दुसरे लेणे विष्णूचे आहे या लेण्याच्या प्रथमदर्शनी दोन द्वारपाल आहेत या लेण्याचे मुख्य आकर्षण म्हणजे येथे कोरलेल्या विष्णूच्या अवताराच्या मूर्ती त्यात वराह अवतारात वराह पृथ्वीला एका राक्षसापासून वाचवतो असे दृश्य आहे तसेच गरुडावर आरूढ झालेल्या विष्णूचीही सुबक मूर्ती आहे या मूर्तीस चार हात आहेत या तीन हिंदू लेण्यात तिसरे लेणे महत्त्वाचे आहे हे लेणे इ स ५६८ मधील आहे, अशा आशयाचा एक शिलालेख येथे आहे हे लेणे म्हणजे विष्णूचे मदिर आहे या मदिराचे चौकोनी खाब अत्यत सुदर नक्षीने विभूषित आहेत त्याचे ब्रॅकेटही अप्सरा व यक्ष याच्या सुदर

मूर्तींनी समृद्ध आहेत हे लेणे चागले सत्तर फूट रुद असून त्यातून बदामीचे नयनमनोहर दृश्य दिसते डोगराच्या पायथ्याशी असलेली बदामीचा जलाशय, बाजूचे डोगर व झाडी, मधूनच मान उच करून डोकावणारे एखादे मदिर यामुळे हे दृश्य चागलेच लक्षात राहते त्या जलाशयापलीकडे बदामीचे म्युझियम आहे लेण्याच्या स्तभावर विष्णू, लक्ष्मी, वीणा वाजवीत असलेली सरस्वती, नागाचे युगुल अशा सुबक मूर्ती कोरलेल्या आहेत या लेण्याच्या प्रशस्त सज्जाच्या एका बाजूला शेष या नागावर बसलेल्या विष्णूची भव्य मूर्ती आहे तिची उची १२ फूट ९ इच आणि रुदी ७ फूट आहे या विष्णूच्या मस्तकावर सात फण्या असलेल्या नागाने छत्र धरले आहे सज्जाच्या दुसऱ्या बाजूला नरसिंह आणि विष्णूचा वामनावतार याची उत्कृष्ट शिल्पे आहेत वामनावताराचे शिल्प विशेष तपशीलवार असून अधिक प्रेक्षणीय आहे या लेण्यात काही चित्रेही आहेत काळाच्या ओघात ती आता अस्पष्ट झाली असली तरी त्यातील कला अजठा येथील लेण्यातील चित्राची आठवण करून देते

बदामी येथील चौथे लेणे जैनाचे आहे तिसऱ्या लेण्यानतर बऱ्याच काळाने हे लेणे कोरले गेले आहे या लेण्यात पार्श्वनाथाची भव्य मूर्ती आहे तसेच गोमतेश्वराचीही नग्न मूर्ती आहे या मूर्तीच्या पायाना सर्पांनी वेटोळे घातलेले दाखविले आहे मूर्तीच्या हातावर वेलींची नक्षी कोरलेली आहे जैन धर्माचा सस्थापक महावीर याचीही येथे एक मूर्ती आहे

बदामीचे बनशकरी मदिर चागले चार मजली आणि वर शिल्प असलेले असे आहे बनशकरी हे शाकभरी देवीचे दुसरे नाव मदिरासमोरचा चौकोनी तलाव सुदर आहे त्या तलावाजवळ एक दगडी मडपही आहे

देवीच्या वार्षिक जत्रेच्या वेळी अत्यत सुदर नक्षीकाम केलेले लाकडी दरवाजे विक्रीसाठी येतात त्याची किंमत एक ते दोन हजार रुपये असते गुजरातकडील व्यापारी हे दरवाजे जत्रेत खरेदी करतात आणि परदेशी व्यापाऱ्याना भारी किमतीला विकतात इग्लड, अमेरिका, फ्रान्स इत्यादी देशात या दरवाजाची दहा ते पधरा हजार रुपयापर्यंत किंमत येते

बदामीला एक म्युझियम आणि मालेगट्टी शिवालय नावाचे टेकडीवरील शिवमदिरही आहे ऐहोळे हे बदामीपासून ४६ किलो मीटर्सवरील महत्त्वाचे प्रेक्षणीय ठिकाण आहे ऐहोळची मदिरे चालुक्य घराण्यातील राजाच्या

सुरुवातीच्या कारकीर्दीतील आहेत वातापीच्या चालुक्य घराण्याने या भागावर दोनशे वर्षे राज्य केले त्यापैकी फक्त पंधरा वर्षे हा भाग त्याच्या ताब्यात नव्हता सहाव्या शतकाच्या सुरुवातीला बदामीच्या कदब राजाचे आधिपत्य झुगारून देऊन चालुक्य स्वतंत्र झाले त्यानी बदामी, ऐहोळे, पट्टदकल, महाकूट, अबामपूर, पायनाशम आणि इतर भागात अनेक कलात्मक मदिरे बाधली ऐहोळ हा आर्य होळ या नावाचा अपभ्रंश आहे आर्य होळ म्हणजे आर्य नगरी इ स ८५० मध्ये ही नगरी वसवली गेली त्यावेळी हे एक सपन्न शहर होते नदीच्या काठी जलाशयाजवळ किंवा कुड तयार करून त्याच्या काठी मदिर बाधायची अशी त्याकाळी पद्धत असे. भक्तानी स्नान करून देवदर्शन घ्यावे ही त्यामागची कल्पना होती ऐहोळची बहुतेक मदिरे मलप्रभा नदीच्या काठी आहेत जी मदिरे नदीपासून काही अतरावर आहेत, त्याच्याजवळ कुडे अथवा विहिरी खणण्यात आल्या आहेत. ऐहोळ येथे सुमारे सत्तावीस मदिरे आहेत, त्यात दुर्गादेवी मदिर आणि लाडखान मंदिर ही सर्वात प्रसिद्ध आणि वैशिष्ट्यपूर्ण आहेत चालुक्याच्या कारकीर्दीतील ही सर्वात जुनी मदिरे आहेत

ऐहोळचे हुसिमल्ली मदिर हे अत्यत जुन्यापैकी एक आहे त्याचा काही भाग आता पडलेला असला तरी अद्याप गर्भगृह, प्रदक्षिणा मडप, स्तभ असलेले सभागृह आणि पोर्च हे मदिराचे भाग शाबूत आहेत पुलकेशी (पहिला) याचे आजोबा जयसिंह याच्या काळातील हे मदिर असावे असा तज्ज्ञाचा अदाज आहे. पोर्चचे जे स्तभ आहेत त्यावर फारशी नक्षी नाही सभागृहाचे स्तभ आणि सभागृह याची रचना बुद्धाच्या चैत्याच्या धर्तीवर आहे सभागृहाच्या स्तभावरही कोरीव काम नाही गर्भगृह आणि शिखर हे मंदिराचे भागही साधेच आहेत शिखराचे टोक निमुळते होत गेले असले तरी शेवटी सपाट आहे मदिराजवळ एक उद्ध्वस्त मडप आणि गणपती व हत्ती याची मोडकी मुंडकी पडली आहेत बारकाईने पाहिले तर गर्भगृहाचा काही भाग नतर जोडला आहे हे लक्षात येते कारण तो चालुक्य शैलीच्या मंदिराच्या बाधणीशी सुसगत नाही एस राजशेखर यानी याबाबत अनेक तज्ज्ञाच्या मतांचे दाखले दिले आहेत (अली चालुक्य आर्ट ॲट ऐहोळ) भिंतीला लावलेल्या जाळ्याची रचना चालुक्य शैलीची नसून होयसाळ शैलीची आहे हुसिमल्लीची दोन मदिरे येथे असून त्यात एकदर तीन



ऐहोळचे लाडखान मदिर

शिलालेख आहेत एकावर कवज्ञ आणि काचन अशी नावे कोरलेली आहेत ती या मदिराच्या कारागीराची असावीत मदिराच्या भितीच्या बाहेरच्या बाजूस कोरलेल्या शिलालेखात विजयादित्य या चालुक्य राजाचा उल्लेख आहे हा शिलालेख इ. स ७०९ मधील आहे

<u>लाडखान मदिर</u> हे ऐहोळमधील सर्वात जुने मदिर आहे लाडखान हे गुहेच्या आकाराचे मदिर आहे या वेगळ्या आकारामुळे त्याच्याकडे चटकन आपले लक्ष जात नाही या आकारामुळे हे सहाव्या शतकात बाधले असावे असे वाटते त्याचे एकदर बोजड स्वरूप व साधेपणा यावरूनही हाच निष्कर्ष निघतो मदिरातील भिती, स्तभ व शिखर यावर बारीक कलाकुसर

करण्याची पद्धत या भागात बऱ्याच कालावधीनतर सुरू झाली या मदिराला लाडखान हे विचित्र नाव पडण्याचे कारण असे की, या भागातील मुसलमान सरदार लाडखानने या मदिरावर आपला महाल बाधला होता व त्यात तो राहत होता

या मदिराचे छप्पर सपाट आहे जमिनीपासून हे फारसे उचही नाही त्यामुळे ते गुहेसारखे दिसते हे मदिर दगडाचे चौकोन किवा लबचौकोन एकमेकावर रचून बाधलेले आहे त्यामुळे मदिराच्या भिती खूपच जाड आणि भक्कम झाल्या आहेत या मदिराच्या सभागृहात दोन प्रकारचे स्तभ आहेत तसेच पोर्चमध्येही दोन वेगळ्या प्रकारचे स्तभ आहेत गर्भगृहातील स्तभाच्या पायथ्याशी साधा पट्टा आणि त्यावर अस्तगत होणारा सूर्य कोरलेला आहे स्तभावर चार हाताचे ब्रॅकेट्स आहेत मदिराच्या सपाट छपरावर दुसरे लहान मदिर असून ते सूर्यदेवाचे आहे काही तज्ज्ञाच्या मते लाडखान मदिर ही कर्नाटकातील सर्वात जुनी वास्तू आहे या मदिराची बरीचशी रचना जबुलिंग मदिराच्या धर्तीवर आहे जबुलिंग मदिर बदामी येथे आहे ऐहोळ, पट्टदकल आणि बदामी येथील विविध मदिराच्या रचनेवरून सुरुवातीच्या चालुक्य राजाच्या कारकीर्दीत उभारल्या गेलेल्या मदिराच्या शैलीतील अनेक समान दुवे लक्षात येतात याच कामात बाधले गेलेले मेजुटी मदिर ऐहोळ येथे आहे हे मदिर एका टेकडीवर बाधलेले असून जैन सत जुरा आणि अबिका याच्या मूर्ती त्यात कोरलेल्या आहेत मेजुटी मदिर हे जैन शिल्पकलेच्या दृष्टीने महत्त्वाचे मानले जाते कारण कर्नाटकात नतर जी जैन मदिरे उभारण्यास आली त्याच्यावर या मेजुटी मंदिराच्या शैलीची खोल छाप पडली आहे

ऐहोळ येथे जी अनेक मदिरे आहेत त्यात भव्यता आणि कलात्मकता याच्यादृष्टीने दुर्गा मदिर हे सर्वात महत्त्वाचे आहे हे मदिर इ स ५५० मध्ये बाधले गेले दुर्गा मदिर आणि पट्टदकल येथील विरूपाक्ष मदिर याच्यात बरेच साम्य आहे दुर्गा मदिर हे बुद्ध मदिराच्या धर्तीवर अर्धवर्तुळाकार आकाराचे आहे व त्याला लाबट सभागृह आहे या मदिरात अनेक सुदर कलाकृती कोरलेल्या आहेत मदिरात जाताना सुमारे वीस फूट उचीचे दगडी प्रवेशद्वार आहे त्याच्या दोन्ही बाजू साध्या असून वरच्या बाजूला कोरीव कामाचे चार पट्टे व त्यावर लहानसे शिखर आहे मदिराच्या



**ऐहोळयेथील गुहेतील विष्णुमूर्ती**


चबुतऱ्याचा खालचा भाग साधा आहे पण त्यावर उत्तम कोरीव काम केलेले दोन पट्टे आहेत त्यावर यक्ष, किन्नर, अप्सरा याच्या सुबक मूर्ती आहेत सभामडपाचे स्तंभही विविध प्रेमी युगुलाच्या मूर्तींनी सजलेले आहेत मदिराच्या भोवती प्रशस्त आवार असून त्याभोवतीचा तट आता काही ठिकाणी पडलेला आहे मदिराला जी गवाक्षे आहेत, त्याच्या ग्रिल्सही

सुदर नक्षीनी नटलेल्या आहेत गर्भगृहात महिषासुराला मारणारी दुर्गा आहे. त्याशिवाय अर्धनारीनटेश्वर, शकर, नरसिंह इत्यादी अनेक देवताच्या देखण्या मूर्ती या मदिरात आहेत त्या अतिशय प्रेक्षणीय आहेत दुर्गा मदिराच्या आतील काही भागाचा व शिल्पाचा विध्वस झाला असला तरी जे उरले आहे त्यावरून पूर्ण मदिराच्या श्रेष्ठ कलात्मकतेची कल्पना येते छताला आधार देणाऱ्या दगडी तुळयाही नक्षीकामाने सुशोभित करण्यात आल्या आहेत त्यात बदकाच्या मनोहर रागा आहेत मदिराच्या अधिष्ठानावर 'श्री जिनालय' अशी अक्षरे असलेला शिलालेख आहे, काही स्तभावर प्रेमी युगुलाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत त्यापैकी काही आता भग्न झालेल्या आहेत

ऐहोळमध्ये जी गुहा-मदिरे आहेत, त्यात रावणफडी गुहा ही अत्यत महत्त्वाची आहे ट्रॅव्हलर्स बगल्याशेजारी एका टेकडीच्या बसक्या जागेत ही गुहा आहे लाबून हिच्या प्रवेशद्वाराचे दोन चौकोनी साधे खाब फक्त दिसतात पण जवळ गेल्यावर दोन्ही बाजूना चौकोनी कोनाड्यासारख्या कोंदणात दोन सुंदर मूर्ती कोरलेल्या दिसतात या गुहा मदिराला व्हराडा नाही प्रवेशद्वारातून आत गेल्यावर नवग्रह कोरलेले छत लागते या नवग्रह विभागाच्या भिंतीवरही उत्तम कोरीव काम केलेले आहे त्यात तळाच्या भागात यक्षाच्या रागा आहेत गर्भगृहामध्यभागी शिवलिंग आहे ते जमिनीवरच्या दगडातच कोरलेले आहे ही गुहा मुळात जैन गुहा असावी आणि नतर तिचे हिंदू मदिरात रुपातर केले गेले असावे असे तिच्या जैन पद्धतीच्या रचनेवरून वाटते मदिरासमोर एका भग्न चबुतऱ्यावर दगडाचा नदी आहे रावणफडी गुहेजवळच शिवलिग असलेली आणखी लहानशी गुहा आहे

ऐहोळ येथे सुमारे दीडशे मदिरे आहेत त्यापैकी जवळजवळ पन्नास मदिरे ही चालुक्याच्या सुरुवातीच्या राजाच्या काळातील आहेत. त्या काळचे नागरिक अनेक देवताचे भक्त होते आता या दीडशेपैकी बहुतेक मदिरातील मूर्ती नष्ट झाल्या असल्या, तरी मदिरातील इतर शिल्पाकृतींवरून ते कोणत्या देवाचे मदिर आहे ते ओळखता येते उदा मदिरासमोर नदी असला तर हे शिवमदिर, गरूड असला तर विष्णुमदिर, तीर्थंकरांची मूर्ती असेल तर ते जैन मदिर अशा सहज ओळखता येतील

अशा खुणा आहेत काही मदिरात शिलालेख आहेत, तिथेही त्यावरून मदिरात कोणती मूर्ती होती याचा अदाज करता येतो ऐहोळ येथे वर वर्णिलेल्या मदिराखेरीज भगवती मदिर, चैक्कुगुडी मदिर, ज्योतिर्लिंग मदिराचा समूह, कोंटगुडी मदिरे अशी अनेक प्रेक्षणीय मदिरे आहेत. पट्टदकल ही चालुक्या राजाची अखेरची राजधानी होती राजा विक्रमादित्य (दुसरा) याने ही नगरी स्थापन केली आठव्या शतकात त्याने पल्लवाचा पराभव करून हा भाग घेतला या शहरातील मदिरे ही त्या काळच्या हिंदू वास्तुशिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने आहेत मलप्रभा नदीच्या डाव्या किनाऱ्यावर हा मदिराचा पुजका असून त्याभोवती सुदर उद्यान आणि हिरवळ करण्यात आली आहेत विरूपाक्ष मदिर हे पट्टदकल येथील सर्वात मोठे आणि सर्वोत्कृष्ट असे मदिर आहे ते ७६ मीटर्स लाब आणि ३६ मीटर्स रुद असून इ स ७४० मध्ये बाधले गेले हे लोकमहादेवी यानी



**पट्टदकलच ।वरूपाक्ष मदिर**

बाधले विरूपाक्ष मदिराचे खास वैशिष्ट्य म्हणजे रामायण आणि महाभारत यातील अत्यत सुदर आणि विपुल दृश्ये या मदिरातील स्तभावर आणि भिंतींवर कोरलेली आहेत या मदिरातील एक शिल्प विशेष लक्षात राहते

त्याच्याकडे एका बाजूने पाहिले तर तो हत्ती दिसतो आणि दुसऱ्या बाजूने पाहिले तर रेडा दिसतो विरूपाक्ष मदिराच्या बाहेरच्या भिंतीवरही शिवाच्या अनेक मूर्ती आहेत त्यात नृत्य करणारा शिव, असुरांचे मर्दन करणारा शिव, पार्वतीसह शिव अशी त्याची विविध रूपे कलात्मक शिल्पातून दाखविलेली आहेत एका देखण्या शिल्पात रावण वीस हातानी कैलास पर्वत उचलीत असून त्या पर्वतावर शिव व पार्वती आरूढ झाल्याचे दृश्य कोरलेले आहे बाजूला नदी व गण आहेत

मल्लिकार्जुन मदिर हे आणखी एक प्रेक्षणीय मदिर आहे ते विक्रमादित्य दुसरा याची पत्नी त्रैलोक्य महादेवी हिने बाधलेले आहे भागवत आणि हरिविजय या दोन ग्रथातील निवडक दृश्ये या मंदिरात कोरलेली आहेत. येथील पापनाथ मदिर मुळात पापनाशक मदिर म्हणून ओळखले जात होते या मदिरातही रामायणातील महत्त्वाचे प्रसग भितीवर व स्तभावर कोरलेले आढळतात काही प्रेमी युगुलेही कोरलेली आहेत पट्टदकल येथील विविध मदिरात रामायण, महाभारत, भागवत आणि हरिविजय या धर्मग्रथाबरोबरच पचतत्र आणि किरात अर्जुन युद्ध यातील चित्रे कोरलेली आहेत या मदिराच्या प्राचीन कलात्मकतेमुळे 'युनेस्को'ने जागतिक सांस्कृतिक परपरा म्हणून या मदिराना मान्यता दिलेली आहे येथील जैन मदिरात दोन रेखीव हत्तींच्या मूर्ती आहेत. त्या प्रेक्षणीय आहेत त्यापैकी एका हत्तीवर इद्र आरूढ झालेला आहे पापनाथ मदिराच्या बाहेरील भिंतीवरील शिखरवजा कोरीव काम आणि त्यातील मूर्ती विशेष सुदर आहेत पट्टदकल हे पूर्वी पट्टद-किसवोलोल म्हणजे रक्तपूर या नावानेही ओळखले जात होते चालुक्य वशातील राजाचे राज्याभिषेक या ठिकाणी होत असत. या मदिरसमूहाच्या आवारात अशा उद्ध्वस्त झालेल्या इतर अनेक मंदिराचे कलात्मक अवशेष माडून ठेवलेले आहेत ते एखाद्या खुल्या वस्तुसग्रहालयासारखे दिसतात

कर्नाटक हे असे अनेक प्रेक्षणीय स्थळानी आणि सास्कृतिक परपरेने भरलेले राज्य आहे या राज्याचा दौरा केल्याने कोणालाही भारतीय श्रेष्ठ सस्कृतीचा साक्षात्कार होतो

❑

# ११. कानडी साहित्याची परंपरा

अक्कमहादेवी ही कानडी साहित्यातील पहिली कवयित्री बहिणाबाई किंवा जनाबाई या मराठी कवयित्रींप्रमाणेच अक्कमहादेवी हिची कविता अनुभवातून फुलली आहे ती वीरशैव होती अक्कमहादेवीने अध्यात्म आणि लालित्य याचा सुदर सगम केला आहे. ती लावण्यवती व बुद्धिमान होती ती गरीब घरात जन्माला आली कौशिक राजाने तिच्या सौदर्यावर मोहित होऊन तिला मागणी घातली आपल्या शिवभक्तीच्या आड वैवाहिक जीवन येणार नाही या अटीवर तिने ही मागणी मान्य केली. पण विवाहानतर कौशिक राजाने ही अट मोडली तेव्हा तिने ससार सोडून शिवभक्तीचा विरक्त मार्ग अनुसरला तिची वचने ही अतिशय उद्बोधक आहेत आणि आत्मचरित्रात्मकही आहेत भक्तिसाधनेच्या पायऱ्या, क्लेश व अतिम सुख तिने आपल्या वचनातून व्यक्त केले आहे शिवाला ती म्हणते, 'रेशमाचा किडा स्वत·च्या स्नेहबधनातच घर करतो, तसे तुझ्या भक्तीच्या बधनात मला मरण यावे ' चेन्नमल्लिकार्जुनास आपला पती मानून ती जेव्हा त्या देवाला आळविते तेव्हा विरह सुदर काव्यरूप घेतो ती म्हणते-

''बाबा, तू ऐकतोस तर ऐक, नाहीतर सोड तुला न आळविता मला राहवत नाही रे तू प्रेम करतोस तर कर, नाहीतर सोड. तुझी पूजा न करता मला राहवत नाही रे बाबा, मी तुला आवडते तर बरे, नाहीतर नाही तुला न आलिंगिता मला राहवत नाही रे कळवळ्याने माझे मन उफराटे झाले आहे बाबा गिरकून वाहणारा वारा आग पाखडतो आहे, बाई चादणे ऊन झाले सजणी, नगराच्या नाकेदारासारखी मी कष्टी झाले आहे एकदा कामदेवाच्या पाया पडते आणखी एकदा चंद्राला पदर पसरते. जळो हा विरह । मी कुणासाठी अधीर होऊ ? धीर गमावू ? हे भ्रमर सकुल, हे सहकार वृक्ष, हे चद्रिके, हे कोकिळे, तुम्हा सर्वासर्वांशी एकच मागणी-माझे धनी चेन्नमल्लिकार्जुन देव भेटल्यास मला आणून दाखवा अंग नसता, वाचा नसता, अत नसता, माझ्या जिवलगाशी मिळून मी सुखी झाले की, मी अन्य कशाकडेही वाछा करणार नाही भिन्न सुखाची

अभिलाषा बाळगणार नाही. चिखल भरलेल्या तळ्यात पाण्याचा लोंढा वाहून आल्यासारखी, सुकून काडी झालेल्या झाडाला पाऊस आल्यासारखी, चेन्नमल्लिकार्जुनरूपी सद्‌गुरूस पाहून मी धन्य झाले''

शिवावरची भक्ती आणि जीवनाविषयीचे सखोल ज्ञान यामुळे अक्कमहादेवीला निर्भयता आणि निश्चिंतता प्राप्त झाली. तिची वचने विलक्षण आत्मविश्वासाने समृद्ध आहेत ती म्हणते, ''मला भूक लागली तर भिक्षान्न आहे. तहान लागली तर ओढे, तळी, विहिरी आहेत कुणी माझे नाही म्हणून मी शोक करीत नाही मी तलवारीच्या पात्यावर झोपले आहे, ठिणगी ठिणगी आग माझ्यावर पडली तर माझी तहानभूक हरपते. आकाश कोसळते तर ती मला आघोळच घडली असे मी मानते. अंगावर डोंगर कोसळला तर बुचड्यातले फूल पडले असे मला वाटते मुंडके तुटून पडले तर चेन्नमल्लिकार्जूनाला प्राण अर्पण केले असे मी म्हणते.'' अक्कमहादेवीची अनेक प्रभावी वचने आणि 'योगाग त्रिविधी' ही त्रिपदींचा संग्रह प्रसिद्ध आहे.

बसवेश्वराचा भाचा चेन्नबसवेश्वर, सिद्धराम आणि अनेक राजे, मंत्री वगैरे त्याकाळी वचनकार झाले कारण वचने हा त्या काळचा लोकांच्यापर्यंत पोहोचण्याचा सर्वमान्य असा साहित्य प्रकार होता. तेराव्या शतकात हरिहर, राघवांक आणि पद्मरस हे तीन भक्तकवी ख्यातनाम आहेत वचने लिहिण्यापासून त्यांचा लेखनप्रकार अलग आहे त्यांनी पद्मग्रंथ लिहिले. छंदात रचना करून त्यांनी कानडी काव्याचा पाया घातला हरिहरचे ग्रंथ म्हणजे रसाशतक, पंपाशतक, मुडिगेय अष्टक, गिरिजा कल्याण आणि शिवगणाचे रगळे (रगळे हे एका छंदाचे नाव आहे) हे होते हे सर्व शिवभक्तीचे विविध साक्षात्कार आहेत त्याची काव्यरचना प्रायः आत्मकथनात्मक आहे परमेश्वराचे स्तवन करावे, माणसाचे कधी करू नये हे सूत्र त्यांनी सांगितले आहे त्याच्यानंतरच्या कवींनी त्याचे मार्गदर्शन स्वीकारून त्याच्या भक्तिपद्धतीला 'हरिहर मार्ग' असे नाव दिले आहे. कानडी साहित्यातील पहिला चंपू ग्रंथ म्हणून हरिहरची 'गिरिजा कल्याण' ही कृती मान्यता पावली आहे 'बसवेश्वर राज रगळे' हीही त्याची कलाकृती त्याच्या श्रेष्ठ निर्मितीपैकी एक आहे. श्री मुगळी यांनी त्यांच्याबद्दल म्हटले आहे, ''हरिहर हा कन्नडातील महाकवींपैकी एक.

विशेषत· शिवभक्त व पंडितकवींमध्ये तो अग्रगण्य होता त्याने आपले व्यक्तिमत्त्व परिपक्व बनवले होते''

हरिहराचा भाचा व पट्टशिष्य राघवाक हाही पडित कवी होता त्याने आपल्या सर्व रचना षट्पदीमध्ये केल्या. 'सोमनाथचरित', 'वीरेशचरित', 'सिद्धरामपुराण' इत्यादी त्याच्या सहा कलाकृती मान्यता पावल्या आहेत राघवाकाची कथनकला उत्तम आहे. 'हरिश्चंद्र काव्य' ही त्याची कृती त्याचे काव्यातील श्रेष्ठ स्थान निश्चित करते. कानडी साहित्यावर बाराव्या-चौदाव्या शतकापर्यंत वीरशैव साहित्याचा प्रभाव वाढत होता मात्र नेमिचंद्र व रुद्रभट्ट यानी इतर प्रकारच्या काव्यनिर्मितीत महत्त्वाची भर घातली नेमिचद्राचे 'लीलावती प्रबंध' हे चंपूकाव्य शृगार रसप्रधान आहे 'नेमिनाथ पुराण' हा त्याचा ग्रंथ जैन तीर्थंकार नेमिनाथ याची महत्ता सागणारा धार्मिक ग्रथ आहे रुद्रभट्टच्या 'जगन्नाथविजय' मध्ये विष्णुरामाची कथा आहे त्यात काही ठिकाणी प्रतिभेचा साक्षात्कार होतो पण अनेकदा आत्मप्रौढीने रसभंग केला आहे तेराव्या शतकाच्या पूर्वार्धात जन्न नावाचा कवी होऊन गेला. त्याला होयसाळ वंशातील नरसिंह राजाने 'कविचक्रवर्ती' ही पदवी दिली होती 'यशोधरचरित' आणि 'अनंतनाथ पुराण' हे त्याचे मुख्य ग्रथ काव्याच्या निकषावर जन्नचे ग्रथ श्रेष्ठ ठरतात त्याने पहिल्या ग्रथात अहिंसा आणि सयम याचा पुरस्कार केला. तीर्थंकार अनतनाथ याचे चरित्र त्याने 'अनंतनाथ पुराण' या चपू ग्रथात सागितले आहे मात्र असे श्रेष्ठ कवी हे या कालखडात अपवादात्मकच म्हणावे लागतील तेराव्या शतकाच्या सुरुवातीपासून पधराव्या शतकाच्या प्रारभापर्यंत बहुतेक कानडी कवी हे सामान्य दर्जाचे होते

पंधराव्या ते सतराव्या शतकापर्यंत कानडी साहित्य भरघोस व समृद्ध झाले या काळात हाडुगब्बा म्हणजे गेय काव्याला प्राधान्य मिळाले त्यामुळे कानडी साहित्य लोकाभिमुख झाले पूर्वी ते विद्वान व पंडित याच्यापुरतेच सीमित होते या काळातील राजांनी साहित्यादी कलाना बरेच उत्तेजन दिले. या राजात बुक्कराय, प्रौढदेवराय, कृष्णदेवराय, रामराय इत्यादींचा समावेश होता कुमारव्यास हा या काळातील एक श्रेष्ठ कवी त्याचे नाव नारायण होते व तो गदग येथील वीरनारायणचा भक्त होता ज्ञानेश्वरानी पैसाच्या खाबाजवळ बसून ज्ञानेश्वरी लिहिली, त्याचप्रमाणे कुमारव्यासानी

वीरनारायणाच्या मंदिरातील खांबाजवळ आपली रचना केली 'कन्नड भारत' किंवा 'गदुर्गिन भारत' ही त्याची मुख्य कलाकृती साडेआठ हजार षट्पदींच्या या ग्रंथात त्याने महाभारतातील आदिपर्वापासून गदापर्वापर्यंतचा भाग कथानकासाठी घेतला आहे मात्र त्यावरील काव्यरचना ही स्वतंत्र आहे महाभारतातील महत्त्वाच्या व्यक्तींच्या भावनांचे त्याने कलात्मक वर्णन केले आहे द्रौपदी वस्त्रहरणाचा प्रसंग त्याने कारुण्य, द्वेष, अभिलाषा अशा अनेक भावनांच्या कलात्मक आविष्काराने रंगविला आहे विराटपर्वावर त्याने केलेले लेखन म्हणजे त्याच्या असामान्य प्रतिभेचा भव्य साक्षात्कारच आहे कवी मुक्तेश्वरने आपल्या भारतात व्यासमुनी आणि कुमारव्यास या दोघांनाही अभिवादन केले आहे यावरून मराठी कवींतही त्याच्या थोरवीविषयी आदर होता हे सिद्ध होते.

चामरस हा चरित्रकाव्ये लिहिणारा एक समर्थ लेखक 'प्रभुलिंगलीले' ही त्याची श्रेष्ठ कृती आहे अल्लमप्रभूला आदर्श मानून त्याने रचना केली असली तरी चामरसाला स्वतंत्र साहित्यिक व्यक्तित्व आहे 'प्रभुदेवाची रगळे' हा त्याचा दुसरा ग्रंथही याचा साक्षी आहे त्यात त्याने अल्लमप्रभूचे व्यक्तिचित्रण केले आहे वीरशैव साहित्याच्या पुनरुज्जीवनाचा तो काळ होता वचने, शैवकथा, शरणांची चरित्रे इत्यादींना बहर आला होता प्रौढदेवरायाच्या कारकीर्दीत १०१ प्रमुख विरक्त म्हणजे संत होऊन गेले. साहित्य लोकाभिमुख होत होते अस्सल कानडी भाषेत गद्य-पद्य रचना होत होत्या असे कार्य करण्यात निजगुणी शिवयोगी किंवा निजगुण हा प्रमुख होता तो राजा होता पण नंतर विरक्त झाला व तपश्चर्या करून ज्ञानी झाला 'कैवल्य पधूती', 'परमानुभव बोध', 'परमार्थ गीता', 'अनुभवसार' इत्यादी अनेक प्रभावी रचना त्याने केल्या 'विविकेचिंतामणी' हा त्याचा ग्रंथ म्हणजे कानडी भाषेला त्याने दिलेली अमोल देणगी आहे मुप्पिन षडक्षरी हा निजगुण शिवयोगीचा समकालीन सहजस्फूर्त अशी आध्यात्मिक भावगीते त्याने रचली यासंदर्भात सर्पभूषण शिवयोगी किंवा रुपका याचाही उल्लेख करावा लागेल

कर्नाटक व कानडी भाषा यांच्या इतिहासात सर्वज्ञाला फार मानाचे स्थान आहे त्याने लोकजीवन आत्मसात केले व 'दिसेल ते मी बोलतो' या

स्पष्टवक्तेपणाने त्याने ग्रथरचना केली सर्वज्ञ हा सत्यदर्शी आणि खंडितवादी होता 'अनुभव हाच माझा वेद' असे त्याने निर्भयपणे सागितले सर्वज्ञ हे लोकानी त्याला दिलेले नाव आहे. तो नम्रपणे म्हणतो, 'सर्वांकडून एक एक बोल घेऊन मी विद्येचा पर्वत झालो' आत्मा जाणला तर सर्व जाणल्यासारखे आहे हे उपनिषदातील तत्त्व त्याने अनुसरले सर्वज्ञाच्या वचनाला त्रिपदी म्हणतात त्याच्या सोप्या पण अर्थपूर्ण वचनाचे हे उदाहरण पहा. 'देवावर लक्ष न धरता देवळात प्रदक्षिणा घातल्या तरी काय फल हो ? बैल घास वाहून फेऱ्या घालतो तसाच तो प्रकार !' तसेच तो म्हणतो, 'अकचिन जरी खरे बोलला तरी तो काहीतरी बरळतो आहे, असे लोक म्हणतात, श्रीमत जरी खोटे- खरे बोलला तरी ते सर्वांना गोड वाटते' अनेक बाबतींत सर्वज्ञ व तुकाराम याच्यात बरेच साम्य आहे. लोकभिमुखता आणि अनुभवाधारित ज्ञान हे सर्वज्ञाचे मुख्य विशेष आहेत

पुरंदरदास आणि कनकदास हे दोन श्रेष्ठ कानडी संत कवी पुरदरदास हा दासश्रेष्ठ म्हणून मानला जातो तो एक कजूष श्रीमत होता, पण त्याला उपरती होऊन तो विरक्त झाला. त्याने गीतरचना केली व हरिदास झाला त्याने भारतात मोठ्या प्रमाणावर सचार करून कीर्तने केली विडबनात त्याचा हातखडा होता. त्याची एक हजारावर पद्ये व कीर्तने उपलब्ध आहेत नामाचा महिमा, कृष्णलीला, समाजप्रबोधन इत्यादी विषयावर तो कीर्तने करीत असे. 'मी नाही दुजे मागत, माझ्या हृदयकमली वसावे हे हरी' अशा प्रकारची त्याची साधी, सोपी, भक्तिपर रचना आहे भक्ती, सत्यधर्म, न्यायनीती आणि जीवननिष्ठा ही मूल्ये लोकांत रुजावीत म्हणून त्याने जीवनभर कार्य केले तो व्यासरायाचा पट्टशिष्य आणि मध्वमुनींच्या गटाचा अनुयायी होता

कनकदास हा पुरंदरदासाचा समकालीन तो धनगर कुळात जन्मला, पण लढाईच्या वेळी विरक्त झाला 'हरिभक्तिसार', 'नलचरित्र' व 'मोहनतरगिणी' हे काव्यग्रथ, कीर्तने व षट्पदी त्याने रचल्या जिव्हाळा हे त्याच्या रचनेचे मुख्य वैशिष्ट्य आहे त्या काळात कनकदासाने विचारस्वातत्र्याचा पुरस्कार केला त्या काळात त्याचे हे धैर्य असामान्य होते जातीपाती व कुळावरून श्रेष्ठ-कनिष्ठता याना विरोध करताना त्याने म्हटले आहे, 'चिखलात उगवलेले कमळ विष्णुपदी जातेच ना ? आत्म्याचे

कूळ काय याचा विचार कोणी करतो काय ?' पुरंदरदास व कनकदास याच्यानंतर जगन्नाथदासाने दासकुटाची परपरा चालू ठेवली. 'हरिकथामृतसार' आणि कीर्तने त्याने लहिली. एक हजारावर पद्यांची त्याने रचना केली. भागवत कवींच्या परपरेत कुमार वाल्मीकी हे नाव ठळकपणे घ्यायला हवे. 'तोरवे रामायण' हे नाव त्याने आपल्या रामायणातील ग्रथास देण्याचे कारण म्हणजे तोरवे हे त्याचे गाव होते तोरवे रामायणात पाच हजार पद्ये आहेत तिम्मण लक्ष्मीश, गोप इत्यादी कवींचीही या काळातील कामगिरी महत्त्वाची आहे. लक्ष्मीशचे 'जैमिनी भारत' ही कानडी साहित्याला मोठीच देणगी आहे. 'नंदीमाहात्म्य' ही गोप कवीची कलाकृती आहे

शिशुमायण याचे 'त्रिपुरादहन सागत्य' आणि 'अंजनाचरित्र' मध्ये सहा हजार पदे आहेत भंगरस, रत्नाकरवर्णी, कोटेश्वर इत्यादींना रत्नाकरवर्णी हा महाकवी मानला जातो 'त्रिलोकशतक', 'गेयपद्य, 'अपराजतेश्वर शतक' व 'भरतेश वैभव' हे त्याचे ग्रथ त्याच्या स्वतंत्र प्रज्ञेचे साक्षी आहेत. सोळाव्या शतकाच्या मध्य भागात विजयनगरचे साम्राज्य लोप पावल्यानंतर कर्नाटकच्या सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रातही मरगळ आली. मात्र म्हैसूरचे राजे समर्थ आणि साहित्याचे भोक्तेही असल्याने कानडीचे केन्द्र विजयनगरहून म्हैसूरला गेले. इ. स. १७०० च्या सुमारास म्हैसूरचा उदार राजा चिक्कदेवराय याच्या कारकीर्दीत कानडी साहित्यास पुन्हा पालवी फुटली षड्क्षरदेव या कवीने त्याआधी थोडाच काळ 'राजशेखरविलास', 'शबरशंकर विलास' आणि 'वृषभेंद्रविजय' या ग्रंथांनी या नव्या युगाची नांदी केली होती. ही तिन्ही चंपूकाव्ये साहित्य गुणानी समृद्ध आहेत तिरुमलाचार्य याने संस्कृत व कानडी या दोन्ही भाषात ग्रथ लिहिले तो पंडित होता. 'अप्रतिम वीर चरित्र', 'चिक्कदेवरायविजय', 'चिक्कदेवराय वंशावळी' आणि 'चिक्कदेवराय शतक' या ग्रंथात त्याने चिक्कदेवरायाचे गुणवर्णन केले आहे महालिंगरग याचा 'अनुभवामृत' हा ग्रंथ शांकरतत्त्वज्ञान सर्वसामान्य लोकाच्यापर्यंत आणणारा प्रभावी ग्रथ आहे त्याच्या उपमा आपल्याला ज्ञानेश्वराच्या उपमाची आठवण करून देतील. उदाहरणार्थ· सोलीव पिकल्या केळयापरी । कवच कीस काढल्या उसापरी । निवल्या गरम दुधापरी । सुलभ जे होय ॥'

होन्नम्मा ही कवयित्री चिक्कदेवरायच्या काळी पानसुपारीचे तबक साभळणारी स्त्री होती, पण हिने 'सरस साहित्याची वरदेवता' हा सन्मान मिळविला 'हदिबदेय धर्म' म्हणजे पतिव्रता धर्म हा तिचा मान्यताप्राप्त ग्रथ. अठराव्या व एकोणिसाव्या शतकात कानडीत काही ग्रंथांची रचना झाली, पण त्यानी साहित्यिक गुणात फारशी उंची गाठली नाही म्हैसूरचा राजा कृष्णराज वडियर याने स्वतः पन्नास ग्रथांची रचना केली आणि अनेक पंडित, लेखक याना आश्रय दिला त्यात केंपू नारायण आणि अळिय लिंगराज हे प्रमुख होते प्रा. शेषगिरीराव यांनी या काळाविषयी म्हटले आहे, 'अठरावे व एकोणीसावे ही दोन शतके कानडी साहित्याच्या दृष्टीने ओसाडच होती या काळात सख्येने खूपच ग्रथनिर्मिती झाली, तरी त्याची गुणवत्ता अगदी सामान्य होती, (मॉडर्न कन्नड लिटरेचर पृ २१) मात्र एकोणिसाच्या शतकाच्या शेवटी उगवलेला मुद्दपा हा विसाव्या शतकातील जोमदार कानडी साहित्याचा पूर्वसुरी आहे. 'रत्नावली कवयाम', 'कुमार विजय', 'यक्षगान प्रसग' इत्यादी अनेक ग्रंथानी त्यांनी कानडी साहित्याच्या भवितव्याबद्दल नव्या आशा निर्माण केल्या

विसाव्या शतकातील कानडी साहित्याने नवे युग आणले याचे महत्त्वाचे कारण म्हणजे पाश्चात्त्य साहित्याने केलेली क्राती त्यामुळे धार्मिक आणि पारपरिक विषयात कोडले गेलेले कानडी साहित्य आधुनिक काळाकडे वळले विसाव्या शतकात, विशेषत· १९२० नतर कानडी साहित्यात कादंबरी, कथा, नाटक, निबध, काव्य यानी आधुनिक रुपे घेतले कुर्वेपू (पुट्टप्पा), व्ही के. गोकाक, पी टी. नरसिंहाचार्य, शकरभट्ट कडेगोदू हे या नव्या शिलेदारात अग्रगण्य होते मास्ती व्यकटेश अय्यंगार, द रा बेंद्रे, शिवराम कारंथ, केरूर, गोरूर, रामास्वामी अय्यंगार, अ न कृष्णराव या नव्या दमाच्या प्रतिभावत लेखकानी कानडी साहित्यात आमूलाग्र क्राती केली त्या साहित्याचा ढाचाच बदलून टाकला कैलासम, ससं, श्रीरग, अडिग, पजे मगेशराय, श्रीकठैय्या, सीतारामय्या, सुब्बाराव, गिरीश कर्नाड, ए एन मूर्तिराय, ना कस्तुरी, आनदकद, निरजन इत्यादींनी त्यात मोलाची भर घातली


कानडी साहित्याचे योगदान कोणते आहे, हे सागताना 'कन्नड साहित्याचा इतिहास' या ग्रथात शेवटी श्री र श्री मुगळी म्हणतात,

'आमच्या मते भारतीय साहित्य दर्शनातून स्फूर्ती मिळवून कन्नड साहित्याने आपल्या श्रेष्ठ कृतींमध्ये जगाच्या ज्ञानभांडाराला व स्फूर्ती साहित्याला असंदिग्ध रीतीने आपली देणगी दिली आहे नव्या साहित्यात या देणगीची खोली व रुंदी आणखी जास्त आहे हजारो वर्षांच्या इतिहासात तेव्हापासून आजपर्यंत व्यक्तित्वसंपन्न कवींनी व लेखकांनी या कन्नड देशात जन्मास येऊन सामर्थ्यपूर्ण कृतींची रचना केली आहे तेजस्वी वचने दिली आहेत 'मनुष्य जात तानू ओंदेवल' (पंप) (मनुष्यजाती आपण एकच), 'मर्त्य लोक वेन्बुदु कर्तारन कम्मटवय्या' (बसवेश्वर) (मर्त्य लोक ही सृष्टीकर्त्याची टाकसाळ), 'इजबेकु इद्दुजैसबेकू' (पुरंदरदास) (पोहुनी तगावे व तगुनी जगावे), 'तन्नंते परर बगेदोडे कैलास बिन्नणबुक्कु' (सर्वज्ञ) (आपल्या परी इतरां मान, तरी तेच कैलासीचे विज्ञान) अशा शेकडो वचनांच्या दीपमाळा त्यांनी काळाच्या पथावर चिरस्थायी रुपाने उभारल्या आहेत त्याजपासून कन्नडिगाना स्फूर्ती मिळाली आहे कन्नडिगानी जगाच्या सर्व उत्तम साहित्यातून स्फूर्ती मिळविल्याप्रमाणेच इतर लोकही कन्नड साहित्याच्या उत्तम अंशातून स्फूर्ती मिळवतील, अशी आमची मनीषा.'

❑

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

REFBK-0027147




# कर्नाटक